# वृषाली जोशी

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा



# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ४

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ४

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ४

लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ४ फ़ेब्रुवारी २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी 'The Mysterious Affair of Styles' ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. 'The Murder of Roger Ackroyd' या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून

मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. 'And then There Were None' यावर आधारित हिंदी सिनेमा 'गुमनाम' तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या सहा गोष्टींचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

कथानुक्रम


| | |
|---|---|
| हरवलेली खाण | ९ |
| लाख डॉलरच्या रोख्यांची चोरी | २४ |
| कॉर्निश गूढ | ४२ |
| ले घरातील गूढ | ६९ |
| इजिप्शियन थडग्याचे साहस | ८७ |
| अविश्वसनीय चोरी | ११४ |

THE LOST MINE

# हरवलेली खाण



मी एक सुस्कारा सोडून बँकेचे पुस्तक खाली टाकले.

मी म्हणालो, “ही विचित्र गोष्ट आहे, की मी बँकेला कितीही पैशांचे चेक दिले, तरी तरी माझे कर्ज (overdraft ) कमीच होत नाही. हे कसे काय होते, मला कळत नाही.”

पायरो बोलला, “आणि त्याने तुला दुःख होत नाही? असे माझ्या बाबतीत झाले असते, तर रात्रभर माझा डोळ्याला डोळा लागला नसता.”

मी उत्तरलो, “मग मला वाटते, तू शिल्लक रकमेत आरामशीरपणे वावरतोस.”

पायरो समाधानाने म्हणाला, “चारशे चव्वेचाळीस पौंड, चार शिलिंग आणि चार पेनी, चांगली रक्कम आहे, नाही का?”

“ही तुझ्या बँक व्यवस्थापकाची काही युक्ती दिसते आहे. तुझ्या पासबुकातील सारख्या नोंदींची आवड {पाचवेळा आलेला चार हा आकडा} तुझ्या व्यवस्थापकापर्यंत पोचलेली दिसते. या रक्कमेपैकी तीनशे पौंड पोर्क्यूपाइन ऑईल फिल्ड यात गुंतवल्यास कसे? आजच्या वर्तमानपत्रातील त्यांच्या छापील माहितीपत्रका प्रमाणे, ते पुढील वर्षी शंभर टक्के लाभांश देणार आहेत.”

पायरो डोके हलवत म्हणाला, “माझ्यासाठी नाही. मला भावनाशील व्हायला आवडत नाही. माझ्यासाठी कमी व्याजदर असलेली पण सुरक्षित गुंतवणूक शहाणणाची ठेव ठरेल.”

“तू कधी चांगला अंदाज करून गुंतवणूक केली नाहीस का?”

पायरो कडकपणे उत्तरला, “नाही, माझ्या मित्रा, नाही केली. माझ्याकडे असलेले शेअर्स म्हणजे बर्मा माईन्स लिमिटेडमधील चौदा हजार शेअर्स. तुम्ही ज्याना सर्वात चांगला व्याजदर देणारे म्हणता, तसले ते नाहीत.”

पुन्हा पुढे बोलायला चालना मिळण्यासाठी म्हणून पायरो थांबला.

मी म्हणालो, “मग, पुढे?”

“आणि त्यासाठी मी रोकड भरली नाही --- त्यासाठी मी माझ्या मेंदूतील करड्या पेशींचा उपयोग केला. तुला ती गोष्ट ऐकायला आवडेल का? हो?”

“अर्थात, आवडेल.”

“या खाणी ब्रम्हदेशाच्या अंतर्भागात, रंगूनपासून साधारण दोनशे मैलांवर वसलेल्या आहेत. पंधराव्या शतकात चिन्यांनी त्याचा शोध लावला. आणि महंमदीयन क्रांतीच्या काळात त्यावर कामाला सुरवात झाली. शेवटी १८६८ साली त्या बाद झाल्या. चिन्यांनी अनमोल अशी शिसे व चांदीची खनिजे तिथून मिळवली. त्यांनी त्यातील चांदी काढून घेतली आणि मोठ्या प्रमाणात शिसे तिथे उरले. पुढे त्यातून चांगले भवितव्य असलेले उद्योग ब्रम्हदेशात लवकरच सुरु करण्याचे ठरवले गेले. पण जुन्या कामात पाण्याचे जास्त प्रमाण आढळले व मूळ खनिज शोधून काढायचे स्त्रोत यशस्वी ठरले नाहीत. काही संस्थांकडून काही माणसांचे गट पाठवण्यात आले, त्यांनी खूप मोठा प्रदेश खणून बघितला. पण त्यांना ते भाग खनिजाने समृद्ध असल्याचे सापडले नाही. पण एका गटाला चिनी कुटुंबाचा मागोवा घेता आला. त्यांच्याकडे त्यावेळच्या खाणींची माहिती मिळाली. त्या कुटुंबाचा हल्लीचा मुख्य वू लिंग होता..”

मी उद्गारलो, “व्यापारी अद्भुतरम्यतेचा काय सुरस आणि चमत्कारिक प्रवास आहे!”

“हो की नाही? अरे मित्रा, सोनेरी केसांच्या अजोड अशा सुंदर मुलींशिवाय असलेले, हे सौदर्य आहे --- नाही. माझे चुकले. लालसर तपकिरी केस तुला नेहमी आकर्षित करतात. तुला आठवते --- “

मी घाईने म्हणालो, “गोष्ट पुढे सांग.”

“अरे माझ्या मित्रा, या वू लिंगला लोक भेटले. तो चांगला व्यापारी होता. तो रहात असलेल्या प्रदेशात त्याला बऱ्यापैकी मान होता. त्याने लगेच कबूल केले, की प्रश्नचिन्हांकित कागदपत्रे त्याचाकडे आहेत आणि लिलाव करून तो ती विकायला तयार आहे. पण सर्वोच्च पदी असलेला माणूस सोडून इतरांशी बोलणी करायला तो तयार नव्हता. शेवटी असे ठरले, की त्याने बोटीने इंग्लंडला यावे. नोव्हेंबरमधील एका थंड, धुक्याच्या दिवशी त्याची बोट सदनप्टन किनाऱ्याला लागली. मिस्टर पिअर्सन नावाचे एक संचालक सदनप्टनला गेले पण धुक्यामुळे गाडीला उशीर झाला. त्यामुळे मिस्टर पिअर्सनला न भेटता, मिस्टर वू लिंग विशेष गाडीने लंडनसाठी रवाना झाले. मिस्टर पिअर्सन रागावले, कारण त्याना हा चिनी माणूस कुठे रहाणार, ते माहिती नव्हते. त्या दिवशी नंतर फोनवरून दोघांचा मिलाप घडवण्यात आला. वू लिंग रसेल चौकातील हॉटेलमध्ये रहात होते. त्याना प्रवासाचा त्रास झाला होता. पण दुसऱ्या दिवशीच्या महत्वाच्या सभेला हजेरी लावायचे त्यांनी कबूल केले.

ती सभा अकरा वाजता ठरली. साडेअकरा वाजले आणि तरी वू लिंग आला नाही, तेव्हा सचिवाने रसेल हॉटेलला फोन केला. त्याच्या चौकशीला उत्तर म्हणून त्याला असे सांगण्यात आले, की ते साडेदहाला

एका मित्राबरोबर बाहेर गेले आहेत. हे स्पष्ट होते, की त्यांचा सभेला यायचा बेत तर होताच. पण सकाळ निघून गेली आणि ते तर आले नाहीत. अर्थात, हे शक्य होते, की लंडनशी अपरिचित असल्याने, ते रस्ता चुकले. त्या रात्री ते हॉटेलमध्येही परत आले नाहीत. आता पूर्णपणे सावध होऊन, मिस्टर पिअर्सन यांनी हे प्रकरण पोलिसांच्या हवाली केले. दुसऱ्या दिवशीदेखील ते सापडले नाहीत .पण दिवसाच्या शेवटी संध्याकाळी, त्या दुर्दैवी माणसाचे प्रेत थेम्स नदीत सापडले. प्रेतावर किंवा हॉटेलातील सामानामध्ये खाणीशी संबंधित काही कागदपत्रे सापडली नाहीत.

“माझ्या मित्रा, याच सुमारास माझ्याकडे हे प्रकरण सोपवण्यात आले. त्यांनी मला बोलावले. वू लिंग यांच्या मृत्यूमुळे हादरलेल्या त्यांची मुख्य काळजी होती, की त्यांच्या लंडन भेटीच्या उद्देशाचे कागदपत्र शोधून काढणे. पोलिसांची मुख्य काळजी खुन्याला शोधून काढायची होती. त्यांच्या दृष्टीने कागदपत्रे ही नंतरची गोष्ट होती. माझे काम कंपनीच्या कामात रस घेऊन पोलिसांना सहाय्य करायचे होते.

मी हे काम आनंदाने अंगावर घेतले. हे स्पष्ट होते, की माझ्यासाठी शोधाची दोन क्षेत्रे उपलब्ध होती. एकीकडे मी ज्यांना वू लिंग येणार असल्याचे माहिती होते, अशा कंपनीच्या नोकरवर्गाबरोबर बोलून, शोध घेऊ शकत होतो. तर दुसरीकडे वू लिंगच्या कामगिरीबद्दल माहिती असलेल्या बोटीतील प्रवाश्यांबरोबर, मी संवाद साधू शकत होतो. मी दुसरी चौकशी आधी सुरु केली. कारण ती मला आकाराने बेताची वाटली. यात मी ही केस बघणाऱ्या इन्स्पेक्टर मिलरची मदत घेतली. हा आमचा मित्र

जापपेक्षा एकदम वेगळा होता. अहंकारी, रीतभात नसलेला आणि जराही त्रास न घेणारा होता. आम्ही दोघांनी मिळून बोटीवरील ऑफिसर लोकांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्याकडे आम्हाला सांगण्यासारखे फारसे काही नव्हते. वू लिंग प्रवासात कुणाशी फारसे बोलला नव्हता. फक्त इतर दोन प्रवाश्यांशी त्याची नाळ जुळली होती --- एक वयामुळे थकलेला व फारशी चांगली कीर्ती नसलेला, डायर नावाचा युरोपिअन होता आणि दुसरा हॉंगकॉंहून परतणारा चार्ल्स लेस्टर नावाचा बँकेतील कारकून होता. आम्ही नशीबवान असल्याने आम्हाला या दोघांचेही फोटो मिळाले. त्या क्षणी थोडा संशय वाटत होता, की त्या दोघांपैकी कुणी त्या प्रकरणात सामील होते की नाही! पण डायर हा चिनी ताफ्याशी मिसळून गेला होता आणि आम्हाला त्याचा संशय येत होता.

आमचे पुढचे काम होते, रसेल चौकातील हॉटेलला भेट देणे. तिथे आम्ही वू लिंगचा फोटो दाखवला. त्यांनी त्याला लगेच ओळखले. मग आम्ही त्यांना डायरचा फोटो दाखवला. पण ज्या दिवशी तो महत्वाचा प्रसंग घडला, त्या दिवशी हॉटेलात आलेला माणूस तो नसल्याचे तेथील हमाल खात्रीपूर्वक म्हणाला. विचार केल्यानंतर मी त्यांना लेस्टरचा फोटो दाखवला. आणि आश्चर्य म्हणजे, तेथील माणसाने लगेच त्याला ओळखले.

त्याने ठामपणे सांगितले, “हो सर, साडेदहाला येऊन मिस्टर वू लिंगची चौकशी करणारा नंतर त्याच्याबरोबर बाहेर पडणारा हाच माणूस!”

प्रकरण पुढे चालले होते. आमचे पुढचे काम होते मिस्टर लेस्टरची मुलाखत घेणे. तो मोकळेपणे आम्हाला भेटला. मिस्टर वू लिंगच्या

मरणाबद्दल ऐकून, तो नाराज झाला. त्याने सांगितलेली गोष्ट अशी होतीः वू लिंग बरोबर त्याने हॉटेलमधून निघण्याची साडेदहा अशी वेळ ठरवली पण तेव्हा वू लिंग आला नाही. त्याच्याऐवजी त्याच्या नोकराने येऊन सांगितले, त्याच्या मालकाला बाहेर जावे लागले. आणि जिथे मालक गेला आहे, तिथे त्याला जायला सांगितले. कसलाही संशय न घेता लेस्टर तयार झाला. मग एक टॅक्सी बोलावली गेली. ते थोडा वेळ बंदराच्या दिशेने गेले. अचानक अविश्वासू बनत, लेस्टरने नोकराचे काही न ऐकता, टॅक्सी थांबवली. एवढेच तो सांगू शकला.

थोडेफार समाधानाने आम्ही त्याचे आभार मानले आणि निघालो. त्याची गोष्ट काहीशी चुकीची असल्याचे लवकरच सिद्ध झाले. सुरवातीला वू लिंगबरोबर बोटीवर किंवा हॉटेलमध्ये नोकर नव्हता. दुसरे म्हणजे सकाळी दोघांना आणणारा टॅक्सीचालक पुढे आला. लेस्टरने जिथे टॅक्सी थांबवली तिथे त्याने वू लिंगला आल्हादक नसलेल्या रहायच्या ठिकाणी, चायनाटाऊनमधील लाइमहाउस येथे नेले. ती जागा अगदी खालच्या थरातील ओपियमची गुहा म्हणून प्रसिद्ध होती. फोटोवरून त्याने ज्या इंग्लिश गृहस्थाला ओळखले, तो एकटाच बाहेर आला. तो इंग्लिश माणूस फार अशक्त व आजारी दिसत होता आणि त्याने टॅक्सीचालकाला त्याला जवळच्या भुयारी रेल्वे स्टेशनवर सोडायला सांगितले.

चार्ल्स लेस्टरच्या जबानीबद्दल चौकशी करण्यात आली आणि असे आढळले, जरी त्याचे चारीत्र्य उत्तम असले तरी तो कर्जबाजारी होता. आणि जुगार खेळायला सोकावलेला होता. अर्थात डायरलाही दृष्टीआड केले

नव्हते. अशी धूसर शक्यता वाटत होती, की त्याने दुसऱ्या मनुष्याला फसवले असावे. पण ती कल्पना पूर्णपणे फेटाळली गेली. त्याने दिलेली प्रश्नार्थक दिवसाची सफाई अजिबात संशय घेण्यासारखी नव्हती. अर्थात ओपियमच्या गुहेच्या मालकाने सगळे भावनारहितपणे अमान्य केले. त्याने चार्ल्स लेस्टरला कधीच पाहिले नव्हते. ती दोन माणसेही सकाळी तिथे आली नव्हती. काही झाले तरी, पोलीसांची चूक होती. तिथे ओपियमचा धूर निघत नव्हता.

त्याचा ठासून नकार होता. त्यामुळे चार्ल्स लेस्टरला काही मदत झाली नाही. त्याला वू लिंगला मारल्याच्या आरोपाखाली अटक झाली. खाणीचे काही कागद सापडले नाहीत. त्याच्या परिणामांचा शोध घेतला गेला. ओपियमच्या गुहेच्या चालकालाही पोलिसांनी ताब्यात घेतले. पण या घाईने टाकलेल्या छाप्यात त्या परिसरात काही आक्षेपार्ह सापडले नाही. ओपियमचा कणही न सापडल्याने, पोलिसांचा उत्साह वाढला.

मधल्या वेळात माझा मित्र पिअर्सन खूप रागावला होता. तो माझ्या खोलीत रागाने फेऱ्या मारत होता व तोंडाने विलाप करत होता.

“पण मिस्टर पायरो, तुमच्याकडे नक्की काही कल्पना असतील.”

मी सावधपणे बोललो, “माझ्याकडे नक्कीच काही कल्पना आहेत. तोच त्रास आहे. एखाद्याकडे त्या खूप झाल्याने, त्या वेगवेगळ्या दिशादर्शक आहेत.

त्याने विचारले, “उदाहरणार्थ?”

“उदाहरणार्थ --- टॅक्सीचालक. त्याने दोन माणसांना लाइमहाउसमध्ये सोडले, हे फक्त तो सांगतो आहे. ती एक कल्पना. मग --- ते खरेच त्या लाइमहाउसमध्ये गेले का? समजा, त्यांनी तिकडे टॅक्सी सोडली. लाइमहाउसमध्ये शिरले आणि दुसऱ्या दाराने बाहेर पडून आणि कुठेतरी गेले?”

मिस्टर पिअर्सन हे ऐकून चमकले. “तुम्ही नुसतेच बसून विचार करता का? आपण काही करू शकत नाही का?”

तो जरा घायकुत्या स्वभावाचा होता, हे तुम्हाला समजले असेल.

मी सभ्यपणे म्हणालो, “मिस्टर, लाइमहाउससारख्या पापी रस्त्यांमधून लहानशा भटक्या कुत्र्यासारखे इकडे तिकडे धावणे, हे हर्क्युल पायरोचे काम नाही. शांत रहा. माझे दलाल काम करत आहेत.”

दुसऱ्या दिवशी, माझ्याकडे त्याच्यासाठी बातमी होती. त्या प्रश्नार्थक लाइमहाउसमधून ती दोन माणसे खरेच गेली होती. पण त्यांचे खरे उद्दिष्ट होते, नदीजवळील छोटी खाण्याची जागा. ते तिथून जाताना दिसले होते आणि लेस्टर तिथून एकटाच बाहेर आला.”

मग हेस्टीग्ज, आता तुझे तू ठरव, या फार अविचारी पिअर्सनची कल्पना कर. आपण स्वतः त्या खाण्याच्या छोट्या ठिकाणी जाऊन, बघितलेले बरे राहील. मी वाद घातला आणि प्रार्थना केली, पण तरीही तो ऐकत नव्हता. तो स्वतः लपून बसायच्या गोष्टी करत होता. तो असेही सुचवत होता, की मी --- मी ते सांगायला मागे पुढे बघतो --- मी माझ्या मिशा उडवाव्यात! हो, फक्त एवढेच सत्य आहे! मी त्याच्या लक्षात आणून

दिले, ही विचित्रपणे बेकार कल्पना आहे. एखादा त्याची सुंदरतेची गोष्ट नष्ट करत नाही. शिवाय कुणीही मिशावाला बेल्जियन सभ्य माणूस, मिशा नसलेल्या माणसासारखे आयुष्याकडे बघेल व ओपियम ओढायची इच्छा करेल, हे शक्य नाही, नाही का?"

"अरे मित्रा, त्याने त्याचे मत दिले आणि अजूनही तो त्यावर ठाम आहे. त्या संध्याकाळी तो परत आला. "अरे देवा, काय त्याचे दिसणे! त्याने जड लोकरीचे जाकीट घातले होते. त्याची हनुवटी अस्वच्छ, दाढी न केलेली होती. त्याने नाक ठेचणारा दुष्ट रुमाल पांघरला होता. आणि असा विचार कर, की तो स्वतःच्या आनंदात मश्गुल होता. खरेच इंग्लिश लोक वेडे असतात! त्याने माझ्या स्वतःच्या दिसण्यात काही बदल केले आणि मी ते मान्य केले. वेड्याशी कुणी वाद घालते का? आम्ही बाहेर जायला निघालो --- जणु आपण सभ्य असल्याचे ढोंग करणारा लहान मुलगा! शेवटी मी त्याला एकट्याला जाऊ देऊ शकलो असतो का?"

मी उत्तरलो, "अर्थातच नाही."

तर पुढे सांगायचे म्हणजे आम्ही आलो. मिस्टर पिअर्सन इंग्लिश फार विचित्र बोलत असे. तो स्वतःला दर्यावर्दी समजे. तो 'मोठा गबाळा' व 'अश्मीभूत अवशेष' याबद्दल आणि कोण जाणे कशाकशाबद्दल बोले. ती खूप चिनी लोक असलेली एक खालच्या बाजूची, लहानशी खोली होती. आम्ही विशिष्ट प्रकारचे खाणे खाल्ले. अरे देवा, माझे पोट!" पुढे बोलण्यापूर्वी, पायरोने त्याचा पोटाचा तो भाग दाबून धरला. "पापी हसणारे तोंड असलेला चिनी मालक मग आमच्याकडे आला. तो म्हणाला, "तुम्हा

चांगल्या लोकांना इथले खाणे आवडले नाही का? तुम्हाला जे आवडते, ते खायला तुम्ही इथे या. मटणाची लज्जतदार नळी चोखायला या, काय?"

मिस्टर पिअर्सनने मला टेबलाखालून लाथ मारली. [त्याचे बूटही समुद्रावरचे होते.] आणि तो म्हणाला, "जॉन, मी हे केले, तर मला त्याचे काही वाटणार नाही. पुढे चल."

तो चिनी माणूस हसला. त्याने आम्हाला एका दारातून व झाकणासारखे उघडणाऱ्या भुयारातून काही पायऱ्या खाली उतरून, तळघरात नेले. तिथून थोडे चढून, आम्ही एका बरेच कोच व आरामशीर गाद्यागिरद्या ठेवलेल्या खोलीत आलो व तिथे आम्ही पहुडलो. एका चिनी मुलाने आमचे बूट काढले. संध्याकाळचे ते सर्वात चांगले क्षण होते. मग त्यांनी आमच्यासाठी ओपियमचे पाइप आणले. ओपियमच्या गोळ्या शिजवल्या. आम्ही धूर सोडायचे, झोपायचे व स्वप्ने बघण्याचे नाटक केले. पण आम्ही एकटे राहिल्यावर, मिस्टर पिअर्सनने मला हळूच हाक मारली आणि लगेच त्याने जमिनीवर रांगायला सुरवात केली. आम्ही काही लोक झोपलेल्या दुसऱ्या खोलीत गेलो व दोन लोक एकमेकांशी बोलतांना ऐकेपर्यंत, तसेच जात राहिलो. आम्ही पडद्यामागे लपलो आणि वू लिंगबद्दलचे बोलणे ऐकू लागलो.

एकजण म्हणाला, "कागदांचे काय?"

दुसरा चिनी माणूस उत्तरला, "मिस्टर लेस्टर, त्याने ते नेले. तो म्हणाला की ते सर्व पोलीस बघणार नाही, अशा --- सुरक्षित जागी ठेवा"

पहिला बोलला, "पण तो तर पकडला गेला."

“तो सुटेल. पोलिसांची खात्री नाही, की त्याने ते केले.”

पिअर्सन म्हणाला, “तिथे अजून तशाच प्रकारच्या गोष्टी चालू आहेत. आता ते दोघे आपल्याकडेच येत आहेत. आपण अंथरुणात शिरले पाहिजे.”

काही मिनिटाने पिअर्सन बोलला, “आपण इथून बाहेर गेलेले बरे. ही जागा फारशी चांगली नाही.”

मी कबूल करत म्हटले, “तुझे बरोबर आहे. आपण खूप वेळ नाटक केले आहे.”

“आम्ही दूर निघून जाण्यात यशस्वी झालो. आपण धूर काढला, त्याची चांगली किंमत मोजली. लाइमहाउसमधून बाहेर पडल्यावर, पिअर्सनने एक दीर्घ श्वास घेतला.

तो म्हणाला, “इथून बाहेर पडल्याने, मी आनंदित झालो आहे. पण याची खात्री व्हायला हवी.”

“मी कबूल केले, “खरेच तसे झाले आहे. या उबग आणणाऱ्या संध्याकाळनंतर, मला वाटते आपल्याला जे हवे आहे ते शोधायला, आपल्याला फार त्रास पडणार नाही --- “

पायरोने संपवले, “आणि तसा काहीच त्रास झाला नाही.”

हा अचानक शेवट इतका असामान्य वाटला, की मी त्याच्याकडे बघू लागलो. मी विचारले, “पण ते कुठे होते?”

“त्याच्या खिशात --- एवढे सोपे होते.”

“पण कुणाच्या खिशात?”

“मिस्टर पिअर्सन, कळले?” नंतर माझ्या घाबरलेल्या चेहऱ्याकडे बघत, तो सावकाश बोलत राहिला, “तुला अजून ते समजत नाही का? मिस्टर पिअर्सनसुद्धा चार्ल्स लेस्टर सारखाच कर्जात बुडाला होता. त्याला जुगार खेळायला आवडत असे. त्याने अशी टूम काढली की आपण त्या चिन्याकडून कागद चोरू. तो त्याला सदनप्टनला भेटला. लंडनला त्याच्याबरोबर आला आणि सरळ त्याला लाइमहाउसला नेले. तो धुक्याचा दिवस होता. कुठे जात आहोत, हे त्या चिनी माणसाला समजले नाही. मिस्टर पिअर्सन तिथे नेहमीच ओपियमचा खूप धूर करून ठेवत असे. काही विशिष्ट मित्रदेखील त्याने गोळा करून ठेवले होते. मला वाटत नाही, की त्याला खून करायचा होता. त्याची कल्पना अशी होती, की चिनी माणूस वू लिंगला ढोंग करून घोटाळ्यात ओढायचे आणि कागद विकून पैसे मिळवायचे. असे सर्व चालले होते, पण पूर्वेकडच्या मनाने, हे अतिशय सोपे होते, की वू लिंगला मारायचे आणि ते प्रेत नदीत फेकून द्यायचे.

या कृष्णकृत्यातील पिअर्सनच्या साथीदारांनी त्याचा सल्ला न घेता, त्यांच्या पद्धती वापरल्या. मग कल्पना करा, पिअर्सन तुम्ही ज्याला ‘भीतीने व काळजीने ग्रासलेला’ म्हणाल तसा झाला. कोणी त्याला रेल्वे गाडीत वू लिंगबरोबर पाहिले असेल --- नुसते लुबाडण्यापेक्षा खून करणे फार वेगळे आहे.

जर प्रेत लगेच उघडकीला आले नाही तर रसेल चौकातील हॉटेलमध्ये वू लिंगला फसवणाऱ्या चिन्याबरोबर त्याचा मृत्यू ठरलेला होता. बहुधा वू लिंगने त्याला त्याच्यातील व चार्ल्स लेस्टरमधील गुफ्तगू

सांगितले असावे. त्यामुळे लेस्टरने त्याला रसेल चौकातील हॉटेलमध्ये बोलावले असावे. इथे पिअर्सनला त्याच्यावरून संशय दूर करण्याची छान संधी मिळाली. वू लिंगबरोबर पाहिलेली शेवटची व्यक्ती मिस्टर पिअर्सन ही होती.

"फसवणाऱ्याला अशी ताकीद दिलेली होती, की त्याने वू लिंगचा नोकर असल्याची बतावणी करायची आणि त्याला शक्य तितक्या लवकर लाइमहाउसमध्ये आणायचे. तिथे त्याला पेयपानाबद्दल विचारले जाणे, सहज शक्य होते अंमली पदार्थ मिसळलेले खाणे तयार होते. मग तासाभराने लेस्टर आला, तेव्हा त्याला काय दिसले तर वू लिंग गुदमरलेला होता. पण वू लींगला मेलेले पाहिल्यावर लेस्टर इतका घाबरला, की तो कधी लाइमहाउसमध्ये पोचला होता, हे नाकारू लागला.

त्यामुळे अर्थात तो पिअर्सनच्या हातात पडला. पण पिअर्सनचे समाधान झाले का? नाही. माझ्या पद्धतीने तो अस्वस्थ झाला. त्याने लेस्टर विरुद्ध केस पूर्ण करायचे ठरवले. त्यामुळे त्याने उबग येईल, असा बेत ठरवला. मी, याचा पूर्णपणे फायदा घ्यायचे ठरवले. मी आताच म्हटले नाही का, की तो लहान मुलासारखा आपण चांगले व निरागस असल्याचे ढोंग करतो आहे. अरे मित्रा, मीदेखील माझे नाटक चालू ठेवले. तो आनंदाने घरी गेला. पण सकाळी इन्स्पेक्टर मिलर त्याच्या दारात हजर झाला. कागद त्याच्याकडे सापडले. खेळ संपला. त्याने हर्क्युल पायरोबरोबर नाटक केल्याचे, कटूपणे खंत करत मान्य केले. या प्रकरणात खरी एकच अडचण होती."

मी चौकसपणे विचारले, “ती काय होती?”

“इन्स्पेक्टर मिलरची खात्री पटवणे! तो काय पशू होता! दोघेही, हट्टी आणि मूर्ख! शेवटी सगळे खापर त्याच्यावर फुटले.”

मी ओरडलो, “फार वाईट!”

“आहा, ठीक आहे. माझी भरपाई झाली आहे. बर्मा माईन्सच्या इतर संचालकांनी मला कंपनीचे चौदा हजार शेअर्स माझ्या सेवेसाठी मला बहाल केले. काय वाईट नाही, नाही का?

पण मी तुला सावध करतो हेस्टीग्ज, की पैसे गुंतवताना ठामपणे पारंपारिक मूल्ये विसरू नकोस. तुम्ही वर्तमानपत्रात वाचता, त्या गोष्टी खऱ्या असतीलच असे नाही. अनेक संचालक पिअर्सनसारखे काटेरी साळिंदर असू शकतील!”

# THE MILLION DOLLAR BOND ROBBERY

# लाख डॉलरच्या रोख्यांची चोरी



## एक

एका सकाळी वर्तमानपत्राशेजारी लवंडलो असताना मी निरीक्षण करून उद्गार काढले, “अलीकडे किती रोखे चोरले जात आहेत! पायरो, आपण हे गुन्हा शोधून काढायचे काम सोडून देऊ आणि त्याऐवजी गुन्हा करायला लागू.”

“तू असे कसे काय म्हणू शकतोस? काय रे मित्रा, तू झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग चोखाळणार आहेस का?

“लंडन आणि स्कॉटीश बँक न्यूयॉर्कला पाठवत असलेले लाख डॉलर किमतीचे लिबर्टी रोखे, अचानक आक्रमक पद्धतीने ऑलीम्पिया बोटीतून नाहीसे केले गेले, ही मोठी बेकायदेशीर बातमी बघ.”

पायरो स्वप्नाळूपणे बोलला, “जर ते खाडी ओलांडनाताच्या काही तासांच्या वेळात, समुद्र लागण्याच्या आजार बरा करण्याच्या नावाखाली, केले गेले असेल, तर मला अशा मोठ्या बोटीने प्रवास करण्यात आनंद वाटेल.

मी उत्साहाने म्हणाली, “हो, खरे आहे. त्यातील काही बोटी तर राजवाड्यासारख्या असतील. त्यात पोहायचे तलाव, उपहारगृहे, पामच्या बागा --- खरेच, एखाद्याचा विश्वास बसणार नाही की तो समुद्रावरील बोटीत आहे.”

पायरो दुःखाने बोलला, “मी समुद्रावर असतो, तेव्हा मला ते चांगले ठाऊक असते. ते मला सांगत नाहीत. पण सहज क्षमतेने मिळवलेले पोलोचे सर्व गुण माझे मित्र प्रवासात क्षणभर दडवून ठेवतात. हे तरंगते राजवाडे --- त्याना तसेच म्हणायला हवे --- तिथे एखाद्याला गुन्हेगार जगातील पण जन्माने उच्चवर्गीय उमराव असणाऱ्याला, भेटवते.”

मी हसलो. “म्हणजे तुझा उत्साह असा धावतो तर! लिबर्टी रोखे चोरणाऱ्याशी तू तलवारीचे दोन हातच केले असतेस.”

आमच्या मालकीणबाई तिथे आल्या. “एक तरूण बाई तुम्हाला भेटायला आली आहे. मिस्टर पायरो, हे तिचे कार्ड.”

कार्डावर लिहिले होते, ‘मिस इस्मी फारक्युहर’ पायरोने टेबलाखाली लोळण घेत एक चुकार पावाचा तुकडा उचलला व तो काळजीपूर्वक केराच्या बादलीत टाकला. नंतर मान हलवत त्या बाईला वर पाठवायला सांगितले.

त्यानंतरच्या मिनिटाला मी पाहिलेली सर्वात सुंदर मुलगी खोलीत अवतरली. ती पंचवीस वर्षांची असावी. तिचे डोळे मोठे असून तपकिरी होते आणि बांधा एकदम कमनीय होता. तिने छान कपडे केले होते आणि ती चांगल्या रीतीभातीची दिसत होती.

“बाईसाहेब, बसा. हा माझा मित्र कॅप्टन हेस्टीग्ज आहे. तो मला माझ्या कामात मदत करतो.”

ती मुलगी बसतांना माझ्याकडे बघून वाकत म्हणाली, “मला भीती वाटते, मिस्टर पायरो, की मी घेऊन आलेली समस्या मोठी आहे. मला वाटते तुम्ही याविषयी वर्तमानपत्रात वाचले असेल. मी ऑलीम्पिया बोटीतून नाहीसे केल्या गेलेल्या लिबर्टी रोख्यांबद्दल बोलते आहे.” पायरोच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसले असणार. कारण तिने लगेच पुढे बोलायला सुरवात केली, “लंडन आणि स्कॉटीश बँकेसारख्या संस्थेशी माझा काय संबंध, असा विचार तुम्ही करत असणार. तसे पाहिले तर काही नाही. पण दुसऱ्या बाजूने पाहिले तर खूपच जवळचा संबंध आहे. मिस्टर पायरो, असे बघा, मिस्टर फिलीप रीड्गवेशी माझा साखरपुडा झाला आहे.”

“आहा, मिस्टर फिलीप रीड्गवे --- “

“ते चोरले गेले, तेव्हा ते त्याच्या अधिकारात होते. तसा त्याच्यावर सरळसरळ ठपका ठेवता येणार नाही. ती काही त्याची चूक नव्हती. पण तो अर्धामुर्धा खट्टू झाला आहे. आणि त्याचे काका ठासून सांगत आहेत, की त्याने निष्काळजीपणा करुन ते त्याच्या ताब्यात असल्याचे सांगितले असावे. हे त्याच्या करिअरला काळीमा फासणारे आहे.”

“त्याचे काका कोण आहेत?’

“मिस्टर वॅवासोर, लंडन आणि स्कॉटीश बँकेचे एक जनरल व्यवस्थापक.”

“मिस फारक्युहर, तुम्ही मला सर्व हकीगत सांगाल का?”

“ठीक आहे. तुम्हाला माहिती आहे त्याप्रमाणे, बँकेला तिचा व्यवसाय अमेरिकेत वाढवायचा आहे. आणि त्यासाठी लिबर्टी रोख्यांमध्ये बँक एक लाख डॉलर्स न्यूयॉर्कला पाठवायचे ठरवते. मिस्टर वॅवासोरने त्यासाठी न्यूयॉर्कच्या बँकेशी झालेले सर्व व्यवहार पूर्णपणे माहिती असलेल्या व गेली अनेक वर्षे बँकेत काम केलेल्या विश्वासू अशा त्याच्या पुतण्याची निवड केली. त्याप्रमाणे तो बोटीने प्रवास करत होता. ऑलीम्पिया बोट लिव्हरपूलपासून २३ तारखेला निघाली. त्या दिवशी सकाळी लंडन आणि स्कॉटीश बँकेच्या मिस्टर वॅवासोर व मिस्टर शॉ या दोन जनरल व्यवस्थापकांनी ते रोखे फिलिपच्या हवाली केले. ते मोजले गेले. पाकिटात भरले गेले आणि त्यांच्यासमोर सीलबंद करून लगेच त्याच्या मोठ्या बॅगेत ठेवले गेले.”

“सर्वसामान्य कुलूप असलेली मोठी बॅग?”

“नाही. मिस्टर शॉ यांनी आग्रह केला, की त्या बॅगेला हब्स कंपनीचे खास असे वेगळे कुलूप लावले जावे. आणि फिलीप यांनी ते रोखे बॅगेच्या तळाशी ठेऊन, ते खास कुलूप लावले. न्यूयॉर्कला पोचायच्या थोडे आधी ते चोरले गेले. सर्व बोट कसून तपासण्यात आली. पण काही उपयोग झाला नाही. ते बहुधा खरेच हवेत विरून गेले.”

पायरोच्या चेहऱ्यावर नापसंतीदर्शक रागीट भाव दिसले.

“पण ते अजिबात नाहीसे झाले नाहीत. कारण मला असे समजले, की ते अर्ध्या तासात लहान पाकीटांच्या स्वरूपात *ऑलीम्पियाच्या* डॉकमध्ये विकले गेले. तेव्हा आता मला संशयातीतपणे मिस्टर रीड्गवेला भेटणे आले.”

“मी असे सुचवणार होते, की तुम्ही माझ्याबरोबर ‘चेशायर चीज’ मध्ये जेवण घ्या. तिथे फिलीप असेल. तो मला भेटेल. पण त्याला अजून माहिती नसेल की मी या प्रकरणात, त्याच्या वतीने तुमचा सल्ला घेण्याचे काम करते आहे.”

आम्ही या सूचनेवर आनंदाने शिक्कामोर्तब केले. आणि तिथे टॅक्सीने गेलो.

मिस्टर फिलीप रीड्गवे तिथे आमच्या आधीच पोचला होता. आणि त्याच्या वाग्दत्त वधूला दोन अनोळखी माणसांबरोबर येतांना पाहून आश्चर्यचकित झाला. तो छान दिसणारा व त्याची जाणीव असणारा उंच तरुण होता. जरी तो तीसपेक्षा अधिक वयाचा नसला, तरी कानशीलावर त्याचे केस थोडे करडे होऊ लागले होते.

मिस फारक्युहर पुढे गेली व तिचे हात त्याच्या दंडावर ठेवत, बोलली, “फिलीप, तुला न विचारता, मी हे पाऊल उचलल्याबद्दल माफ कर. मला तुझी ओळख मिस्टर हर्क्युल पायरोशी व त्याचा मित्र कॅप्टन हेस्टीग्जशी करून देऊ दे. तू त्यांच्याबद्दल ऐकले असशील.”

रीड्गवे फारच आश्चर्यचकित झालेला दिसला. “मिस्टर पायरो, अर्थात मी तुमच्याबद्दल ऐकले आहे.” असे बोलत त्याने हातमिळवणी केली. “पण इस्मी माझ्या --- आमच्या त्रासाबद्दल तुमचा सल्ला घ्यायचा विचार करत असल्याची, मला कल्पना नव्हती.”

मिस फारक्युहर शांतपणे बोलली, “फिलीप, मला भीती वाटत होती, की तू मला हे करून देशील की नाही.”

तो हसून म्हणाला, “म्हणजे तू मी सुरक्षित असण्याची काळजी घेतलीस. मला आशा आहे की मिस्टर पायरो या असामान्य कोड्यावर प्रकाश टाकतील. कारण याबद्दलच्या काळजीने व चिंतेने मी पोखरून निघालो आहे.”

खरेच त्याचा चेहरा ओढलेला व सुरकुतलेला दिसत होता. त्याच्यावरील ताण स्पष्ट दिसत होता.

पायरो बोलला, “ठीक आहे. ठीक आहे. आपण आता जेवण करू आणि त्यानंतर आपली डोकी यात घालून, काय करता येईल, ते बघू. मला रीड्गवेच्या तोंडून, त्याची गोष्ट ऐकायची आहे.”

आम्ही तेथील छानपैकी स्टेक आणि किडनी केक खाल्ला. रीड्गवेने रोखे नाहीसे होण्यापर्यंतची सर्व हकीगत सांगितली. ती मिस

फारक्युहरने सांगितलेल्या गोष्टींशी तंतोतंत मिळतीजुळती होती. जेव्हा त्याचे सांगून झाले, तेव्हा पायरोने तोच धागा पुढे नेत विचारले, "मिस्टर रीड्गवे, रोखे चोरीला गेले आहेत, हे तुम्हाला कसे समजले?"

तो कटूपणे हसला. "मिस्टर पायरो, माझ्या हातून ते हरवले नसते. पण भिंतीला चिकटवलेल्या पलंगाखाली ठेवलेली माझी ती बॅग अर्धी बाहेर आलेली होती. तिच्यावर ओरखडे पडले होते व कापली गेली होती. त्यांनी कुलूप उघडायचा प्रयत्न केला असावा."

"पण मला तर समजले की ती किल्लीने उघडली गेली."

"ते बरोबर आहे. त्यांनी बळ वापरून, ती उघडायचा प्रयत्न केला. पण ते जमेना. शेवटी त्याना ती कशीबशी उघडता आली."

मला पूर्ण माहिती असणारे, पायरोचे हिरवे डोळे चमकू लागले. तो म्हणाला, "हे चमत्कारिक वाटते. त्यांनी ती उघडण्याचा प्रयत्न करण्यात खूप वेळ घालवला. आणि मग --- अरे देवा! त्याना आठवले, त्यांच्याकडे किल्ली आहे. कारण प्रत्येक संस्थेची कुलुपे वेगळी असतात."

"म्हणूनच त्यांच्याकडे किल्ली नसणार. ती दिवसरात्र सतत माझ्याबरोबर होती."

"तुमची तशी खात्री आहे का?"

"हो, मी ते शपथेवर सांगू शकतो. आणि शिवाय जर त्यांच्याकडे मूळ किल्ली किंवा तिची नकली किल्ली असती, तर त्यांनी न उघडणारे कुलूप जोर लाऊन उघडण्यात शक्ती आणि वेळ का खर्च केला असता?"

“तोच प्रश्न आम्ही स्वतःला विचारत आहोत. मी असा तर्क करण्याचे धाडस करू शकतो, की जर याची काही उकल आपल्याला सापडलीच, तरी आपण या मुद्द्यावर थोडे अडखळूच. मी तुम्हाला अजून एक प्रश्न विचारला, तर कृपया माझ्यावर हल्ला करू नका. *तुमची पूर्ण खात्री आहे का, की तुम्ही बॅग कुलुपबंद न करता नक्की ठेवली नव्हती?”*

फिलीप रीड्गवे फक्त त्याच्याकडे बघत राहिला. पायरोने माफी मागितल्यासरखे हावभाव केले.

“पण मी तुम्हाला सांगतो, अशा गोष्टी होतात. ठीक आहे. रोखे बॅगेतून चोरले गेले. चोराने त्याचे काय केले? तो ते घेऊन बोटीतून बाहेर पडून किनाऱ्यावर कसा काय जाऊ शकला?”

रीड्गवे ओरडला, “तेच तर! कसा? कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना सुद्धा सांगितले गेले होते. आणि बोटीतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येकाची कसून तपासणी केली जात होती.

“मला वाटते, रोखे चांगले वजनदार होते?

“हो, नक्कीच होते. ते लपवून बाहेर पडणे अवघड होते --- आणि काही झाले तरी, ते तसे नव्हते, कारण तिथे बोट लागल्यापासून अर्ध्या तासात, ते विक्रीला काढले गेले. आम्ही तारा व फोन क्रमांक बाहेर पाठवण्यापूर्वी! पण तुम्ही वायरलेस पद्धतीने रोखे बाहेर पाठवू शकत नाही.”

“वायरलेस पद्धतीने रोखे बाहेर पाठवू शकत नाही, ठीक आहे. पण बाजूची एखादी छोटी बोट ते करू शकत नाही का?”

“फक्त परवानगी असलेल्या बोटीच. आणि ते सुद्धा जेव्हा सगळीकडे पहारे असतात, तेव्हा भोंगा वाजल्यानंतर! मी स्वतः ते बाहेर कुणाला दिले जात आहेत का, त्याचे निरीक्षण करत होतो. देवा रे, मिस्टर पायरो, याने मला वेड लागेल! लोक असे बोलू लागले आहेत, की मी ते स्वतःच चोरले.”

पायरोने सभ्यपणे विचारले, “पण बोट जमिनीला लागल्यावर तुमचीदेखील तपासणी केली गेली, नाही का?

“हो.”

तरुण माणसाने त्याच्याकडे गोंधळून पाहिले.”

पायरो हसत बोलला, “तुम्हाला माझ्या बोलण्याचा अर्थ समजला नाही. आता मला बँकेत काही चौकशा करायला आवडेल.”

रीड्गवेने एक कार्ड दिले व त्यावर काही शब्द लिहिले: “हे पाठवा आणि माझे काका लगेच तुम्हाला भेटतील.”

पायरोने त्यांचे आभार मानले. मिस फारक्युहरचा निरोप घेतला. आणि जिथे लंडन आणि स्कॉटीश बँकेचे मुख्य कार्यालय होते, त्या थ्रेडनीडल रस्त्यासाठी आम्ही दोघे निघालो. रीड्गवेने दिलेले कार्ड आत पाठवल्यावर, बऱ्याच भुलभुलैयातुन जात पैसे देणाऱ्या व घेणाऱ्या कारकुनांपाशी पहिल्या मजल्यावरील धक्कादायक लहानशा कार्यालयात जाऊन पोचलो. तिथे जनरल व्यवस्थापकांच्या जोडीने आमचे स्वागत केले. ते दोघे खूप वर्षे बँकेत नोकरी केलेले थंड गृहस्थ होते. मिस्टर वॅवासोर यांची

लहानशी पांढरी दाढी होती आणि मिस्टर शॉ यांनी घोटून दाढी केलेली होती.

मिस्टर वॅवासोर म्हणाले, "मला वाटते, तुम्ही खासगी गुप्तहेर आहात? असो. आम्ही अर्थात स्कॉटलंड यार्डला कळवले आहेच. इन्स्पेक्टर मॅकनील याच्याकडे आमची केस सोपवली गेली आहे. मला वाटते, तो चांगल्यापैकी काम करणारा आहे."

पायरो नम्रपणे म्हणाला, "माझी तशी खात्री आहे. तुमच्या पुतण्याचा वतीने मला तुम्ही काही प्रश्न विचारण्याची परवानगी द्याल? कुलुपाच्या कंपनीकडून कुलुपाची मागणी कुणी नोंदवली?"

मिस्टर शॉ म्हणाले, "मी स्वतः नोंदवली. या बाबतीत मी कुणा कारकुनावर विश्वास ठेवला नाही. किल्लीचे म्हणाल, तर मिस्टर रीड्गवे कडे एक होती. इतर दोनपैकी एक माझ्याकडे व एक माझ्या सहकाऱ्याकडे होती."

"आणि कुठल्याही कारकुनाचा त्याच्याशी काही संबंध नव्हता?"

मिस्टर शॉ प्रश्नार्थकपणे मिस्टर वॅवासोरकडे वळले.

"मला वाटते, मी असे म्हणालो, ते बरोबर आहे, की मी २३ तारखेला त्या उरलेल्या दोन किल्ल्या सुरक्षित लॉकरमध्ये ठेवल्या. पंधरवड्यापूर्वी माझा सहकारी दुर्दैवाने आजारी पडला --- जेव्हा फिलीप इथून गेला, खरे तर त्याच दिवशी तो नुकताच बरा झाला होता."

खंत करत मिस्टर शॉ बोलले, "माझ्या वयाच्या माणसाला भयंकर दमा होणे, ही काही साधीसुधी गोष्ट नाही. पण मला भीती वाटते, मी इथे

नाही, ही संधी साधून मिस्टर वॅव्हॅसोर जास्त काम करत राहिले. विशेषतः सर्वात वरकडी त्यांच्या काळजी करण्याने झाली.”

पायरोने अजून काही प्रश्न विचारले. मला वाटते तो काका व पुतण्या यांचे संबध किती जवळचे आहेत, ते आजमावत होता. मिस्टर वॅवासोर यांची उत्तरे योग्य वर्तन दाखवणारी, पण त्रोटक होती. त्यांचा पुतण्या, हा बँकेचा विश्वासू माणूस होता. त्याला कर्जे वा पैसा याविषयी काही अडचणी नव्हत्या. त्यांनी अशी कामे पूर्वी केलेली होती. शेवटी आम्ही त्यांना अभिवादन करून बाहेर पडलो.

आम्ही रस्त्यावर आल्यावर, पायरो म्हणाला, “मी खट्टू झालो.”

“तुला अजून काही शोधून काढायची आशा आहे का? ते मरगळलेले म्हातारे आहेत.”

पण मित्रा, मला त्यांच्या मरगळलेपणाचा त्रास झाला नाही. बँकेचा व्यवस्थापक पैशाच्या बाबतीत घारीच्या तीक्ष्ण नजरेचा असावा, अशी ललित वाङ्मयात असते तशी, माझी अपेक्षा नव्हती. पण माझी निराशा झाली, कारण ही केस --- फारच सोपी आहे!”

“सोपी?’

“हो. ही तुला पोरकट खेळातली वाटत नाही का?”

“तुला समजले का, कोणी रोखे चोरले?”

“हो, समजले.”

“पण मग --- आपण काही करायला पाहिजे --- नाही का?”

“हो.”

“हेस्टीग्ज, रागावून गोंधळून जाऊ नकोस. आपण आता काही करणार नाही आहोत.”

“पण का? तू कशासाठी थांबतो आहेस?”

“ऑलीम्पियासाठी. मंगळवारी तिची न्यूयॉर्कपासून परतीची फेरी आहे.”

“पण जर तुला समजले आहे, की कुणी रोखे चोरले, तर का थांबायचे? तो निसटू शकेल.”

“माझ्या मित्रा, जिथे शरण आलेल्या ज्याच्याविरुद्ध पुरावा सापडत नाही, अशा गुन्हेगाराला काही अटींवर एका राज्याकडून वा देशाकडून दुसऱ्याच्या हवाली केले जाते, अशा दक्षिणेकडील समुद्रातील एका बेटावर त्याला ठेवले जाते. नाही. माझ्या मित्रा, त्याला तिथे फार चांगले आयुष्य मिळणार नाही. मी का थांबलो आहे --- ठीक आहे, हर्क्युल पायरोच्या बुद्धिमत्तेसाठी केस अगदी स्पष्ट आहे. पण ज्यांना फारशी बुद्धिमत्ता लाभली नाही अशा इतरांच्या कल्याणासाठी --- उदाहरणार्थ इन्स्पेक्टर मॅकनील --- गोष्टी सिद्ध होण्यासाठी काही चौकशा करणे ठीक राहील. माझ्यापेक्षा कमी बुद्धी असणाऱ्यांचा विचार केला गेला पाहिजे.”

“पायरो, अरे देवा, तुला माहिती आहे का, तुला पूर्णपणे गाढव बनलेले पहाण्यासाठी मी चांगल्यापैकी रक्कम द्यायला तयार आहे --- एकदाच. तू गर्विष्ठपणे इतका गोंधळलेला आहेस!”

“हेस्टीग्ज, फार रागाऊ नकोस. वेगळ्या प्रकारे मला असे दिसते आहे, की कधीकधी तू मला फारच शिव्या देतोस. अरेरे, मी हुशार असल्याची फळे भोगतो.”

त्या लहान माणसाने त्याची छाती पुढे काढली. आणि इतक्या विनोदी पद्धतीने सुस्कारा टाकला, की मला हसूच आले.

मंगळवारी पहिल्या वर्गाच्या डब्यातून, मी आणि पायरो लिव्हरपूलकडे निघालो होतो. पायरोने हट्टाने त्याच्या संशयांबद्दल किंवा खात्रीबद्दल मला सांगायचे नाकारले होते. मी देखील परिस्थितीबद्दल नेमका जाणकार नसल्याचे आश्चर्य दाखवत, माझे स्वतःचे समाधान करून घेतले होते. मी त्याला कःपदार्थ समजून, वाद घालायचे टाळले. मी माझी उत्सुकता दाबून, मी त्या गावचा नसल्यासारखे ढोंग केले.

एकदा अटलांटिक ओलांडून धातूचा धक्का आल्यावर, पायरो दक्ष झाला. बोटीवरील लोकांच्या मदतीसाठी नेमलेल्या चार लोकांची ओळीने मुलाखत घेण्याचे आणि न्यूयॉर्क २३ तारखेला सोडलेल्या पायरोच्या एका मित्राची चौकशी करण्याचे आमचे काम होते.

एक वयाने मोठा चष्मेवाला अपंग माणूस त्याच्या केबिनबाहेर जवळजवळ पडलाच नाही. मिस्टर फिलीप रीड्गवे याच्या शेजारील केबिन, C २४ मध्ये राहणाऱ्या व्हेटनॉर नावाच्या माणसाला, हे वर्णन लागू पडत होते. पायरोला त्याचे आस्तित्व कसे समजले, हे फार कोड्यात टाकणारे होते.

मी त्या माणसावर ओरडलो, “मला सांग, जेव्हा तू न्यूयॉर्कला गेलास, तेव्हा तिथे पहिल्यांदा उतरणाऱ्यांपैकी हा गृहस्थ होता का?”

त्या माणसाने मान हलवली. “नाही, सर. तो बोटीतून शेवटी उतरणाऱ्यांपैकी होता.”

मला लाज वाटली. पायरोला मी तोंड फाकवून हसतांना पाहिले. त्याने त्या माणसाचे आभार मानले. हस्तांदोलन झाले आणि आम्ही निघालो.

मी घुश्श्यात म्हणालो, “सगळे काही ठीक झाले. तू हसत असलास, तरी पण त्या शेवटच्या उत्तराने, नक्कीच तुझी आधीची अमूल्य उपपत्ती कोलमडून पडली असणार!”

मी दुःखाने माझे हात हवेत उडवले.

“मी ते सोडून दिले आहे.”

## दोन

जेव्हा आम्ही वेगाने लंडनकडे निघालेल्या गाडीत बसलो, तेव्हा काही मिनिटे पायरो लिहिण्यात गर्क होता. तो कागद त्याने एका पाकिटात घालून, सीलबंद केला.

“हे इन्स्पेक्टर मॅकनीलसाठी आहे. आपण जातांना हे स्कॉटलंड यार्डकडे देऊ आणि मग रेनडेझव्होअस हॉटेलमध्ये जाऊ. तिथे मी मिस इस्मी फारक्युहरला आपल्याबरोबर जेवायला बोलावले आहे.”

“मिस्टर रीड्गवेचे काय?

पायरोने चमकून विचारले, “त्याचे काय?”

“का, तू नक्कीच विचार करत नाहीस --- तू करू शकत नाहीस.”

“हेस्टीग्ज, अतार्किकता आणि अस्पष्टता यांचा तुझ्यावरील अंमल वाढू लागला आहे. खरे तर मी विचार केला. जर रीड्गवे चोर असेल, तर --- तशी खूप शक्यता आहे --- तर नीट पद्धतशीर कामाची अशी ही केस अजून सुंदर झाली असती.”

‘पण मिस फारक्युहरसाठी सुंदर नव्हे.”

“बहुधा तुझे बरोबर आहे. त्यामुळे सर्व काही चांगले घडो. हेस्टीग्ज, आता आपण केसचा आढावा घेऊ. मला दिसते आहे, की तू त्यासाठी तरसला आहेस. मिस फारक्युहरने सांगितल्याप्रमाणे, बॅगेतील सीलबंद पाकीट हवेत नाहीसे होते. परंतु हल्लीची शास्त्राची झेप बघता, आपण ती गोष्ट उडवून लावू. आणि काय झाले असेल, याचा विचार करू. बोट किनाऱ्याला लागल्यावर, ते चोरले गेल्याची शक्यता प्रत्येकजण नाकारतो आहे.”

“हो, पण आपल्याला माहिती आहे --- “

“हेस्टीग्ज, मला नाही तरी तुला माहिती असेल, की मी असा दृष्टीकोन घेतो, की ज्याअर्थी ते अविश्वसनीय वाटते आहे, त्याअर्थी ते तसेच असावे. दोन शक्यता उरतात: ते पाकीट बोटीवर लपवून ठेवले गेले --- किंवा थोडे अवघड म्हणजे --- ते बोटीवरून फेकले गेले.”

“म्हणजे त्याला बूच लावून, असे तुला म्हणायचे आहे का?”

“बुचाशिवाय.”

मी त्याच्याकडे बघू लागलो. “पण जर रोखे बोटीवरून फेकले गेले असले, तर ते न्यूयॉर्कमध्ये विकले कसे गेले असते?

“हेस्टीग्ज, मी तुझ्या तार्कीकतेला दाद देतो. रोखे न्यूयॉर्कमध्ये विकले गेले, त्यामुळे ते समुद्रात फेकून दिले गेले नाहीत. हे आपल्याला कुठे घेऊन जाते, याचा विचार कर.”

“आपण सुरवात केली, तेव्हा आपण कुठे होतो.”

“जर रोखे समुद्रात फेकले गेले आणि न्यूयॉर्कमध्ये विकले गेले, तर त्या पाकिटात रोखे नसतीलच. पाकिटात रोखे होते, याचा काही पुरावा आहे का? आठव, मिस्टर रीड्गवेने लंडनला त्याच्या हातात ते ठेवले गेल्यापासून उघडले नव्हते.”

“हो, पण मग --- “

पायरोने त्याचा अधीर हात हलवला.

“मला बोलू दे. २३ च्या सकाळी लंडन आणि स्कॉटीश बँकेच्या कार्यालयात ते रोखे शेवटचे पाहिले गेले. नंतर ज्याचे कुणी ऐकत नव्हते, अशा एका माणसाच्या सांगण्यानुसार, ऑलीम्पिया तिथे पोचल्यावर अर्ध्या तासाने ते न्यूयॉर्कमध्ये पाहिले गेले. मग असे घरले तर, की ते ऑलीम्पियावर कधी नव्हतेच. ते न्यूयॉर्कला पोचण्याचा काही दुसरा मार्ग असू शकतो का? हो. ऑलीम्पिया बोट निघाली, त्याच दिवशी सदमप्टनहून जिजँटीक निघाली. आणि अटलांटिक ओलांडण्यात तिचा एक नंबर आहे. ऑलीम्पिया तिथे पोचण्याच्या आधी एक दिवस, जिजँटीकने पोस्टाने रोखे न्यूयॉर्कला पाठवले. सर्व काही स्पष्ट झाले. केस स्वतःच सर्व स्पष्ट करते

आहे. सीलबंद केलेले पाकीट खोटे होते. आणि त्याचे नकली पाकीट बँकेच्च्या कार्यालयातच भरले गेले. तिथे असलेल्या तीन माणसांपैकी कुणालाही हे करणे सोपे होते. ते तयार करून खऱ्या पाकिटाच्च्या जागी ठेवले गेले. न्यूयॉर्कमधील विश्वासू माणसाकडे ते दिले गेले व सांगितले गेले की ऑलीम्पिया तिथे आल्याबरोबर ते विकायचे. हे काही बरे झाले नाही. पण हा चोरीचा क्षण साधण्यासाठी, ऑलीम्पिया वरून कुणीतरी प्रवास करणे जरुरीचे होते."

"पण का?"

"कारण जर रीड्गवेने पाकीट नुसते उघडले असते आणि ते खोटे असल्याचे समजले असते, तर संशय ताबडतोब लंडनला कळवला गेला असता. नाही. त्याच्च्या शेजारील केबिनमधील माणसाने त्याचे काम केले. कुलूप उघडायचा प्रयत्न करून, बॅग वेडीवाकडी चेपटवली व लगेच चोरी झाल्याचा आभास निर्माण केला. खरे तर नकली किल्लीने बॅग उघडून, पाकीट समुद्रात फेकून दिले आणि शेवटचा माणूस बोटीवरून उतरेपर्यंत थांबला. अर्थात त्याने त्याचे डोळे लपवण्यासाठी, चष्मा घातला आणि तो अपंग असल्याचे सोंग केले. कारण त्याला रीड्गवे भेटायचा धोका घ्यायचा नव्हता. तो न्यूयॉर्कला बंदरावर उतरला आणि मिळालेल्या पहिल्या बोटीने परतला."

"पण तो --- कोण होता?"

"ज्याच्याकडे नकली किल्ली होती, ज्याने कुलुपाची मागणी नोंदवली, जो खरे तर देशातील त्याच्च्या घरात दम्याने फारसा आजारी

नव्हता --- थोडक्यात, जाड मिस्टर शॉ! माझ्या मित्रा, वरच्या हुद्द्यावरचे लोकदेखील कधीकधी गुन्हेगार असू शकतात. आहा, आपण इथे आलो. बाईसाहेब, मी यशस्वी झालो. सर्व काही सांगायला तुमची परवानगी आहे?"

आणि चकाकत, पायरोने आश्चर्यात बुडालेल्या मुलीच्या गालाचे चुंबन घेतले!

THE CORNISH MYSTERY

# कॉर्निश गूढ



आमच्या मालकीणबाईंनी जाहीर केले, “मिसेस पेनगेल्ली” आणि नम्रपणा दाखवत, निघून गेली.

खूप अपेक्षित नसलेले लोक पायरोचा सल्ला मागायला येत. पण तिच्या गळ्यापर्यंत घातलेल्या पिसाच्या झग्याकडे बोट दाखवत दाराच्या थोडे आत उदासीने उभे राहणारी बाई, सर्वात अनपेक्षित होती. ती खूप असामान्यपणे सामान्य होती --- साधारण पन्नाशीची, नवरीच्या कोटात व स्कर्टमध्ये असलेली, गळ्यात काही सोन्याचे दागिने घातलेली, बेकार टोपीतून करडे केस दिसत असलेली, अशी ती बारीक, अशक्त बाई होती.

गावाकडील रस्त्यावर तुम्हाला अशा शेकडो मिसेस पेनगेल्ली रोज दिसत असतील.

ती लाजत असली, तरी अर्थातच पायरोने पुढे येऊन तिचे आनंदाने स्वागत केले.

“बाईसाहेब, मी तुम्हाला विनंती करतो, खुर्चीत बसा. हा माझा मित्र व सहकारी मिस्टर हेस्टीग्ज आहे.”

ती बाई बसली. ती खात्री नसल्यासारखी पुटपुटत होती, “तुम्ही गुप्तहेर मिस्टर पायरो आहात का?”

“हो, मी तुमची काय सेवा करू शकतो?”

पण आमची पाहुणी अजून बोलायला तयार नव्हती. तिने सुस्कारा टाकला. ती अधिकाधिक लाललाल होऊ लागली.

“बाईसाहेब, मी तुमच्यासाठी काय करू शकतो?”

“खरे तर, मी विचार केला --- म्हणजे --- असे बघा --- “

“बोला, बाईसाहेब, मी तुम्हाला विनंती करतो, बोला.”

अशा तऱ्हेने मिसेस पेनगेल्लीला उत्तेजन दिल्यावर, तिने स्वतःला सावरले.

“तर अशा तऱ्हेने मिस्टर पायरो, मला पोलिसांशी काही कर्तव्य नाही. नाही. मी कुठल्याही कारणासाठी पोलीसांकडे जाणार नाही. आणि तसेही मला कसलातरी खूप त्रास झाला आहे. आणि तरी मला माहिती नाही, की मी हे करायलाच पाहिजे का, की --- “ ती एकदम थांबली.

माझे पोलिसांशी काही काम नसते. माझा तपास पूर्णपणे खासगी आहे.”

मिसेस पेनगेल्ली त्या शब्दात अडकली. “खासगी? मला तेच हवे आहे. मला कोणी चर्चा करायला वा ते वर्तमानपत्रात छापून यायला नको आहे. ते दुष्टपणाचे आहे. ते अशा प्रकारे गोष्टी लिहितात, की कुटुंबाला डोके वर काढायला जागा रहात नाही. आणि मी याबद्दल सुद्धा खात्री देऊ शकत नाही, की ही भयंकर कल्पना माझ्या मनात येते आणि मग ती डोक्यातून काही केल्या जात नाही.” ती श्वास घ्यायला थांबली. आणि मग सर्व वेळ मी दुष्टपणे एडवर्डच्या चुका काढत बसू शकते. कुठल्याही पत्नीकरता हा वाईट विचार आहे. पण हल्ली अशा काही गोष्टी वाचनात येतात.”

“मी जरा मध्ये बोलू का? --- हे तुमच्या नवऱ्याबद्दल तुम्ही बोलत आहात का?

“हो.”

“आणि तुम्हाला त्याचा कशाबद्दल संशय आहे?”

“मिस्टर पायरो, मला ते सांगायलाही आवडत नाही. पण तुम्ही अशा गोष्टी होतांना वाचले असेल --- आणि बिचारे लोक कसला संशय घेत नाहीत.”

मी निराश होऊन ती बाई कधी मुद्द्यावर येते, त्याची वाट पहात होतो. पण पायरोची सहनशीलता व त्यावरील पकड खूप होती.

“बाईसाहेब, भीती न वाटता बोला. जर तुमचा संशय खोटा ठरल्याचे आम्ही सिद्ध केले, तर तुमचा आनंद किती मोठा असेल, याचा विचार करा.”

“ते खरे आहे --- अशी शंका बाळगत बसण्यापेक्षा काहीही बरे. ओहो मिस्टर पायरो. मला फार भीती वाटते, की माझ्यावर विषप्रयोग झाला आहे.”

“असे तुम्हाला का वाटते?”

मिसेस पेनगेल्लीने तिचा अबोला सोडून, तिच्या डॉक्टरांना सांगावे, तसे तिच्या प्रकृतीबद्दल सर्व काही सांगायला सुरवात केली.

पायरो म्हणाला. “कळा व आजारपण जेवल्यामुळे येते का? बाईसाहेब तुम्ही डॉक्टरांकडे जाता का? तो काय म्हणतो?”

“तो म्हणतो हा जठराच्या अस्तराचा जोरदार दाह आहे. पण मला दिसते, की तो अस्वस्थ व कोड्यात पडलेला आहे. तो नेहमी औषधे बदलतो पण त्याने काही फरक पडत नाही.”

“तुम्ही तुमच्या भीतीबद्दल त्याला सांगितले का?”

“नाही मिस्टर पायरो, ते शहरातील रहाणीचे दुखणे असावे व जठराच्या अस्तराचा जोरदार दाहच असावा. हे विचित्र आहे, की एडवर्ड जेव्हा शनिवार रविवार बाहेर असतो, तेव्हा मी बरी असते. फ्रेडा, माझी पुतणी --- तिच्यासुद्धा हे लक्षात आले आहे. आणि मग ती तण नष्ट करायची, कधी न वापरलेली बाटली आहे. माळी म्हणतो, तरीही ती अर्धी रिकामी आहे.”

तिने दीनवाणेपणे पायरोकडे पाहिले. त्याने तिच्याकडे आश्वासकपणे हसून पाहिले आणि वही पेन्सिल आणायला गेला.

“बाईसाहेब, आपण भावनिक दृष्टीकोनातून विचार करायला नको. तुम्ही आणि तुमचा नवरा कुठे रहात आहात? ---”

“कॉर्नवॉलमधील, एका लहानशा, बाजार असलेल्या गावात, पोल्गार्वीथ इथे.”

“तुम्ही तिथे किती वर्षे रहात आहात?”

“चौदा वर्षे.”

आणि घरात तुम्ही दोघेच असता, की मुले आहेत?

“नाही.”

मला वाटते, तुम्ही म्हणालात की एक भाची असते.”

“हो, फ्रेडा स्टॅन्टन. माझ्या नवऱ्याच्या एकुलत्या एक बहिणीची मुलगी. ती गेले आठ वर्षे आमच्याबरोबर रहात आहे --- म्हणजे आठवड्यापूर्वीपर्यंत.”

“आणि आठवड्यापूर्वी काय झाले?”

“काही वेळ गोष्टी सुरळीत नव्हत्या. फ्रेडाला काय झाले, माहिती नाही. ती इतकी उद्धट आणि बेपर्वा झाली आणि धक्कादायक वागू लागली. शेवटी एक दिवस ती निघून गेली. तिने याच शहरात दुसरी जागा घेतली. तेव्हापासून मी तिला पाहिले नाही. मिस्टर रॅडनॉर म्हणाले, की तिचे तिला भानावर येऊ दे.”

“मिस्टर रॅडनॉर कोण आहेत?”

मिसेस पेनगेल्ली परत पूर्वीसारखी लाजू लागली. “ओहो, तो फक्त मित्र आहे. तो फार आल्हादक तरुण आहे.”

“त्याचे आणि तुमच्या पुतणीचे काही होते का?”

मिसेस पेनगेल्ली जोर देत म्हणाली, “नाही. काही नाही.”

पायरोने बोलण्याचा रोख बदलला.

“मला वाटते, तुम्ही आणि तुमचा नवरा आरामशीर परिस्थितीत आहात?”

“हो, आमचे छान चालले आहे.”

“पैसे तुमचे आहेत की तुमच्या नवऱ्याचे?”

“ओहो, ते एडवर्डचे आहेत. मला माझे असे पैसे नाहीत.”

“असे बघा बाईसाहेब, आपण सडेतोड असले पाहिजे. आपण व्यावहारीक दृष्टीकोनातून विचार करू. आपण उद्दिष्ट काय होते, हा विचार करू. तुमचा नवरा काही तुम्हाला वेळ जात नाही म्हणून विष देणार नाही. तुम्हाला त्याच्या मार्गातून दूर करायचे काही कारण तुम्हाला दिसते आहे का?”

मिसेस पेनगेल्ली रागाच्या जोरात म्हणाली, “तिथे त्याच्यासाठी काम करणारी सोनेरी केसांची एक बया आहे. माझा नवरा दंतवैद्य आहे. मिस्टर पायरो, तो म्हणतो, त्याप्रमाणे त्याला रुग्णांची वेळ ठरवण्यासाठी व त्याच्या कामात मदत करण्यासाठी एका बॉबकट केलेल्या, गोऱ्या हुशार

मुलीची गरज आहे. माझ्या कानावर असे आले आहे, जरी तो नाही म्हणतो, तरी त्यांचे छान काही चालू आहे.”

“बाईसाहेब ही तण नष्ट करायची बाटली कुणी मागवली?”

“माझ्या नवऱ्याने वर्षापूर्वी मागवली.”

“तुमच्या भाचीकडे तिचे असे पैसे आहेत का?”

“वर्षाला पन्नास पौंड असावेत. जर मी एडवर्डला सोडले, तर ती आनंदाने परत येईल व त्याच्यासाठी घर चालवेल.”

“तुम्ही त्याला सोडायचा विचार करत आहात का?”

“मी त्याला त्याच्या मर्जीप्रमाणे वागू देणार नाही. मिस्टर पायरो, जुन्या जमान्यातील असल्याप्रमाणे स्त्रिया काही आता नवऱ्याची दासी राहिल्या नाहीत.”

“तुमचा स्वतंत्र विचारांबद्दल, मी तुमचे अभिनंदन करतो. पण आपण व्यावहारिक असले पाहिजे. तुम्ही आज पोल्गार्वीथला परत जाणार आहात का?”

“हो, मी इथे फिरत आले. सकाळी सहाला गाडी सुरु झाली आणि संध्याकाळी पाचला ती परतते.”

“आरामशीर! मला आता काही काम नाही आहे. मी तुमची केस घेऊ शकतो. उद्या मी पोल्गार्वीथला येतो. हेस्टीग्ज, तिथे तुझ्या लांबच्या भावाचा मुलगा रहातो ना? मी त्याचा विचित्र परदेशी मित्र आहे. तोपर्यंत, तुम्ही फक्त तुमच्या हाताने केलेले वा देखरेखीखाली केलेले खाणेच फक्त खा. तुमच्याकडे विश्वासू नोकराणी आहे?”

“मला वाटते, जेसी एक चांगली मुलगी आहे.”

“बाईसाहेब, मग उद्या आम्ही येतो. धीर सोडू नका.”

## दोन

पायरोने त्या बाईचा निरोप घेतला आणि त्याच्या खुर्चीत विचारपूर्वक बसला. त्याचे मनन एवढे खोलवर नव्हते. पण रागावलेल्या बाईने तिच्या बोटाने गुंडाळून, दोन मिनिटे ताणलेला पिसांच्या रूमाल त्याला दिसू शकला नाही. नंतर त्याने त्या चिंध्या नीट गोळा करून कचऱ्याच्या बादलीत फेकून दिल्या.

“हेस्टीग्ज, तू या केसचे काय करतोस?

“मी म्हणेन, हा भिकार उद्योग आहे.”

“हो, जर त्या बाईला असलेला संशय खरा असेल, तर. पण असे आहे का? तण नष्ट करायची विषारी बाटली मागवणाऱ्या कुठल्याही नवऱ्यासाठी आजकाल, दुःख दबा धरून बसलेले असते. जर त्याच्या बायकोला जठराच्या अस्तराचा दाह होण्याचा त्रास असेल आणि ती त्रागा करणारी असेल, तर आगीत तेल ओतल्यासारखेच आहे.”

“तुला वाटते, तिथे एवढेच आहे का?”

“आहा --- प्राचीन इतिहासपूर्वकालीन महाकाय शिकारी प्राणी --- मला माहिती नाही, हेस्टीग्ज --- पण मला त्यांच्यात प्रचंड रुची आहे. कारण असे बघ, त्यांच्यात काहीच नवी गोष्ट नाही. त्यामुळे आक्रमक उपपत्ती!

आणि तरीही मिसेस पेनगेल्ली मला हिंसक बाई वाटली नाही. हो, माझी चूक होत नसेल, तर आपल्याला इथे माणसांचे फार खेदपूर्ण नाटक बघायला मिळते आहे. हेस्टीग्ज, मला सांग, मिसेस पेनगेल्लीच्या तिच्या नवऱ्याबद्दलच्या भावना काय असाव्यात?"

मी सुचवले, "इमानीपणा विरुद्ध भीती."

"तरीही सामान्यपणे, बाई जगात तिचा नवरा सोडून, कुणालाही शिव्या देईल, तिचा त्याच्यावरील विश्वास कमीजास्त होत राहील."

इतर बायका हे प्रकरण गुंतागुंतीचे करतील."

"हो, हेव्यादाव्यामुळे प्रेम द्वेषात बदलू शकेल. पण द्वेष तिला पोलिसांकडे घेऊन जाईल --- माझ्याकडे नव्हे. तिला मोठ्याने रडण्याची गरज आहे. त्याने मन मोकळे होईल. नाही. नाही. तिला आपल्या करड्या पेशींचा अनुभव घेऊ दे. ती माझ्याकडे का आली? तिचा संशय खोटा किंवा खरा ठरावा म्हणून. आपल्याकडे इथे काही मला न समजणारे असे आहे --- काही गूढ गोष्ट! पेनगेल्ली चांगला अभिनय करणारी आहे का? नाही ते खरे होते. मी शपथपूर्वक सांगतो, की ती अभिनय करत नव्हती. आणि म्हणून मला यात स्वारस्य आहे. माझी तुला विनंती आहे, पोल्गार्वीथला जाणाऱ्या गाड्या बघ."

## तीन

दिवसातील सर्वात चांगली गाडी पॅडीग्टनपासून एक पन्नासला होती. ती पोल्गार्वीथला सातनंतर पोचत होती. प्रवास तसा नीरस होता.

मला छान झोपेमधून उठून लहानशा निर्जन, गार स्टेशनच्या फलाटावर उतरावे लागले. आम्ही आमच्या बॅगा घेऊन, डची हॉटेलला गेलो. हलक्याशा जेवणानंतर पायरोने सुचवले, की आपण माझ्या लांबच्या भावाला फोन करण्यासाठी बाहेर पडू. रस्त्यापासून थोडे मागे जुन्या पद्धतीच्या छोट्या बागेसमोर मिसेस पेनगेल्लीचे घर होते. संध्याकाळच्या झुळुकेबरोबर पांढऱ्या रंगाच्या औषधी वनस्पतीचा व सामानाचा गोडसर वास येत होता. जुन्या जगाच्या गोडव्याबरोबर आक्रमकतेचे विचार जोडणे अशक्य वाटत होते. पायरोने घंटी वाजवली व दारावर टकटक केले. काही उत्तर न मिळाल्याने, त्याने परत घंटी वाजवली. थोड्या वेळाने, एका गबाळया, डोळे लाल झालेल्या व खोकणाऱ्या नोकराणीने दार उघडले.

पायरोने स्पष्ट केले, “आम्हाला मिसेस पेनगेल्लीना भेटायचे आहे. आम्ही आत येऊ का?”

नोकरांणी निरखून बघत राहिली. नंतर वेगळयाच सरळसोट पद्धतीने ती बोलली, “तुम्ही ऐकले नाही का? आज संध्याकाळी अर्ध्या तासापूर्वी, ती वारली.”

आम्ही अवाक होऊन तिच्याकडे बघत राहिलो. “ती कशामुळे मेली?” शेवटी मी विचारले.

“मी काहीसे सांगू शकते.” तिने तिच्या खांद्यावरून मागे एक कटाक्ष टाकला. जर मालकीणबाईंबरोबर कुणी असते, तर मी माझे सामान आवरून चालू पडले असते. पण कोणीच घरात नसतांना, तिला मृत सोडून, मी जाणार नाही. ही काही माझी जागा नाही. गावभर प्रत्येकाला माहिती आहे.

मी काही सांगणार नाही. जर मिस्टर रॅडनॉरने गृह खात्याच्या सचिवाला काही लिहिले नाही, तर कुणीतरी दुसरे लिहील. डॉक्टरला काय सांगायचे, ते तो सांगेल. आज संध्याकाळी मालकाला मांडणीमधून तण मारायच्या औषधाची बाटली खाली काढतांना मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले नाही का? आणि त्याने मला त्याला बघतांना पाहिले, तेव्हा मी उडी मारली नाही का? आणि मालकीणबाईंसाठी केलेली खीर टेबलावर तयार नव्हती का? या घरात असतांना, कुठलाही अन्नाचा कणदेखील माझ्या पोटात गेलेला नाही. ते खाऊन मी मेले असते तर."

"तुझ्या मालकिणीला बघितलेले डॉक्टर कुठे रहातात?"

"डॉ ॲडाम्स. उंच रस्त्याच्या कोपऱ्यावर, दुसरे घर."

पायरो वळून निघून गेला. तो अशक्त दिसत होता.

"मी कोरडेपणे म्हणालो, "जी मुलगी काही सांगणार नव्हती, तिने बरेच काही सांगितले."

पायरोने त्याचा मूठ वळलेला हात तळव्यावर आपटला. "हेस्टीग्ज, मी मूर्ख, मूर्ख गुन्हेगार आहे. मी माझ्या करड्या पेशींच्या खूप बढाया मारल्या. आणि आता माझ्याकडे जीव वाचवायची याचना करणारे एक मानवी आयुष्य, नष्ट झाले आहे. इतक्या लवकर काही होईल, असे माझ्या स्वप्नातही आले नाही. तिची गोष्ट मला कृत्रिम वाटली. चल आपण डॉक्टरकडे आलो. तो आपल्याला काय सांगू शकतो, ते बघू."

# चार

डॉ ॲडाम्स लाल चेहऱ्याचा गावाकडील नेहमीसारखा कल्पनारम्य डॉक्टर होता. त्याने आमचे नम्रपणे स्वागत केले. पण आमचे गाऱ्हाणे ऐकल्यावर त्याचा चेहरा लाल रंगापासून जांभळा झाला.

“खड्ड्यात जावो! तेथील प्रत्येक गोष्ट खड्ड्यात जावो! मी त्या केससाठी हजर होतो नाही का? जठराच्या अस्तराचा जोरदार दाह, इतकी साधी ती केस आहे. पण हे गाव अफवांचा अड्डा आहे --- खूप सारी प्रकरणे चघळणाऱ्या अनेक बायका एकत्र येऊन, देव जाणे काय काय शोध लावतात. ते दुष्कीर्ती पसरवणाऱ्या वर्तमानपत्रातील बातम्या वाचतात आणि कशाचा काही संबंध नसतांना, त्यांच्या गावातील कुणालातरी देखील विषबाधा होते. ते तण मारायच्या विषारी औषधाची बाटली मांडणीत ठेवलेली बघतात आणि --- अचानक जादू होते --- आणि कल्पनांच्या कंड्या पिकायला लागतात. मी एडवर्ड पेनगेल्लीला ओळखतो --- तो त्याच्या आजीच्या कुत्र्यावरही विषप्रयोग करणार नाही. आणि मला सांगा, तो स्वतःच्या बायकोला का मारेल?”

“पण डॉक्टर, तुम्हाला माहिती नसलेली एक गोष्ट आहे.”

पायरोने थोडक्यात मिसेस पेनगेल्लीच्या भेटीबद्दल सांगितले. ते ऐकून डॉक्टर आश्चर्यचकित झाला. तो पायरोकडे डोळे फाडून बघू लागला. तो ओरडला, “देव माझ्या आत्म्यास शांती देवो. ती बिचारी बाई वेडी असली पाहिजे. ती माझ्याशी का बोलली नाही? ती गोष्ट करणे योग्य होते.”

“आणि तिची भीती म्हणजे काय विनोद होता का?”

“मुळीच नव्हता. अजिबात नव्हता. मला वाटते माझे मन खुले आहे.”

पायरो त्याच्याकडे बघून हसला. डॉक्टर, कबूल करत होता, त्यापेक्षा नक्कीच मनाने जास्त उध्वस्त झाला होता. आम्ही तेथून बाहेर पडल्यावर पायरो हसत सुटला. “तो एखाद्या डुकरासारखा हट्टी आहे. त्याने तो जठराच्या अस्तराचा जोरदार दाह असल्याचे सांगितले, म्हणून तसे समजायचे का? पण तो अस्वस्थ झाला, एवढे खरे!”

“आपण आता काय करायचे?”

“अरे मित्रा, आता आपण डची हॉटेलला जाऊ. तेथील भयानक इंग्लिश अंथरुणावर रात्र घालवू. तो स्वस्तातला इंग्लिश पलंग दयनीय आहे.”

“आणि उद्या?”

“त्याचे तुला काय करायचे आहे? आपण लंडनला परत जाऊन, जरा थांबून काय होते, त्याची वाट बघायला हवी.”

मी बोललो, “हे ठीक राहील. पण पुढे काहीच झाले नाही तर?

“होईल. मी नक्की सांगतो, काहीतरी घडेल. आपला डॉक्टर खूष होत, आपल्याला पाहिजे तेवढी प्रमाणपत्रे देईल. तो शेकडो वळवळणाऱ्या जीभा थांबवू शकणार नाही. आणि त्या काही उद्देशाने वळवळतील. मी तुला एवढे सांगू शकतो.”

दुसऱ्या दिवशी सकाळी आमची गाडी अकराला सुटली. आम्ही स्टेशनला जायला निघण्यापूर्वी, पायरोने फ्रेडा स्टॅन्टनला, मृत बाईच्या

पुतणीला भेटायची इच्छा बोलून दाखवली. ती रहात असलेले घर आम्हाला सहज सापडले. तिच्याबरोबर एक काळा, उंच माणूस होता. तिने काहीसे गोंधळून, मिस्टर जेकब रॅडनॉर म्हणून, त्याची ओळख करून दिली.

मिस फ्रेडा स्टॅन्टन जुन्या कॉर्निश वळणाची फार सुंदर मुलगी होती --- काळेभोर केस व डोळे, गुलाबी गाल! डोळ्यातील चमक सांगत होती, की उगीच चिडणे शहाणपणाचे ठरणार नाही.

पायरोने स्वतःची ओळख करून देत, त्याचे काय काम आहे, ते सांगितले तेव्हा ती बोलली, "बिचारी मामी! ही फार दुःखद घटना आहे. मी सकाळभर असा विचार करते आहे, की मी तिच्याशी जास्त दयाळूपणे व संयम ठेऊन वागायला हवे होते."

रॅडनॉर मध्येच बोलला, "फ्रेडा, तू खूप चांगली वागलीस."

ती म्हणाली, "हो, जेकब. पण मला माहिती आहे, माझा स्वभाव कडक आहे. शेवटी मामीचा मूर्खपणा नडला. मी तिला काही न बोलता, फक्त हसायला हवे होते. मामा तिला विष देणार आहेत, असे तिला वाटत होते, तो तिचा मूर्खपणा होता. त्याने तिला काही खायला दिले तरी तिला संशय यायचा --- पण माझी खात्री आहे, की ते जास्त विचार केल्यामुळे तिला वाटत होते. तिला असे नक्की वाटत होते आणि तसेच झाले."

"बाईसाहेब, तुमच्यातील मतभेदाचे नक्की कारण काय होते?"

रॅडनॉरकडे बघून, मिस फ्रेडा स्टॅन्टन कां कू करू लागली. त्या तरूण माणसाला ते लगेच कळले.

“मला गेले पाहिजे फ्रेडा, तुला संध्याकाळी भेटतो. लोकहो अच्छा. मला वाटते तुम्ही स्टेशनला जायला निघाला आहात.”

पायरो तसे असल्याचे बोलला आणि रॅडनॉर बाहेर पडला.

पायरो लबाड हसू हसत बोलला, “तुम्ही दोघे एकमेकांशी वचनबद्ध दिसता?”

फ्रेडाने लाजून, ते मान्य केले. “आणि मामीला तोच त्रास होता.”

“तिला तुमचे हे संबंध मान्य नव्हते का?”

“ओहो, ते तसे नव्हते. पण असे बघा --- ती --- “ ती बोलायचे थांबली.

पायरोने विचारले, “पुढे?”

“तिच्याबद्दल हे बोलणे म्हणजे भयंकर गोष्ट आहे --- आता ती वारली आहे. पण मी हे सांगितल्याशिवाय तुम्हाला कधीच समजणार नाही. ती जेकबच्या प्रेमात पडली होती.”

“खरे की काय?”

“हे विचित्र नव्हते का? ती पन्नासहून अधिक वयाची होती आणि तो अजून तिशीचाही नाही. पण हे असे होते. ती त्याच्यासाठी वेडी झाली होती. मला तिला शेवटी सांगावे लागले, की तो माझ्यामागे आहे --- ती त्यामुळे चिडली. ती त्यावर विश्वास ठेवेना आणि त्यामुळे ती माझ्याशी इतकी उद्धटपणे व अपमानकारक रीतीने वागू लागली, की माझा रागाचा पारा चढला, त्यात काही नवल नाही. मी हे जेकबशी बोलले. आमचे असे

ठरले, की ती भानावर येईपर्यंत थांबलेले चांगले ठरेल. बिचारी मामी! मला वाटते, ती फार विचित्र परिस्थितीत सापडली होती.”

“असेच दिसते आहे. बाईसाहेब या गोष्टी स्पष्ट केल्याबद्दल धन्यवाद!”

## पाच

रॅडनॉर आमच्यासाठी खालील रस्त्यावर थांबलेला बघून आम्हाला थोडे नवल वाटले.

तो बोलला, “फ्रेडा तुम्हाला काय सांगत होती, त्याचा मी अंदाज करू शकतो. ही घडलेली गोष्ट फार दुर्दैवी म्हणावी लागेल. तुम्हाला समजेल, की माझ्यासाठी तर ती फार लाजीरवाणी होती. यात माझा काहीच हात नव्हता. पहिल्यांदा मी खूष झालो. कारण मला वाटले, की ती फ्रेडाला मदत करते आहे. ही सर्व गोष्ट विचित्र होती व फारच नकोशी होती.”

“तुम्ही मिस स्टॅन्टनबरोबर कधी लग्न करणार आहात?”

“मला आशा आहे की लवकरच. मिस्टर पायरो, आता मी तुम्हाला प्रामाणिकपणे सांगतो, की मला फ्रेडापेक्षा थोडे जास्त माहिती आहे. तिला तिचे मामा निरागस वाटतात. पण माझी तशी खात्री नाही. मी तुम्हाला एक गोष्ट सांगू शकतो, की मी मला काय माहिती आहे, त्याविषयी माझे तोंड बंद ठेवणार आहे. मग कोणाला काय बोलायचे ते बोलू दे. मला माझ्या बायकोच्या मामांवर खटला चालवला जाऊन खून केल्याबद्दल त्यांना फाशी व्हायला नको आहे.”

“तुम्ही मला हे सर्व का सांगत आहात?”

“कारण मी तुमच्याबद्दल ऐकले आहे. तुम्ही एक हुशार माणूस आहात. अशी शक्यता आहे की तुम्ही त्याच्याविरुद्ध केस दाखल कराल. पण मी हे तुमच्यावर सोपवतो --- त्याचा काय उपयोग आहे? ती बिचारी बाई मदत करायच्या पलीकडे गेली आहे. आणि काही प्रकरण हवे असलेली ती शेवटची बाई होती --- ती स्मशानात या नुसत्या विचारानेही हलेल.”

“तुमचे बरोबर दिसते आहे. मग, तुम्हाला मी शांत रहायला हवे आहे?”

“असे मला वाटते. मी हे कबूल करतो, की मी हे स्वार्थापोटी करतो आहे. माझ्या बायकोला तिच्या मामांकडून काही संपत्ती मिळाली, तर त्यावर मी माझा शिंप्याचा व्यवसाय उभारू शकतो.”

“आपल्यापैकी बहुतेकजण स्वार्थी असतात. पण कोणी तसे सहज कबूल करत नाही. तुम्ही जे म्हणत आहात, ते मी करेन --- पण तुम्हाला मोकळेपणे सांगतो, की तुम्ही याबाबत गप्प राहू शकणार नाही.”

“का नाही?”

पायरोने बोट उचलले. तो बाजाराचा दिवस होता आणि आम्ही तिथून चाललो होतो. आतून काही ओठ बंद करून काढलेला आवाज ऐकू आला.

“मिस्टर रॅडनॉर, तो आवाज लोकांचा होता. मिस्टर रॅडनॉर. आम्हाला धावले पाहिजे. नाहीतर आमची गाडी चुकेल.”

# सहा

“गाडी वाफ सोडत स्टेशनमधून बाहेर पडतांना पायरो बोलला, हेस्टीग्ज, हे फार रुचीपूर्ण आहे.”

त्याने त्याच्या खिशातून एक लहानसा कंगवा काढला आणि एक तसाच आरसाही काढला. आम्ही घाईने धावत सुटल्याने विस्कटलेल्या त्याच्या मिशा तो काळजीपूर्वक नीट करू लागला.

“मी तुझ्याशी सहमत आहे की यात काहीच रहस्य नाही. मला वाटते, त्या मुलीने सांगितलेली तिच्या मामीची असामान्यपणे प्रेमात पडल्याची कहाणी खरी मानायला हरकत नाही, नाही का? हा भागच फक्त मला जरा घसरडा वाटतो आहे. ती तशी चांगली, मान देण्यासारखी बाई होती.”

“त्यात असामान्य काही नाही --- हे अगदी सामान्य आहे. जर तुम्ही वर्तमानपत्र काळजीपूर्वक वाचले, तर तुम्हाला असे सापडेल, की चांगल्या, माननीय बायका त्यांचा वीस वर्षाचा संसार सोडून, सर्व कुटुंब, मुलेबाळे सोडून, त्यांच्यापेक्षा लहान असणाऱ्या तरूण माणसाबरोबर राहू लागतात.

हेस्टीग्ज, तू बायकांचे फार कमी कौतुक करतोस. सर्व चांगल्या दिसणाऱ्या व तुझ्याकडे बघून हसणाऱ्या बायकांपुढे तू लीन होतोस. पण

मानसशास्त्रीय दृष्ट्या तुला त्यांच्याबद्दल काहीच माहिती नसते. प्रत्येक बाईच्या आयुष्यात फार उशीर होण्यापूर्वी, अद्भुतरम्यतेचा, साहसाचा एक वेडा काळ येतो. गावात बऱ्यापैकी मान असलेल्या दंतवैद्याच्या बायकोवर ही पाळी नक्कीच येते.”

“आणि तुला वाटते --- “

“हुशार माणूस अशा संधीचा फायदा घेऊ शकेल.”

मी विचारांती बोललो, “मी मिस्टर पेनगेल्लीना एवढे हुशार मानत नाही. सर्व गाव त्याच्याकडून काही ऐकायला उत्सुक असणार. आणि तरी मला वाटते, तुझे बरोबर आहे. फक्त काही माहिती असलेली दोन माणसे म्हणजे, रॅडनॉर आणि डॉक्टर! आणि दोघेही गप्प राहू इच्छितात. त्याने ते कसेबसे सांभाळले आहे. आपण त्याला भेटले पाहिजे.”

“तू तुझी इच्छा पूर्ण करू शकतोस. पुढच्या गाडीने परत जा आणि दुखणाऱ्या सुळ्याचा शोध लाव.”

मी त्याच्याकडे नीट पाहिले. “तुझ्या मते, केसमध्ये एवढे रसपूर्ण काय आहे, ते बघावे असे मला वाटते.”

“हेस्टीग्ज, तुझ्या एका शेऱ्यामुळे माझी उत्सुकता जागृत झाली आहे. नोकराणीची मुलाखत घेतल्यावर, तू पाहिलेस, की जी एकही शब्द बोलणार नव्हती, ती बरेच काही बोलली.”

मी संशयाने म्हणालो, “ओहो! मला आश्चर्य वाटते, की तू मिस्टर पेनगेल्लीला कसा काय भेटला नाहीस?” आणि मग माझ्या पूर्वीच्या टीकेकडे मी वळलो.

अरे मित्रा, मी त्याला फक्त तीन महिने देईन. नंतर मी मला पाहीजे तेव्हा त्याला गोदीत भेटेन.”

## सात

एकदा मी असा विचार केला, की पायरोचे भविष्यकाळातील घटनांचा अंदाज घेणे चुकीचे ठरणार आहे. काळ गेला आणि कॉर्निश केसमधून काहीच निष्पन्न झाले नाही. आम्ही इतर कामांमध्ये गुंतलेले होतो. मी पेनगेल्लीची दुःखांतिका जवळजवळ विसरून गेलो. पण वर्तमानपत्रातील एका परिच्छेदाने मला त्याची आठवण करून दिली. त्यात असे म्हटले होते, की मिसेस पेनगेल्लीचा मृतदेहाचे शवविच्छेदन करण्याची परवानगी गृहखात्याच्या सचिवाकडून मिळवण्यात आली.

काही दिवसांनी ‘कॉर्निश गूढ’ हा सगळ्या वर्तमानपत्रांचा चर्चेचा विषय झाला. खरे तर गावगप्पा कधीच पूर्णपणे बंद झाल्या नव्हत्या. जेव्हा विधुराच्या मिस मार्क्स, या त्याच्या सचिव मुलीबरोबरील साखरपुड्याची बातमी जाहीर झाली, तेव्हा अफवांच्या जिभा पूर्वीपेक्षा जास्त जोराने

वळवळू लागल्या. शेवटी गृहसचिवाकडे एक अर्ज पाठवण्यात आला. एक समिती नेमली गेली. शवविच्छेदनात खूप प्रमाणात आर्सेनिक सापडले. मिस्टर पेनगेल्लीना अटक झाली आणि त्यांच्यावर पत्नीच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आला.

पायरो व मी कोर्टातील सुनावणीला हजर राहिलो. अपेक्षेप्रमाणेच पुरावा सादर केला गेला. डॉ ॲडम्सने कबूल केले, की आर्सेनिकच्या विषबाधेची व जठराच्या अस्तराचा जोरदार दाह झाल्याची लक्षणे, साधारण सारखीच असतात. त्यामुळे तसे सांगितले गेले. गृहखात्याच्या तज्ञाने त्याचा अहवाल दिला. आणि नोकराणी जेसीने तर पुष्कळच माहिती पटापट सांगितली. त्यातील बरीचशी फेटाळली गेली. पण त्यामुळे कैद्याच्याविरुद्ध केस बळकट झाली. फ्रेडा स्टॅन्टनने अशी माहिती दिली, की मामाने बनवलेले अन्न मामीने खाल्ल्यावर तिची तब्येत जास्त खराब होऊ लागली. जेकब रॅडनॉरने सांगितले, की तो मिसेस पेनगेल्लीच्या मृत्युच्या दिवशी अचानक तिथे आला, तेव्हा त्याने मिस्टर पेनगेल्लीला मांडणीतून तणाच्या विषारी औषधाची बाटली बदलून ठेवतांना पाहिले आणि मिसेस पेनगेल्लीची पातळसर पदार्थाची बशी तिथे जवळच टेबलावर पडलेली होती. नंतर सचिव असलेल्या, सोनेरी केसांच्या मिस मार्क्सला बोलावले गेले. शोक केला गेला. आणि ती आक्रमक होऊन म्हणाली की मिस्टर पेनगेल्ली आणि तिच्यात प्रेमाची भानगड होती. मिस्टर पेनगेल्लीने तिला वचन दिले होते, की त्याच्या बायकोला काही झाले, तर तो तिच्याशी लग्न

करेल. मिस्टर पेनगेल्लीने त्याचा बचाव राखून ठेवला आणि त्याला सुनावणीसाठी पाठवण्यात आले.

## आठ

जेकब रॅडनॉर आमच्याबरोबर आमच्या डच हॉटेलमध्ये आला.

पायरो म्हणाला, “असे बघा मिस्टर रॅडनॉर, माझे बरोबर होते. शेवटी लोकांचा आवाज उठला आणि तो खात्रीशीर होता. ही केस दडपली गेली नाही.”

रॅडनॉर सुस्कारा टाकत बोलला, “तुमचे बरोबर होते. तुम्हाला तो सुटेल असे काही वाटत होते का?”

“त्याने त्याचा बचाव राखून ठेवला होता. त्याच्याकडे सांगण्यासारखे गुप्त असे काही असेल. तू आमच्याबरोबर चल, येतोस का?”

रॅडनॉर यायला तयार झाला. मी दोन व्हिस्की, सोडा आणि कपभर चॉकलेट मागवले. चॉकलेट मागवल्याने काळजी वाढली आणि मला वाटले, ते कधी आणले तरी जाईल की नाही!

पायरोने पुढे चालू ठेवले, “तर मला अशा केसेसचा खूप अनुभव आहे. आणि आपल्या मित्राला निस्तरण्यासाठी फक्त एकच छिद्र मला दिसते आहे.”

“ते काय आहे?”

“की तू या कागदावर सही कर.”

जादुगाराच्या चपळाईने त्याने एक लिहिलेला कागद काढला.

“हे काय आहे?”

“तू मिसेस पेनगेल्लीचा खून केल्याची कबुली.”

तिथे मिनिटभर शांतता पसरली. मग रॅडनॉर हसू लागला.

“तुम्ही वेडे झाला आहात!”

“नाही मित्रा, मी वेडा झालो नाही. तू इथे येऊन लहानसा व्यवसाय सुरु केलास. तुझ्याकडे पैसे कमी होते. मिस्टर पेनगेल्ली चांगले पैसे राखून होते. तू त्याच्या भाचीला भेटलास. ती तुझ्यावर फिदा झाली. तुला मामा व मामी दोघांचाही काटा काढायचा होता. मग पैसे भाचीला मिळाले असते. कारण ती त्यांची एकुलती एक नातेवाईक होती. किती हुशारीने तू डाव आखलास! त्या मध्यमवयीन बाईवर, ती तुझी गुलाम होईपर्यंत प्रेम केलेस. तू तिच्यात तिच्या नवऱ्याविषयी संशय उत्पन्न केलास. तिला प्रथमच असा

शोध लागला, की तो तिला फसवत आहे --- मग तुझ्या शिकवणीनुसार नवऱा त्याच्या बायकोला विष द्यायचा प्रयत्न करणार असल्याचे तू तिच्या मनात भरवलेस. सहसा त्यावेळी तू तिथे असायचास. तूच तिला अन्नातून विष दिलेस. पण तिचा नवरा लांब असताना ते न करण्याची काळजी तू घेतलीस. बाई असल्यामुळे, ती तिचा संशय स्वतःजवळ ठेऊ शकली नाही. ती तिच्या पुतणीजवळ व इतर मैत्रिणींबरोबर ते बोलली. तुझी अडचण एवढीच होती, की दोन बायकांशी वेगळे संबंध कसे ठेवायचे. तरीही ते वाटते तितके कठीण नव्हते. तू मामीला स्पष्ट केलेस, की तिने तिच्या नवऱ्यावर संशय घेणे सोडून दयावे. तुला असे ढोंग करावे लागले, की तू मिस फ्रेडाचे मन वळवशील. भाचीला थोडी खात्री पटवायची गरज होती --- तिला तिची मामी कधीच दुष्टपणा करत असल्याचे गंभीरपणे वाटत नव्हते.

मग मिसेस पेनगेल्लीने तुला काही न सांगता, माझा सल्ला घेण्याची तिच्या मनाची तयारी केली. जर कुठल्याही संशयापलीकडे जाऊन, तिला खरेच असे आढळले असते, की तिचा नवरा तिला विष द्यायचा प्रयत्न करत आहे, तर तिला नवऱ्याला सोडायचे कारण मिळाले असते. आणि ती तुझ्याबरोबर राहिली असती. ते तसे तुला हवे आहे, अशी कल्पना ती करत होती. पण तसे काही तुला नको होते. तुला तुझ्या आसपास कुणी गुप्तहेर फिरकायला नको होता. एक हवा तसा क्षण आला. मिस्टर पेनगेल्ली त्याच्या बायकोला काही पातळसर पदार्थ खायला देतांना, तू तिथे होतास.

तू त्यात विष कालवलेस. बाकी सगळे सोपे होते. हे प्रकरण दाबून टाकायला तू उत्सुक असल्याने, तू गुप्तपणे ते फुगू दिलेस. पण माझ्या बुद्धिमान तरुण मित्रा, तू हर्क्युल पायरोशिवाय कुणाला यावर विश्वास ठेऊ दिला नाहीस."

रॅडनॉर पांढरा फटक पडला. पण तरीही तो अजून स्वतःच्या बचावाचा प्रयत्न करत होता.

"फार शोधक आणि रुचीपूर्ण! पण हे सगळे कशासाठी?"

"कारण मिस्टर, मी कायदा मानत नाही. पण मी मिसेस पेनगेल्लीचे प्रतिनिधित्व करत होतो. तिच्यासाठी, मी तुम्हाला या केसमधून पळ काढायची संधी दिली. या कागदांवर सही कर. आणि तुला चोवीस तासांची मुदत मिळेल. मी ही केस पोलिसांच्या हवाली करण्यापूर्वी तुला चोवीस तासांची मुदत मिळेल."

रॅडनॉर कां कू करू लागला. "तुम्हाला काही सिद्ध करता येणार नाही."

"का येणार नाही? मी हर्क्युल पायरो आहे. मिस्टर खिडकीतून बाहेर बघा. तिथे रस्त्यावर दोन लोक आहेत. ते तुझ्यावर लक्ष ठेऊन आहेत."

रॅडनॉर खिडकीकडे सरकला आणि पडदा बाजूला केला. मग एक शपथ घेत मागे झाला.

“कळले का मिस्टर, सही कर. ही तुला चांगली संधी आहे.”

“तुमची खात्री आहे, की मी --- “

“मी विश्वास मोडत नसतो. हा हर्क्युल पायरोचा शब्द आहे. तू सही करणार? छान. हेस्टीग्ज, कृपया डाव्या बाजूचा पडदा अर्धा बाजूला कर. मिस्टर रॅडनॉरला पकडले जाऊ नये, याची ती खूण आहे.”

तोंडाने शपथ घेत रॅडनॉर घाईने खोलीबाहेर पडला. पायरोने सभ्यपणे मान हलवली. “भित्रट! मला हे नेहमी माहिती होते.”

मी रागाने ओरडलो, “पायरो, असे दिसते, की तू गुन्हेगारी पद्धतीने वागलास. तू नेहमी भावनांच्या विरुद्ध प्रचार करतोस. आणि इथे तू भावनेच्या भरात धोकादायक गुन्हेगाराला सोडून दिले आहेस.”

पायरो उत्तरला, “तो भावनेचा भर नाही --- तो सौदा आहे. माझ्या मित्रा, तू बघत नाहीस का, की आपल्याकडे त्याच्याविरुद्ध काहीही पुरावा नाही. मी उठून डझनभर शांत कॉर्निश लोकांना सांगू का, की मला हर्क्युल पायरोला, खून कोणी केला ते माहिती आहे. ते मला हसतील. त्याला घाबरवून त्याच्याकडून कबुलीजबाब घेणे, एवढीच संधी होती. ते बाहेर मला दिसलेले दोन थापाडे फार उपयोगी पडले. हेस्टीग्ज, तो पडदा परत खाली पाड. पाडशील का? तो उघडायचे काही कारण नव्हते असे नाही. हा आपला नाटकाचा प्रयोग होता.”

“ठीक आहे. ठीक आहे. आपल्याला आपला शब्द पाळला पाहिजे. ते म्हणाले, चोवीस तास? बिचाऱ्या मिस्टर पेनगेल्लीसाठी ते फार आहेत --- तू लक्षात घे, त्याच्या लायकीपेक्षा त्याला जास्तच मिळते आहे. त्याने बायकोला फसवले आहे. तुला माहिती आहे त्याप्रमाणे, मी पक्का कुटुंबाच्या आयुष्याच्या बाजूने आहे. ठीक आहे. चोवीस तास --- आणि मग? माझा स्कॉटलंड यार्डवर पूर्ण विश्वास आहे.माझ्या मित्रा, ते त्याला पकडतील. नक्की पकडतील.

THE MARKET BASING MYSTERY

# ले घरातील गूढ



नेह्मीच्या पद्धतीने, नाकाने जोरात श्वास घेत व तोंडाने सोडत, इन्स्पेक्टर जाप बोलला, “काही झाले तरी शेवटी देशासारखे काहीच नाही, नाही का?

पायरोने व मी टाळ्या वाजवून मनापासून त्याच्या भावनांना पाठींबा दर्शवला. आम्ही सर्वांनी शनिवार रविवारसाठी बाजार असलेल्या गावाकडे जावे, अशी स्कॉटलंड यार्ड इन्स्पेक्टरची कल्पना होती. काम नसेल, तेव्हा जाप फार उत्साही वनस्पतीशास्त्रज्ञ होता. बारीकसारीक फुलांची अविश्वसनीय अशी [विचित्र उच्चार असलेली] लांबलचक लॅटीन नावे घेऊन तो गप्पा मारत असे. केसमध्ये त्याला असलेल्या उत्साहापेक्षा कितीतरी अधिक उत्साह तो तेव्हा दाखवत असे.

जापने स्पष्टीकरण दिले, "अशा ठिकाणी जाऊया, जिथे आपल्याला कोणी ओळखत नाही व आपणही कुणाला ओळखत नाही."

हे केस सिद्ध करण्यासाठी नव्हते. पण आर्सेनिक विषाच्या केसच्या संदर्भात, पंधरा मैल दूर असलेल्या गावातून स्थानिक कॉन्स्टेबलची बदली इथे झाली होती व तो स्कॉटलंड यार्डच्या संपर्कात आला होता. तथापि त्या थोर आनंदी माणसाची दाट ओळख झाल्यामुळे जापची स्वस्थपणाची भावना वाढली. आम्ही गावातील खानावळीत रविवारी सकाळी न्याहरी घेत बसलेलो असतांना, सूर्य मस्त तळपत होता. मधाळ फुलवेलींच्या गोलगोल गुंडाळ्या खिडकीला लगटलेल्या होत्या. आम्ही सगळे छान मनस्थितीत होतो. अंडी व डुकराचे भाजलेले मास चविष्ट होते. कॉफी पण छान गरमागरम होती.

जाप बोलला, "हे खरे आयुष्य आहे. मी जेव्हा निवृत्त होईन, तेव्हा मी गुन्ह्यांपासून दूर अशी, यासारख्या एखाद्या गावाकडे जागा घेऊन राहीन."

पायरोने चौकोनी पावाचा तुकडा घेत, खिडकीतील दांडीवर तोल सावरणाऱ्या चिमणीकडे बघून, नापसंतीदर्शक भुवई चढवत, शेरा मारला, "गैरमार्गाने पैसा मिळवणे जिथे चालते, तिथे --- "

मी सहज म्हणालो,

"सशाचे तोंड आल्हादक असे पण खासगी आयुष्य चांगले नसे

मी नाही काही सांगू शकत काय भयानक गोष्टी तो करत

मागील बाजूने स्वतःला ताणत, जाप बोलला, “अरे देवा, मला वाटते, मला अजून एक अंडे व थोडे डुकराचे भाजलेले मास चालेल. कॅप्टन, तुझे काय?”

मी आनंदाने बोललो, “मला पण चालेल. पायरो, तुझे काय?”

पायरोने मान हलवली. “डोके चालेनासे होईल, इतके भरपेट जेऊ नये.”

जाप हसत बोलला, “मी थोडे जास्त जेवायचा धोका घेतो. मी भरपेट जेवतो. आणि तसेही पायरो, तू हट्टी आणि बळकट होत चालला आहेस. वेटर, इकडे मला दोन्ही गोष्टी अजून वाढा.”

त्याच वेळेस दारात एक मोठी आकृती दार व्यापून उभी राहिली. तो कॉन्स्टेबल पोलार्ड होता.

“मी इन्स्पेक्टरला त्रास देतो आहे, त्याबद्दल मला माफ करा. पण मला त्याचा सल्ला हवा आहे.”

जाप घाईने बोलला, “मी सुट्टीवर आहे. आता मी काम करणार नाही. काय झाले आहे?”

“ले घरात रहाणाऱ्या माणसाने स्वतःच्या डोक्यात गोळी मारून घेतली आहे.”

जाप रुक्षपणे बोलला, “ते काय ते करतील. मला वाटते, कर्ज किंवा बाई यापैकी काहीतरी कारण असेल. पोलार्ड, मला माफ कर. मी तुला सल्ला देऊ शकत नाही.” कॉन्स्टेबल म्हणाला, “बाब अशी आहे, की त्याने स्वतःला मारून घेतले नसणार. तशी शक्यता नाही, असे डॉ गिल्स म्हणाला.”

जापने त्याचा कप खाली ठेवला.

“त्याने स्वतःला मारून घेतले नसणार? तुला काय म्हणायचे आहे?”

पोलार्ड परत म्हणाला, “असे डॉ गिल्स म्हणाला. ते शक्य नाही, असे तो म्हणाला. दार व खिडकी आतून बंद असल्याने, त्याचा मृत्यू म्हणजे एक कोडेच आहे. पण तो त्याच्या मताला चिकटून आहे व परतपरत म्हणतो आहे, की त्याने स्वतःला गोळी मारून घेणे शक्य नाही.”

मग झाले तर! मग अजून मागवलेले खाणे तसेच राहिले व आम्ही तिघे ले घराच्या दिशेने भरभर चालू पडलो. जाप उत्सुकतेने कॉन्स्टेबलला प्रश्न विचारत होता.

मेलेल्या माणसाचे नाव वाल्टर प्रोथेरो होते. तो मध्यमवयीन होता आणि एकाकी आयुष्य जगत होता. तो बाजाराच्या जागेत आठ वर्षांपूर्वी आला व ले घर भाड्याने घेतले. ते जुने, डळमळीत, मोडकळीला आलेले

घर होते. थोड्याच दिवसात, ते कोलमडून पडले असते. तो त्या घराच्या कोपऱ्यात रहात असे. त्याने बरोबर आणलेली मिस क्लेग नावाची एक नोकराणी घरातील सर्व काम करत असे. ती फार हुशार बाई होती. अख्या गावात तिची चर्चा असे. अलीकडे मिस्टर प्रोथेरोकडे मिस्टर व मिसेस पार्कर नावाचे पाहुणे लंडनहून आले होते. आज सकाळी मिस क्लेग तिच्या मालकाला उठवायला गेली, तेव्हा दार बंद होते व काही उत्तर न मिळाल्याने, तिने घाबरून पोलिसांना फोन केला. कॉन्स्टेबल पोलार्ड व डॉ गिल्स त्याच क्षणी आले. त्यांच्या सामूहिक प्रयत्नाने त्याच्या झोपायच्या खोलीचे ओकचे दार तोडण्यात त्यांना यश आले.

मिस्टर प्रोथेरो जमिनीवर पडलेले होते. डोक्याला गोळी लागलेली होती आणि त्यांच्या उजव्या हातात पिस्तुल होते. ही सरळसरळ आत्महत्येची केस दिसत होती.

प्रेताच्या तपासणीनंतर, मात्र डॉ गिल्स फारच गोंधळून गेले. शेवटी त्यांनी कॉन्स्टेबलला बाजूला घेऊन, त्यांचा उडालेला गोंधळ त्याला समजाऊन सांगितला. तेव्हा पोलार्डला एकदम जापची आठवण आली. डॉक्टरला तिथेच ठेऊन, तो घाईने खानावळीत आला.

कॉन्स्टेबलची हकीगत सांगून होते आहे, तोच आम्ही ले घराशी येऊन पोचलो. ते मोठे, एकाकी घर होते त्याच्या बाजूने अव्यवस्थित असे तण माजलेली बाग होती. पुढचे दार उघडे होते. आम्ही एकदम हॉलमध्ये घुसलो. आणि तेथून आवाज येणाऱ्या एका सकाळच्या खोलीत गेलो. तिथे चार लोक होते. काहीसे झगमगीत कपडे घातलेला एक बदलत्या, अप्रसन्न

चेहऱ्याचा माणूस ज्याच्याकडे बघताक्षणीच नावड उत्पन्न व्हावी असा एक माणूस, एक साधारण तशीच कोरड्या त्वचेची, पण देखणी बाई, अजून एक सर्वांपासून लांब उभी राहिलेली, मला नोकराणी वाटलेली, नीट काळ्या कपड्यातील बाई आणि खेळायचा कोट घातलेला एक उंच, हुशार, सर्व परिस्थितीवर ताबा ठेवणारा व तशी क्षमता असलेला माणूस!

कॉन्स्टेबल बोलला, “डॉक्टर गिल्स, “हा स्कॉटलंड यार्डचा इन्स्पेक्टर जाप आणि त्याचे दोन मित्र आहेत.”

डॉक्टरने आम्हाला अभिवादन केले आणि आमची मिस्टर आणि मिसेस पार्करशी ओळख करून दिली. मग आम्ही त्यांच्याबरोबर वरच्या मजल्यावर गेलो. जापने केलेल्या खुणेनुसार आज्ञा पाळणारा पोलार्ड नोकराणीवर लक्ष ठेवायला खालीच राहिला. डॉक्टरने आम्हाला वरती व पॅसेजमधून नेले. त्याच्या शेवटी बिजागरींवर डुलणारे एक दार होते. ते आपोआप खोलीच्या आतील फरशीवर मोडून पडले. आम्ही आत गेलो. फरशीवर अजून प्रेत पडले होते. मिस्टर प्रोथेरो मध्यमवयीन, दाढीवाला माणूस होता. त्याचे केस कानशीलांवर करडे होऊ लागले होते. जाप गुडघे टेकून प्रेताशेजारी बसला.

तो गुरगुरला, “तुम्हाला प्रेत जसे सापडले, तसेच का ठेवले नाही?”

डॉक्टरने त्याचे खांदे शहारवले.

“आम्हाला ती सरळ आत्महत्येची केस वाटली.”

जाप बोलला, “हं! डाव्या कानाकडून गोळी डोक्यात घुसली.”

डॉक्टर बोलला, “बरोबर, ती त्याने स्वतः मारून घेतली असणे शक्य नाही. त्याला त्याचा हात त्याच्या डोक्यावरून गोल फिरवून आणावा लागला असता. असे केले गेले असणे शक्य नव्हते.”

“तरीही पिस्तुल त्याच्या हातात धरलेले सापडले? आता ते कुठे आहे?”

डॉक्टरने टेबलाकडे मान दर्शवली. “ते त्याच्या हातात धरलेले नव्हते. ते हातात होते, पण बोटे त्यावर आवळलेली नव्हती.”

जाप म्हणाला, “ते नंतर तसे ठेवण्यात आले होते, असे स्पष्ट दिसत होते.” तो ते तपासत होता. एक गोळी मारण्यात आली. आपण ते ठसे तपासू. पण मला शंका आहे की डॉ गिल्स, ते बहुधा तुझेच सापडतील. तो मेल्याला किती वेळ झाला?”

“काल रात्री कधीतरी तो मेला. काही रहस्यमय गोष्टीतील डॉक्टर सांगतात, तसे किती वाजता, ते मी सांगू शकणार नाही. साधारण बारा तासांपूर्वी असावे.”

आतापर्यंत पायरोने काही खेळी खेळली नव्हती. तो माझ्याशेजारी उभा राहून जापकडे बघत होता व त्याचे बोलणे ऐकत होता. फक्त वेळोवेळी तो खूप नाजूकपणे व गोंधळल्यासारखी हवा हुंगत होता. मी पण हुंगत होतो पण स्वारस्य वाटेल असे काही मला सापडले नाही. हवा छान ताजी आणि काही वाईट वास नसलेली होती. तरीही पायरो मात्र एकसारखा संशय

आल्यासारखा हवा हुंगत होता. म्हणजे मला जे जाणवले नाही, असे काही त्याला जाणवत होते.

आता जाप प्रेतापासून दूर झाला. पायरो गुडघ्यांवर बसून त्या प्रेताच्या जवळ गेला. मला प्रथम वाटले तो पिस्तुल धरलेल्या हाताची बोटे तपासत आहे. पण मिनिटाभरात पाहिले की कोटाच्या खिशातील रुमाल त्याला रुचीपूर्ण वाटत होता. मिस्टर प्रोथेरोच्या अंगावर गडद करड्या रंगाचा सूट होता. शेवटी पायरो उठला. पण जसे काही कोडे पडल्यासारखे, त्याचे डोळे अजून रुमालाकडे लागलेले होते.

जाप त्याला दार उचलण्यासाठी हाक मारत होता. संधी घेऊन मी प्रेताशेजारी बसलो व कोटाच्या बाहीतून, रुमाल काढून त्याचे बारकाईने निरीक्षण करू लागलो. तो एक साधा पांढऱ्या कापडाचा रुमाल होता. त्यावर काही खूण वा डाग नव्हता. मी तो परत ठेऊन दिला व पराभव झाल्यासारखे माझे डोके हलवले. इतरांनी दार उचलले होते. मला समजले ते किल्ली शोधत होते. त्यांचा शोध फलद्रूप ठरला नाही.

जाप बोलला, “हे प्रकरण निकालात निघाले. खिडकीला आतून कडी आहे. खुनी दाराने बाहेर पडला. ते कुलुपबंद केले आणि किल्ली घेऊन गेला. त्याला वाटले असेल की बघणाऱ्यांना असे वाटेल, की प्रोथेरोने दार आतून लाऊन घेतले आणि स्वतःवर गोळी मारून घेतली. आणि किल्ली नसलेली कुणाच्या लक्षात येणार नाही. मिस्टर पायरो, तुम्हाला पटते आहे का?”

“हो, पटते आहे. पण किल्ली परत खोलीत दाराखाली ठेवणे जास्त साधे व ठीक वाटले असते. म्हणजे मग असे वाटले असते, की ती कुलुपातून पडली आहे.”

“आहा, ठीक आहे. पण तुमच्यासारख्या चमकदार कल्पना सगळ्यानाच करता येतील असे नाही. जर तुम्ही गुन्हेगार असता, तर सगळ्यांना घाबरवूनच सोडले असते. मिस्टर पायरो, यावर तुम्हाला काही बोलायचे आहे का?”

मला पायरो विचारात हरवल्यासारखा वाटला. त्याने खोलीभर पाहिले. तो हळू व क्षमायाचनेच्या सुरात बोलला, “हा मनुष्य फार सिगरेटी ओढत असे.”

खरेच, सगळीकडे सिगरेटचा धूर भरून राहिला होता. मोठ्या हातवाल्या खुर्ची जवळील टेबलावरील अॅशट्रेसुद्धा भरून गेलेला होता.

खाली वाकून काळजीपूर्वक तपासणी करत व नंतर अॅशट्रेकडे बघत, जाप म्हणाला, “त्याने काल रात्री निदान वीस सिगरेटी ओढल्या असल्या पाहिजेत. अॅशट्रेचीसुद्धा तीच गत आहे. त्या सर्व एकाच माणसाने ओढल्या आहेत, नाही का मिस्टर पायरो?”

माझा मित्र पुटपुटला, “मी काही असे सुचवले नाही.”

जाप ओरडला, “आहा, हे काय आहे? त्याने मृत माणसाजवळ जमिनीवर पडलेल्या, चकाकणाऱ्या कशावर तरी झडप घातली. “हे तुटके

कफलींक आहे. मला नवल वाटते, हे कुणाचे असेल? डॉ गिल्स, तुम्ही खाली जाऊन नोकराणीला वर पाठवलेत, तर बरे होईल.”

“पार्कर मंडळींचे काय? तो म्हणतो आहे, की त्याला लंडनला काही महत्वाचे काम आहे आणि त्यामुळे तो घराबाहेर पडण्यासाठी उत्सुक आहे.”

“त्याच्याशिवाय आपल्याला शोधाशोध करावी लागेल, असे मला वाटते. पण जशा गोष्टी घडलेल्या दिसत आहेत, त्यावरून त्याने इथे थांबणे अत्यंत गरजेचे असल्याचे दिसते आहे. नोकराणीला पाठव आणि पार्कर मंडळींपैकी कुणालाही तुला किंवा पोलार्डला गुंगारा देऊन देऊ नकोस. इथे सकाळी कुणी आले होते का?”

डॉक्टर विचारात हरवला.

“नाही. मी आणि पोलार्ड सकाळी आलो, तेव्हा ते बाहेर उभे होते.”

“तुमची तशी खात्री आहे?”

“अगदी खात्री आहे.”

डॉक्टर त्याच्या कामाला गेला.

जाप पसंती दर्शवत बोलला, “तो चांगला मनुष्य आहे. या खेळाच्या डॉक्टर्सपैकी काहीजण फार चांगले आहेत. मला नवल वाटते, या माणसाला कुणी मारले असेल. घरातील तिघांपैकी कुणीतरी. मला नोकराणीचा फारसा संशय येत नाही. तिला मारायचे असते तर चौदा वर्षे संधी होती. पण हे

पार्कर्स कोण आहेत, याचे मला आश्चर्य वाटते. ते इथे आधी कधी आलेले जोडपे नसावे.”

या वेळी मिस क्लेग तिथे आली. ती बारीक, चेहरा विदीर्ण झालेली, करडे केस मध्यभागी पाडलेल्या भांगाने दुभागलेली, घरगुती, शांत बाई होती. पण मान देण्यासारखा चटपटीतपणा तिच्याकडे होता. जापच्या प्रश्नांची उत्तरे देतांना तिने स्पष्ट केले, की ती मृत्यू पावलेल्या माणसाबरोबर गेली चौदा वर्षे होती. तो उदार व दयाळू मालक होता. जेव्हा पार्कर मंडळी अचानक रहायला आली, त्या तीन दिवसांपूर्वीपर्यंत तिने कधीही त्यांना पाहिले नव्हते. तिचे मत असे होते, की त्यांनी स्वतः होऊन इथे रहायचे विचारले. मालक त्याना भेटून फारसे खूष नव्हते. जापने तिला दाखवलेले कफलींक मालकाचे नसल्याचे ती बोलली. त्याबद्दल तिची खात्री होती. पिस्तुलाबद्दल विचारल्यावर, ती म्हणाली की तिच्या मालकाकडे तसल्या प्रकारचे शस्त्र होते. ते कुलुपात ठेवलेले असे. काही वर्षांपूर्वी तिने ते पाहिले होते. पण तेच ते आहे का, याबद्दल ती काही सांगू शकली नाही. काल रात्री तिने गोळी उडवल्याचा आवाज ऐकला नव्हता. कारण घर मोठे व डुगडुगणारे होते. आणि तिची व पार्कर मंडळींची खोली इमारतीच्या दुसऱ्या बाजूला होती. मिस्टर प्रोथेरो किती वाजता झोपायला गेले, ते तिला माहिती नव्हते. तिचे काम साडेनऊला आटपले, तोपर्यंत ते जागे असल्याचे ती बोलली. ते झोपायच्या खोलीत गेल्यावर लगेच झोपत नसत. बहुधा अर्धी रात्र, ते वाचत व सिगरेट ओढत बसलेले असत. ते फार सिगरेटी ओढत.

मग पायरोने एक प्रश्न विचारला, “तुझे मालक साधारणपणे खिडकी उघडी ठेऊन झोपत की बंद करून?

मिस क्लेग विचार करून म्हणाली, “बहुधा ती उघडी असे.”

“पण कालपासून तर ती बंद दिसते आहे. याचे तू काय स्पष्टीकरण देशील?”

“कदाचित गार वारा लागल्यामुळे त्यांनी ती बंद केली असेल.”

जापने तिला अजून काही प्रश्न विचारले व मग ती गेली. नंतर त्याने पार्कर पतीपत्नी यांना वेगवेगळे करून प्रश्न विचारले. मिसेस पार्कर थोड्या रडक्या व आक्रमक झाल्या होत्या. मिस्टर पार्कर शिवराळ भाषेत, अरेरावीने बोलत होते. कफलींक त्यांचे असल्याचे त्यांनी नाकारले. पण त्यांच्या बायकोने ते आधीच ओळखले होते. यामुळे त्यांच्यावरील संशय वाढला. त्यांनी ते कधी प्रोथेरोच्या खोलीत गेल्याचे नाकारले. त्याना अटक करण्याचे पुरेसे कारण असल्याचे जापला वाटले.

पोलार्डला तेथील अधिकार देऊन, जाप परत गावात गेला आणि मुख्य कार्यालयाला फोन करू लागला. पायरो आणि मी परत खानावळीत गेलो.

मी म्हणालो, “तू सहसा इतका शांत नसतोस. या केसमध्ये तुला रस वाटत नाही आहे का?”

“उलट मला खूप रस वाटतो आहे. पण माझा गोंधळही उडालेला आहे.”

मी विचारपूर्वक म्हणालो, “हेतू समजून घेणे अवघड आहे. पण पार्कर चांगला वाटत नाही, हे नक्की. केस अगदी स्पष्टपणे त्याच्याविरुद्ध जाते आहे. पण त्याचा हेतू काय होता, ते यथावकाश बाहेर येईलच.”

“जापच्या नजरेतून सुटलेले असे काही विशेष, तुला जाणवले नाही?”

मी त्याच्याकडे चौकसपणे पाहिले. “पायरो, तुला काय म्हणायचे आहे?”

“मृत माणसाच्या बगलेत काय होते?”

“ओहो, तो रुमाल?”

“बरोबर, तोच.”

मी विचारपूर्वक बोललो, “खलाशी त्यांचा रुमाल काखेत धरतात.”

“हेस्टीग्ज, फार छान मुद्दा काढलास. तरी हा माझ्या मनात नव्हता.”

“मग काय होता?”

“परतपरत मी सिगरेटच्या धुराकडे व वासाकडे जातो.”

मी नवल वाटून बोललो, “मला तसा वास येत नाही.”

"अरे मित्रा, आता मलाही येत नाही."

मी त्याच्याकडे गंभीरपणे पाहिले. पायरो जेव्हा कोड्यात बोलतो, तेव्हा ते समजून घेणे फार कठीण असते. तो स्वतःशीच हसत होता.

## दोन

दोन दिवसांनी कोर्टात त्या घटनेबद्दल चौकशी सुरु झाली. मधल्या काळात अजून काही पुरावे समोर आले. ले घराच्या बागेतील भिंतीवरून तो चढून आल्याचे एका भटक्या माणसाने कबूल केले. तेथील कुलूप नसलेल्या पत्र्याच्या खालील खोलीवजा जागेत तो रोज झोपत असल्याचे, तो म्हणाला. बारा वाजता त्याने दोन माणसे पहिल्या मजल्यावरील एका खोलीत मोठ्याने भांडत असल्याचे ऐकले. एकजण दुसऱ्याकडे काही पैसे मागत होता आणि दुसरा रागाने ते द्यायचे नाकारत होता. एका झुडुपामागे लपून, त्याने ती दोन माणसे उजेडाच्या खिडकीसमोरून जाताना व येताना पाहिली. त्यातील एकजण घराचा मालक, मिस्टर प्रोथेरो असल्याचे त्याने ओळखले. तर दुसरा नक्की मिस्टर पार्कर होता.

आता हे स्पष्ट झाले होते, की पार्कर ले घरात मिस्टर प्रोथेरोला ब्लॅकमेल करण्यासाठी आले होते. नंतर हे शोधून काढले गेले की मेलेल्या माणसाचे खरे नाव वेन्डोव्हर होते व तो नेव्हीमध्ये लेफ्टनंट होता. १९१० मध्ये पहिल्या वर्गाची मेरीथॉट बोटीत स्फोट केल्याच्या प्रकरणात तो अडकलेला होता. ती केस वेगाने सुटत चालली होती. यात महत्वाची

भूमिका बजावलेल्या पार्करने त्याला शोधून काढले व त्याच्याकडे शांतपणे पैशांची मागणी केली. प्रोथेरोने उर्फ वेन्डोव्हरने ते द्यायचे नाकारले. भांडणामध्ये, वेन्डोव्हरने त्याचे पिस्तुल काढले. पार्करने ते हिसकावून घेतले व त्याच्यावर झाडले. आणि त्याला आत्महत्येचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला.

पार्करवर खटला चालवला गेला. त्याचे बचावाचे भाषण ऐकून घेतले गेले. आम्ही तिथे कोर्टात हजर होतो. आम्ही तेथून निघाल्यावर पायरोने त्याचे डोके हलवले.

तो स्वतःशी पुटपुटला, “असेच झाले असावे. हो. असेच झाले असावे. मी आता उशीर करणार नाही.”

तो पोस्ट कार्यालयात गेला आणि एक चिठ्ठी लिहिली. ती त्याने विशेष दूताबरोबर पाठवली. ती कुणाला पाठवली, ते मला दिसले नाही. मग आम्ही जिथे संस्मरणीय शनिवार रविवार घालवला होता, त्या खानावळीत परत आलो.

पायरो खिडकीशी जात येत अस्वस्थपणे फेऱ्या मारत होता.

त्याने स्पष्ट केले, की तो एका पाहुण्याची वाट बघत होता. तो नक्की तो नसेल. माझी काही चूक झाली नसेल. नाही ही बघा, ती आली. ”दुसऱ्या मिनिटाला मिस क्लेग खोलीत आलेली बघून, मला आश्चर्याचा धक्का

बसला. ती नेहमीसारखी शांत नव्हती. ती धावत आल्यासारखी जोरजोरात श्वास घेत होती. मला ती पायरो कडे बघत असतांना, तिच्या डोळ्यात भीती दिसली.

तो दयाळूपणे बोलला, ‘बाईसाहेब, बसा. माझा अंदाज बरोबर ठरला, नाही का?”

उत्तरादाखल, ती स्फुंदून रडू लागली.

पायरोने हळूवारपणे विचारले, “तू ते का केलेस? का?”

ती उत्तरली, “माझे त्याच्यावर खूप प्रेम होते. तो लहान मुलगा असल्यापासून, मी त्याची दाई होते. ओहो, माझ्यावर दया करा.”

‘मला जमेल ते सगळे मी करेन. जरी तो वाईट रीत्या लबाड असला तरीही --- मी निरागस माणसाला फाशी जाऊ देणार नाही

ती उठत खालच्या आवाजात बोलली, “कदाचित शेवटी, मी असे काही करायला --- ठीक आहे. तुम्हाला जे काही करणे भाग असेल, ते करा.”

एवढे बोलून मग ती खोलीबाहेर पडली.

मी घाबरून विचारले, “तिने खून केला का?”

पायरोने हसून मान हलवली.

“त्याने स्वतःवर गोळी झाडून घेतली. त्याने त्याच्या उजव्या बाहीत रुमाल ठेवल्याचे तुला आठवते का? त्यामुळे मला तो डावरा असल्याचे समजले. मिस्टर पार्करबरोबरील त्याच्या वादळी मुलाखतीनंतर, त्याचे बिंग बाहेत फुटू नये, म्हणून त्याले स्वतःला गोळी मारून घेतली. मिस क्लेग त्याला नेहमीप्रमाणे उठवायला आली, तेव्हा तिला तो मरुन पडलेला आढळला. आताच तिने आम्हाला सांगितले, की ती त्याला लहानपणापासून ओळखत होती आणि म्हणून ज्याने त्याला मरणासाठी उद्युक्त केले, त्या दोघा पार्कर मंडळींचा तिला भयंकर राग आला होता. तिने त्या दोघांना खुनी ठरवले. आणि मग अचानक तिला त्याना शिक्षा देण्याची संधी मिळाली. त्यांनीच त्याला आत्महत्या करायला भाग पाडले होते. तिला एकटीलाच माहिती होते, की तो डावरा आहे. तिने बदलून पिस्तुल त्याच्या उजव्या हातात ठेवले. खिडकी लाऊन बंद केली. खालील खोलीतून कफलींक घेऊन, त्याचा तुकडा तिथे पाडून ठेवला. आणि दार कुलुपबंद करून, किल्ली काढून घेतली.”

मी मोठ्या उत्साहाने म्हणालो, “पायरो, तू कमाल आहेस. आणि हे फक्त रुमालाच्या लहानशा पुराव्यावरून!”

“आणि सिगरेटच्या धुरावरुन. जर खिडकी बंद असती, तर सगळया सिगरेटच्या धुरातील तंबाखूच्या शिळया वासाने, खोली भरून गेली असती.

त्यामुळे मी निष्कर्ष काढला, की रात्रभर खिडकी उघडी असली पाहिजे आणि सकाळी ती लावली गेली असणार. त्यामुळे माझ्या तर्काची दिशा बदलली. मला अशी परिस्थिती सापडेना, की ज्यामुळे खुन्याला खिडकी लावाविशी वाटली असेल. उलट ती उघडी असणे त्याच्या पथ्यावरच पडले असेल. जर आत्महत्येची गोष्ट पचली नाही, तर त्यातून खुनी निसटला, असे ढोंग करणे सोपे गेले असते. खिडकी उघडी असल्याशिवाय ते संभाषण भटक्या माणसाच्या कानावर पडणे शक्य नव्हते."

मी मनापासून म्हणालो, "छान! आता थोडा चहा घेऊ या का?"

पायरो सुस्कारा टाकत बोलला, "हे खऱ्याखुऱ्या इंग्लिश माणसासारखे म्हणालास. मला वाटते, इथे फळांचा गोड रस मिळणार नाही, नाही का?"

THE ADVENTURE OF THE EGYPTIAN TOMB

# इजिप्शियन थडग्याचे साहस



मला नेहमी वाटते, की आमच्या अनेक साहसांपैकी पायरोबरोबर केलेले सर्वात थरारक आणि नाटकी साहस कुठले असेल तर ते, राजा मेन-हर-रा याचे थडगे उकरून काढून केलेले आमचे मरणंमालिकांच्या तपासणीचे काम!

न्यूयॉर्कचे उमराव कार्नारव्होन, सर जॉन विलार्ड आणि मिस्टर ब्लेइबनर यांनी अतोनात कष्टाने लावलेला तुतानख-आमेनच्या थडग्याचा

शोध! त्यांनी ते उत्खलन गीझाच्या पिरॅमिडच्या जवळ, कैरोपासून फार लांब नाही, अशा ठिकाणी सुरु केले. ते अचानकपणे दफनविधीच्या मालिकेत दाखवले गेले. त्यामुळे लोकांचे त्यातील स्वारस्य वाढले. ते थडगे लयास जात असलेल्या आठव्या शतकातील पुसटसा उल्लेख असलेल्या राजांपैकी एक असलेल्या राजा मेन-हर-रा याचे असल्याचे वाटत होते. या कालखंडाबद्दल फारसे माहिती नव्हते. लागलेल्या शोधांबद्दल वर्तमानपत्रात छापून येत होते.

लवकरच लोकांच्या मनाचा ठाव घेणारी, एक घटना घडली. सर जॉन विलार्ड अचानक हृदयक्रिया बंद पडून वारले.

काही भावनिक वर्तमानपत्रांनी लगेच त्या संधीचे सोने करून, इजिप्शियन खजिन्याशी संबंधित अंधश्रद्धात्मक गोष्टी प्रसृत केल्या. ब्रिटीश वस्तुसंग्रहालयातील करडी वा पांढरी पडून कडक झालेली दुर्दैवी प्रेते, नवीन उत्साहाने ओढून बाहेर काढली गेली. शांतपणे ती तिथे ठेवायला परवानगी नाकारण्यात आली. परंतु ही बातमीदेखील प्रसिद्ध होऊन लोकप्रिय झाली.

पंधरवड्यानंतर मिस्टर ब्लेइबनर रक्तात विष पसरून ताबडतोब वारले. त्यानंतर काही दिवसांनी त्यांच्या पुतण्याने न्यूयॉर्कमध्ये स्वतःला गोळी मारून घेतली. त्या दिवशी सर्वत्र राजा मेन-हर-रा याच्या शापाची आणि मृतवत झालेल्या इजिप्तच्या जादूच्या शक्तीची मोठ्या चवीने चर्चा होत होती.

तेव्हा मृत पुरातत्वशास्त्रज्ञ सर विलार्ड यांच्या विधवा पत्नी विलार्ड बाईसाहेबांकडून, पायरोला एक छोटीशी चिठ्ठी मिळाली. त्यात तिने

पायरोला तिच्या केनसिंग्टन चौकात असलेल्या घरी येऊन भेटण्याची विनंती केली होती. मी त्याच्याबरोबर गेलो.

विलार्ड बाईसाहेब उंच व बारीक होत्या. त्यांनी शोकवस्त्र परिधान केले होते. त्यांचा विदीर्ण चेहरा त्यांच्या अलीकडील दुःखाची प्रचिती देत होता.

“मिस्टर पायरो, तुम्ही लगेच इथे येऊन, चांगले केलेत.”

“विलार्ड बाईसाहेब, मी तुमच्या सेवेसाठी हजर आहे. तुम्हाला माझा सल्ला हवा आहे का?”

“मला माहिती आहे, की तुम्ही गुप्तहेर आहात. पण फक्त गुप्तहेर म्हणून तुमचा सल्ला मला नको आहे. तुम्ही खराखुरा प्राथमिक दृष्टीकोन असलेले, कल्पक व जगाचा अनुभव असलेले आहात. मिस्टर पायरो, मला सांगा अतींद्रिय शक्तीविषयी तुमचे काय मत आहे?”

पायरो उत्तर देण्यापूर्वी, क्षणभर गप्प राहिला. तो विचार करत असावा. शेवटी तो बोलला, “आपण एकमेकांविषयी गैरसमज करून घ्यायला नको. तुम्ही मला काही सर्वसाधारण प्रश्न विचारत नाही आहात. त्याला खासगी उपयोजन आहे, नाही का? तुम्ही पर्यायाने तुमच्या मृत पतीविषयी बोलत आहात का?”

तिने तसे असल्याचे कबूल केले.

“तुम्ही मला त्यांच्या मरणाशी निगडीत परिस्थितीची तपासणी करायला सांगत आहात का?

"मी तुम्हाला माझ्यासाठी वर्तमानपत्रे नेमके काय सांगत आहेत आणि त्यातील किती खरोखर सत्य गोष्टींवर आधारित आहे, याचा मागोवा घ्यायला सांगते आहे. मिस्टर पायरो, तीन मरणे त्यांच्यापरीने समजून घेणे व तरीही त्यांचा एकत्रित एकाच वेळी घडण्याचा परिणाम अविश्वसनीय भासणे, आणि हे सारे थडगे उकरायला लागल्यापासून महिन्याभरात होणे! ही केवळ अंधश्रद्धा असू शकेल की, हा आधुनिक शास्त्राला अनाकलनीय असा भूतकाळातील गूढगर्भ शाप असेल? या तीन मरणांची संगती कशी लावायची? मिस्टर पायरो, मला भीती वाटते, फार भीती वाटते. अजूनही हा शेवट नसू शकेल."

"तुम्हाला कोणासाठी भीती वाटते?"

"माझ्या मुलासाठी. जेव्हा माझ्या नवऱ्याच्या मरणाची बातमी आली, तेव्हा मी आजारी होते. ऑक्सफर्डहून नुकताच आलेला माझा मुलगा तिथे गेला. त्याने शव --- घरी आणले. पण आता तो परत गेला आहे. तो त्या कामाने इतका संमोहित झाला आहे, की त्याच्या वडिलांची जागा घेऊन, त्याला उत्खलनाचे काम चालू ठेवायचे आहे. तुम्हाला मी मूर्ख, कशावरही विश्वास ठेवणारी बाई वाटेन. पण जर मृत राजाचा आत्मा अजूनही असंतुष्ट असेल तर? तुम्हाला हे बोलणे भावनेच्या भरात वाहून केलेले वाटेल --- "

पायरो लगेच बोलला, "नाही, खरेच विलार्ड बाईसाहेब, माझाही अंधश्रद्धेच्या जोरावर विश्वास आहे. ती जगातील माहिती असलेली सर्वात मोठी शक्ती आहे."

मी त्याच्याकडे आश्चर्याने पाहिले. मला पायरो अंधश्रद्ध असेल, असे कधी वाटले नव्हते. पण लहानसा माणूस खरेच गंभीर रीत्या तसा होता.

“म्हणजे तुम्हाला खरे तर मला, तुमच्या मुलाला वाचवायला सांगायचे आहे? मी त्याला काही त्रास होऊ नये म्हणून आटोकाट प्रयत्न करेन.”

“हो. गूढ, जादुई शक्तीविरुद्ध, पण काही अघोरी प्रकार न करता, सामान्य पद्धतीने तुम्ही ते करू शकाल का?”

“विलार्ड बाईसाहेब, मध्ययुगीन काळया जादूविरुद्ध लढण्याचे अनेक उपाय सापडू शकतील. आपली तथाकथित आधुनिक शास्त्रे जी बढाई मारतात, त्यापेक्षा कदाचित त्यांना जास्त माहिती असेल. आता आपण मूळ गोष्टींकडे वळू. त्यातून मला काही मार्गदर्शन मिळेल. तुमचा नवरा पहिल्यापासून इजिप्तची संस्कृती, भाषा, इतिहास इत्यादीविषयी अभ्यास करणारा होता का?”

“हो, त्याच्या तरुणपणापासून तो तसा होता. त्या विषयातील तज्ञ जाणकारांपैकी तो एक होता.”

“पण माझ्या माहितीप्रमाणे, मिस्टर ब्लेइबनर त्या विषयाचे अभ्यासक तर होतेच, पण कमीजास्त प्रमाणात त्याची आवड असलेले होते, नाही का?

“हो, नक्कीच. ते खूप श्रीमंत गृहस्थ होते. त्याना रस वाटेल अशा विषयात, ते पूर्णपणे बुडून जात असत. त्याना इजिप्तमध्ये रस होता. आणि त्यांचे त्या मोहिमेला अर्थसहाय्य पुरवणे, हे फार उपयोगी ठरत होते.”

आणि पुतण्या? त्याला कसली आवड होती? तो त्या मोहिमेत होता का?"

मिसेस विलार्ड बोलल्या, "“मला असे वाटत नाही. खरे तर त्याच्या मृत्यूविषयी वर्तमानपत्रात वाचेपर्यंत, मला त्याचा त्यातील सहभाग माहितीदेखील नव्हता. मला नाही वाटत, की तो मिस्टर ब्लेइबनर यांच्या जवळचा होता. तशी काही जवळीक असल्याचे ते कधी बोलले नव्हते."

"त्या मोहिमेत अजून कोणकोण होते?"

"ब्रिटीश वस्तुसंग्रहालयाशी संबंधित डॉ टॉसविल होते. न्यूयॉर्क महानगर वस्तुसंग्रहालयाशी संबंधित मिस्टर श्नेनेडर होते. डॉ अमेस नावाचा एक तरुण अमेरिकन सचिव होता. तो त्याच्या व्यवसायाशी संबंधित असल्याने, त्यात होता. आणि माझ्या नवऱ्याचा विश्वासू नोकर, हसन हा देखील होता."

"अमेरिकन सचिवाचे नाव तुम्हाला आठवते आहे का?"

"मला वाटते, हार्पर. पण माझी खात्री नाही. तो त्यांच्याबरोबर फार काळ नव्हता, एवढे मला माहिती आहे. तो एक प्रसन्न चेहऱ्याचा माणूस होता.

"विलार्ड बाईसाहेब, मी आपला आभारी आहे."

"जर अजून काही सांगण्यासारखे असेल --- "

"या क्षणी तरी काही नको. ते माझ्या हातात ठेवा आणि खात्री बाळगा, मनुष्याला शक्य आहे, ते सर्व मी तुमच्या मुलाचे रक्षण करण्यासाठी करेन."

ते तंतोतंत दिलासा देणारे शब्द नव्हते, पण मला दिसले, की ते त्याने उच्चारल्यावर, विलार्ड बाईसाहेब नकळत एक पाऊल मागे झाल्या. तरी त्याच वेळी त्याने त्यांच्या भीतीची टिंगल केली नाही, त्यामुळे त्याना सुटका झाल्यासारखे वाटले होते.

त्या वेळेपर्यंत मला, पायरोच्या स्वभावमध्ये इतकी खोल रुजलेली अंधश्रद्धा असल्याचे माहिती नव्हते. आम्ही घरी परतताना मी त्याला त्यावरून छेडले. पण त्याचे बोलणे मनापासूनचे आणि थंडपणे केलेले होते.

‘‘पण हो, हेस्टीग्ज, माझा या गोष्टींवर विश्वास आहे. अंधश्रद्धेच्या शक्तीला तुम्ही कमी लेखता कामा नये.’’

‘‘आपण आता याबद्दल काय करणार आहोत?’’

‘‘हेस्टीग्ज, मला अजूनही मी जे काम करतो, त्यात खूप रस वाटतो. अरे मित्रा, सुरवातीला आपण तरुण मिस्टर ब्लेइबनरच्या मृत्यूविषयी जाणून घेण्यासाठी, न्यूयॉर्कला जाऊ.’’

त्याने लगेच तार पाठवली. आलेले उत्तर मोठे व मुद्द्याला धरून होते. तरुण रुपर्ट ब्लेइबनर अनेक वर्षे जवळ फार पैसा नसलेला होता. तो दक्षिणेतील बेटांच्या समुद्रकिनाऱ्यावर फिरून काही अमूल्य सापडते का हे बघत फिरत असे. पण दोन वर्षांपूर्वी तो न्यूयॉर्कला परतला. आणि लवकरच अजून अजून कफल्लक होऊ लागला. माझ्या मनात आलेली विशेष गोष्ट म्हणजे, अलीकडे त्याने इजिप्तला जाण्यासाठी पुरेसा पैसा साठवला होता. त्याने जाहीर केले, ‘‘मी ज्याच्याकडून पैसे उसने घेऊ शकेन, असा एक माझा चांगला मित्र तिथे आहे.’’ तथापि त्याचे बेत धुळीस मिळाले. तो त्याच्या

कंजूष काकाला शिव्या देत, न्यूयॉर्कला परतला. तो काका मृत प्राण्यांच्या हाडांना आणि मेलेल्या राजांना त्याच्या स्वतःच्या मास आणि रक्तापेक्षा महत्व देत असे. त्याच्या इजिप्तमधील तात्पुरत्या रहाण्यामध्ये सर जॉन विलार्डचा मृत्यू झाला. रुपर्ट जीवनात परत एकदा त्याच्या न्यूयॉर्कमधील निष्फळ जीवनात घुसला. आणि मग कुणाला काही न सांगता, फक्त एक चौकस मजकूर असलेले पत्र मागे ठेऊन, त्याने आत्महत्या केली. अचानक काही खंत वाटण्याच्या हुक्कीत ते लिहिले होते. त्याने स्वतःला महारोग झाल्यासारखे वाळीत टाकले गेल्याबद्दल लिहिले होते आणि शेवटी, असे जगण्यापेक्षा मेलेले बरे, असे म्हटले होते.

माझ्या डोक्यात एक पुसटशी कल्पना आली. मी खरे तर कधीच फार पूर्वी वारलेल्या इजिप्शियन राजाबद्दलच्या काही चुकीचे केल्याच्या गोष्टीवर विश्वास ठेवला नव्हता. मला इथे आधुनिक गुन्हा दिसला. कदाचित या तरुण माणसाने --- शक्यतो विष देऊन, त्याच्या काकांचा निकाल लावायचे ठरवले असेल आणि चुकून त्याच्या काकांनी तो मरणप्राय डोस घेतला असेल, मग तो न्यूयॉर्कला परतला असेल. आणि त्याला त्याच्या काकांच्या मरणाची बातमी समजली असेल. मग त्याला त्याने केलेल्या गुन्हा कसा गरज नसलेला होता, हे समजल्यामुळे पश्चात्ताप होऊन, त्याने स्वतःचा जीव घेतला असेल.

मी माझा अंदाज पायरोला सांगितला. त्याने तो रस घेऊन ऐकला.

"तू काय विचार केलास तो एक शोधच आहे --- नक्कीच तो एक शोध आहे. तो कदाचित खराही असेल. पण तू थडग्याचा मोठा परिणाम लक्षात घेतलेला नाहीस."

मी माझे खांदे शहारवले.

"तुला अजूनही वाटते का, की त्याचा काही संबंध आहे?"

"अरे मित्रा, खूपच आहे. आपण उद्या इजिप्तसाठी निघत आहोत."

मी नवल वाटून ओरडलो, "काय?"

"मी म्हणालो तेच." पायरोच्या चेहऱ्यावर जाणतेपणे नायकाचे तेज चढले. मग तो कण्हल्यासारखा म्हणाला, "पण ओहो, समुद्र! दुस्वास करण्यासारखा समुद्र!"

## दोन

त्यानंतर आठवड्याने, आमच्या पायाखाली वाळवंटाची सोनेरी वाळू होती. डोक्यावर तळपता सूर्य होता. कृपणतेचा अर्क असलेला पायरो सुकून माझ्याशेजारी पहुडला होता. तो छोटा मनुष्य चांगला प्रवासी नव्हता. मर्सेलीसपासूनचा आमचा चार दिवसांचा प्रवास त्याला झेपला नव्हता. तो अलेक्झांड्रीयाला पोचल्यावर त्याचे भुताटकीत रुपांतर झाले होते. त्याचा नेहमीचा झकपकपणादेखील उरला नव्हता. आम्ही कैरोला आलो होतो आणि लगेच पिरॅमिड्सच्या सावलीत असलेल्या मेना हाउस हॉटेलला जायला निघालो होतो.

इजिप्तच्या सुंदरतेने माझ्यावर भूल घातली होती. पण पायरोवर नाही. लंडनमध्ये करतो तसे कपडे घालून, त्याने कपड्यांचा एक लहानसा ब्रश घेऊन खिशात ठेवला. आणि त्याच्या गडद कपड्यांवरील वाळूमिश्रित हवेशी युद्ध सुरु केले.

त्याने विलाप केला, "माझे बूट हेस्टीग्ज, त्यांच्याकडे बघ. माझे छान चामड्याचे बूट नेहमी कसे चकाकत असतात. पण आता त्यात वाळू गेली आहे. हा छळवाद आहे. आणि त्याच्याबाहेरील वाळू डोळयांना झोंबते आहे. शिवाय हा उन्हाळा! त्यामुळे माझ्या मिशा वेड्यावाकड्या झाल्या आहेत. घामाने ओल्या झाल्या आहेत."

मी विनंती केली, "त्या सिंहाच्या पिरॅमिड्सकडे बघ. मला त्यातील सुंदरता व गूढ जाणवते आहे."

पायरोने त्याकडे असमाधानाने पाहिले. त्याने जाहीर केले, "मला त्याच्याकडे बघून आनंदी वाटत नाही आहे. तो कशा गबाळया पद्धतीने अर्धा वाळूत पुरला गेला आहे, बघ. ओहो, ही शापित वाळू!"

"बेल्जियममध्येही आता खूप वाळू आहे. 'मार्गदर्शक पुस्तकात म्हटल्याप्रमाणे, लेस डयून्स इम्पेसेबल्सच्या मध्ये असलेल्या, नॉक-सूर-मर येथे आम्ही मस्त सुट्टी घालवली असल्याची, मी त्याला आठवण करून दिली.

पायरो पिरॅमिडकडे टक लाऊन बघत बोलला, "ब्रुसेल्समध्ये वाळू नाही. हे खरे आहे की निदान ही पिरॅमिड्स भरीव आणि काही भौमितिक आकार असलेली आहेत. पण त्याचा पृष्ठभाग खडबडीत आणि न

सुखावणारा आहे. आणि पामची झाडे मला आवडत नाहीत. ते ती ओळीतदेखील लावत नाहीत!”

आपण आपल्या मोहिमेची सुरवात करू, असे मध्येच बोलून, मी त्याची कुरकुर थांबवली. आम्ही तिथे उंटांवर बसणार होतो. ते शांतपणे खाली वाकत होते. आम्ही त्यांच्यावर चढण्यासाठी थांबलो होते. सहजपणे भरभर बोलणाऱ्या त्या प्रमुखाच्या तांड्यात चित्रासारखी देखणी मुले होती.

मी उंटावर पायरोला चष्मा दिला. त्याने कण्हायला व कुंथायला सुरवात केली आणि त्याचा शेवट त्याच्या किंकाळ्यांमध्ये झाला. त्याने हावभाव करून मेरीचा व इतर सर्व संतांचा धावा करायला सुरवात केली. शेवटी, तो लाजीरवाण्या पद्धतीने अजून खाली घसरला आणि लहानशा गाढवावर बसून अखेर प्रवास पूर्ण केला. सवय नसलेल्याला उंटावर बसणे सोपे नाही. माझे अंग पण अनेक दिवस आखडलेले राहिले.

शेवटी आम्ही उत्खलनाच्या जागेजवळ येऊन पोचलो. सूर्याच्या उन्हाने भाजल्याच्या खुणा असणारा एक दाढीवाला, पांढऱ्या कपड्यातला डोक्यावर शिरस्त्राण घातलेला माणूस, आम्हाला भेटायला आला. “मिस्टर पायरो आणि कॅप्टन हेस्टीग्ज? आम्हाला तुमची तार मिळाली. मला माफ करा तुम्हाला कैरोमध्ये भेटायला कुणी नव्हते. एक अपूर्व अशी घटना घडल्याने, आमचे सर्व बेत फिसकटले.”

पायरो फिकट दिसू लागला. त्याचा कपडे झटकायचा हातात घेतलेला ब्रश तसाच्या तसा राहिला. त्याने श्वास रोधत विचारले, “दुसरा एखादा मृत्यू नाही ना?”

“हो.”

मी ओरडलो, “सर गाय विलार्ड?”

“नाही, कॅप्टन हेस्टीग्ज, माझा अमेरिकन मित्र, मिस्टर श्नेडर.”

पायरोने विचारले, “आणि कारण?”

“धनुर्वात.”

मी पांढरा पडलो. मला सभोवतालचे सर्व जग पापी, अनाकलनीय व धोकादायक वाटू लागले. माझ्या मनात एक भयंकर विचार आला. कशावरून पुढची पाळी माझी नसेल?

पायरो हळू बोलला, “अरे देवा, मला काही कळत नाही. हे भयंकर आहे. मिस्टर, मला हे सांगा, की तो नक्की धनुर्वाताने गेला का?”

“माझा विश्वास नाही. पण माझ्यापेक्षा डॉ आमेस तुम्हाला त्याबद्दल सांगतील.”

“ओहो, अर्थात, तुम्ही काही वैद्यकशास्त्रातील डॉक्टर नाही.”

“माझे नाव टॉसविल आहे.”

म्हणजे हा विलार्ड बाईसाहेबांनी वर्णन केलेला ब्रिटीश वस्तुसंग्रहालयातील जाणकार होता. माझ्या मनात त्याच्याविषयी अचानक काही कर्तव्यदक्ष व गंभीर असे चित्र उभे राहिले.

डॉ टॉसविल पुढे बोलले, “जर तुम्ही माझ्याबरोबर आलात, तर मी तुम्हाला सर गाय विलार्डकडे नेतो. ते तुम्हाला भेटायला उत्सुक असल्याने, तुम्ही आल्याबरोबर त्यांनी त्याना सांगायला सांगितले होते.”

आम्ही तो परिसर ओलांडून, एका मोठ्या तंबूकडे गेलो. डॉ टॉसविलनी कापडी दार वर केले आणि आम्ही आत शिरलो. आत तीन माणसे बसलेली होती.

डॉ टॉसविल म्हणाले, “मिस्टर पायरो व कॅप्टन हेस्टीग्ज आले आहेत.”

त्या तीन माणसांपैकी तरुण माणूस उडी मारून उठला व आमच्या स्वागताला पुढे आला. त्याच्या वागण्यात एक प्रकारचा जोश होता. तो बघून मला त्याच्या आईची आठवण झाली. तो इतरांइतका भाजला गेला नव्हता. पण त्याच्या डोळयांभोवती, काही सुरकुत्या दिसत होत्या. तो बावीस वर्षांपेक्षा मोठा वाटत होता. त्याच्या मनावर खूप ताण आलेला स्पष्ट दिसत होता.

त्याने त्याच्या दोन सहकाऱ्यांची ओळख करून दिली. डॉ आमेस आणि सचिव असलेले आल्हादक, नम्र तरुण, राष्ट्रीय बॅज लावलेले व शिंगांच्या कडांचा चष्मा घातलेले, मिस्टर हार्पर.

काही मिनिटांनी, काही विशिष्ट बेत नसलेल्या संभाषणानंतर, मिस्टर हार्पर बाहेर गेले. डॉ टॉसविल त्यांच्या पाठोपाठ गेले. आम्ही सर गाय विलार्ड आणि डॉ आमेसबरोबर राहिलो.

सर विलार्ड म्हणाले, “मिस्टर पायरो, तुम्हाला जे काही प्रश्न विचारायचे असतील, ते विचारा. या एकामागून एक कोसळणाऱ्या संकटांनी आम्ही दिग्मूढ झालो आहोत. पण हा नक्कीच काहीतरी योगायोग असावा.”

त्याच्या बोलण्यात थोडी उदासी दाटलेली होती. त्याची छाया शब्दांवर पडली होती. मी पाहिले की पायरो त्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास करत होता.

“सर गाय, तुमचे कामात खरोखर लक्ष लागते आहे का?”

“थोडेबहुत काय झाले ते किंवा त्यामुळे काय होणार, ते अलाहिदा. काम चालू आहे. तुमचे मन त्यासाठी तयार करा.”

पायरो दुसऱ्या विषयाकडे वळला. “डॉक्टर, तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

त्या विषयाकडे येत डॉक्टर म्हणाले, “माझा हे काम सोडायचा विचार नाही.”

पायरोने वेडेवाकडे हावभाव केले. “मग आपण कुठे व कसे उभे आहोत, याचे पुरावे शोधले पाहिजेत. मिस्टर श्चनेडर यांचा मृत्यू कधी झाला?”

“तीन दिवसांपूर्वी.”

“तो धनुर्वात होता, याबद्दल तुमची खात्री आहे?”

“शंभर टक्के.”

“उदाहरणार्थ, ही स्ट्रायचनीनने विषबाधा झाल्याची केस नव्हती?”

“नाही, मिस्टर पायरो. मला कळते आहे तुम्हाला काय म्हणायचे आहे. पण ही अगदी स्पष्टपणे धनुर्वाताची केस होती.”

“तुम्ही त्यावर उपाय करण्याचे इंजेक्शन दिले नाही का?”

डॉक्टर कोरडेपणे बोलले, “नक्कीच आम्ही ते दिले. त्याना वाचवू शकेल, अशी प्रत्येक गोष्ट आम्ही केली.”

“तुमच्याकडे ते इंजेक्शन होते का?”

“नव्हते. आम्ही ते कैरोहून मागवले.”

“येथील परिसरात अजून काही धनुर्वाताच्या केसेस झाल्या का?”

“नाही, एकही नाही.”

“मिस्टर ब्लेइबनरचा मृत्यू धनुर्वाताने झाला नसल्याची तुमची खात्री आहे का?”

“अगदी खात्री आहे. त्यांचा अंगठ्यावर ओरखडा होता. त्याला विषबाधा झाली. आणि सेप्टिक झाले. एखाद्या सामान्य माणसाला ते सर्व सारखेच आहे, असे मी म्हणू शकतो. पण दोन्ही मृत्यूंची कारणे फार वेगळी आहेत.”

“म्हणजे इथे चार मृत्यू झाले --- प्रत्येक केस वेगळी होती. एकाची हृदयक्रिया बंद पडली. एकजण रक्तात विष भिनल्याने गेला. एकाने आत्महत्या केली. तर एकजण धनुर्वाताने गेला.”

“बरोबर, मिस्टर पायरो.”

“तुमची खात्री आहे का, की या चारी मृत्यूंमध्ये सारखी अशी कुठलीच गोष्ट नाही?”

“तुम्हाला काय म्हणायचे आहे, मला समजत नाही?”

“मी ते स्पष्टपणे सांगतो. राजा मेन-हर-रा याच्या आत्मिक शक्तीला कमी लेखल्याने, तर त्या चौघांचा मृत्यू घडून आला नसेल ना?”

डॉक्टरांनी पायरोकडे आश्चर्याने बघितले. “मिस्टर पायरो तुम्ही बिनडोकपणे बोलत आहात. असा मूर्खासारख्या गोष्टींवर तुमचा विश्वास तरी कसा काय बसतो?”

तरुण विलार्ड रागाने पुटपुटला, “टोकाचा मूर्खपणा!”

पण पायरो ठाम राहिला. त्याचे मांजराचे डोळे चकाकत राहिले. “तर मग मिस्टर डॉक्टर, तुमचा यावर विश्वास नाही?”

डॉक्टरने जोर देत म्हटले, “नाही, सर. मी शास्त्रीय माणूस आहे. मी शास्त्र शिकवतो. त्यावरच फक्त विश्वास ठेवतो.”

पायरोने हळूवारपणे विचारले, “मग प्राचीन इजिप्तमध्ये शास्त्र नव्हते का?” उत्तरासाठी तो थांबला नाही. आणि खरोखर डॉ आमेस क्षणभर हरवल्यासारखे झाले. “नको. नको. मला उत्तर देऊ नका. पण मला हे सांगा. तेथील कामगारांना काय वाटते?”

डॉ आमेस बोलले, “मला वाटते, जिथे गोऱ्या लोकांचे डोके चालत नाही, तेव्हा स्थानिक लोक मागे पडत नाहीत. मी कबूल करतो, की तुम्ही ज्याला भीती म्हणाल, असे काहीतरी त्याना वाटत असावे --- पण खरे तर, त्याना भीती वाटायचे काही कारण नाही.”

पायरो नाकबूल करत बोलला, “मला नवल वाटते.”

सर गाय पुढे झुकला. तो अविश्वासाने ओरडला, “तुम्ही विश्वास ठेऊ शकत नाही --- आहा, पण ही गोष्ट गैरलागू आहे. तुम्हाला असे वाटत

असेल, की तुम्हाला पुरातन इजिप्तबद्दल काही माहिती आहे, पण तसे ते नाही.”

उत्तरादाखल पायरोने खिशातून एक लहानसे पुस्तक काढले --- जुने, फाटके तुटके पुस्तक. त्याने ते बाहेर काढल्यावर मी त्यावरील नाव वाचले. ‘इजिप्शियन्स व बॅबिलोनीयन्स यांची जादू’ नंतर गोल फिरून तो तंबूबाहेर पडला. डॉक्टर माझ्याकडे बघत राहिले.

“त्याची काय कल्पना आहे?”

पायरोच्या ओठांवर असलेले ते शब्द दुसऱ्यांकडून ऐकून मला हसू आले.

“मला खात्रीपूर्वक माहिती नाही. पापी आत्मिक शक्ती घालवून लावण्यासंबंधी त्याचा काही बेत असावा, असे मला वाटते.”

मी पायरोला शोधायला गेलो. आणि त्याला एका चेहरा खाली वळवलेल्या तरुणाशी, दिवंगत मिस्टर ब्लेइबनर यांच्या सचिवाशी बोलतांना पाहिले.

मिस्टर हार्पर बोलत होते, “मी या मोहिमेत सहा महिने आहे. मला मिस्टर ब्लेइबनर यांची चांगली माहिती आहे.”

“तुम्ही मला त्यांच्या पुतण्याबद्दल काही सांगू शकाल का?”

“एक दिवस तो इथे आला होता. तो दिसायला फार वाईट नव्हता. मी त्यापूर्वी त्याला कधी भेटलो नव्हतो. पण इतर काहीजण त्याला भेटले होते. मला वाटते, आमेस आणि श्नेडर. तो म्हातारा त्याला भेटून काही खूष झाला नाही. लगेचच आक्रमकपणे त्यांची बाचाबाची सुरु झाली.

म्हातारा ओरडला, “एक सेंटही नाही. आता किंवा मी मेल्यावरसुद्धा एकही सेंट नाही. माझ्यानंतर माझे पैसे मी माझ्या आयुष्यभराच्या कामासाठी ठेवणार आहे. आज मी मिस्टर श्चनेडरशी याबद्दल बोलतो आहे.”

“आणि असेच काही. तरुण ब्लेइबनर लगेच कैरोला निघून गेला.”

“तेव्हा त्याची तब्येत एकदम चांगली होती का?”

“म्हाताऱ्याची का?”

“नाही. तरुण माणसाची.”

“मला वाटते, तो त्याची तब्येत काहीशी बिघडल्याविषयी बोलला. पण तसे गंभीर काही नव्हते. नाहीतर माझ्या लक्षात राहिले असते.”

“अजून एक गोष्ट, मिस्टर ब्लेइबनर यांनी मृत्युपत्र करून ठेवले आहे का?”

“आम्हाला माहिती आहे, त्याप्रमाणे, नाही.”

“मिस्टर हार्पर, तुम्ही मोहिमेत रहाणार आहात का?”

“नाही, सर. मी रहाणार नाही. इथल्या गोष्टी आवरल्या, की मी न्यूयॉर्कला जाणार. तुम्हाला हसायचे असेल, तर हसा. पण मी या गोंधळात रहाणार नाही व मेन-हर-रा चा पुढील बळी ठरणार नाही. मी इथे थांबलो तर पुढचा क्रम नक्की माझाच असेल.”

त्या तरुण माणसाने त्याच्या भुवईवरील घाम टिपला.

पायरो निघून गेला. विशेष असे हसू हसत, पण उदासीनतेने तो बोलला, “लक्षात ठेव, न्यूयॉर्कमध्ये पुढचा बळी जाणार.”

मिस्टर हार्पर जोराने म्हणाले, "ओहो, ते गेले खड्ड्यात!"

पायरो विचारपूर्वक बोलला, "तो तरुण मनुष्य उदास झाला आहे. तो कडेवर उभा आहे. अगदी कडेवर!"

मी चौकसपणे पायरोकडे पाहिले. पण त्याच्या कोड्यात टाकणाऱ्या हसण्याने मला काहीच सांगितले नाही. सर गाय विलार्ड आणि डॉ टॉसविल यांच्याबरोबर आम्ही उत्खलनाच्या जागेभोवती एक फेरी मारली. मुख्य अवशेष कैरोला पाठवण्यात आले होते. पण थडग्यातील काही फर्निचर फारच स्वारस्य वाटेल, असे होते. त्या शिपाईगड्याला उत्साह असणे साहजिक होते. पण त्याच्या वागण्यात मला थोडी उदास छटा दिसत होती, जसे काही त्याची हवेमधील काही धमकीवजा भावनेपासून सुटका नव्हती. जेव्हा जेवणापूर्वी हात धुण्यासाठी, आम्ही आम्हाला दिलेल्या तंबूत शिरलो, तेव्हा पांढऱ्या कपड्यातील एक काळी आकृती तिथे मोठ्या डौलाने उभी होती. ती अरेबिकमध्ये काही स्वागतपर शब्द पुटपुटत होती. पायरो थांबला.

"तू दिवंगत मिस्टर विलार्ड यांचा नोकर हसन आहेस का?"

"हो, मी त्यांच्या चाकरीत होतो. आता मी त्यांच्या मुलाची सेवा करतो." त्याने एक पाऊल पुढे येऊन, त्याचा आवाज खाली करत म्हटले, "सगळे म्हणतात, तुम्ही हुशार आहात. पापी शक्तींविरुद्ध लढण्यात माहीर आहात. छोट्या मालकांना तुम्ही इथून बाहेर काढा. इथे आपल्याभोवती पापी हवा आहे."

आणि विचित्र हावभाव करत, उत्तरासाठी न थांबता, तो निघून गेला.

पायरो पुटपुटला, “आपल्याभोवती पापी हवा आहे. हो. मला ते जाणवते आहे.”

जेमतेम एक जेवण आनंदी झाले. इजिप्शियन जुन्या अमूल्य वस्तुंबद्दलच्या कल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी डॉ टॉसविल यांना पूर्ण मजला बहाल करण्यात आला. आम्ही आता विश्रांती घ्यायला जाणार, तेवढ्यात सर गाय यांनी पायरोचा दंड पकडला व काही दाखवू लागले. एक सावलीसारखी आकृती तंबूतून फिरत होती. तो मानव नव्हता. मी त्याचे डोके तंबूवर कोरलेल्या कुत्र्याचे असल्याचे खात्रीपूर्वक पाहिले. ते बघून माझे रक्त गोठले.

तंबू ओलांडत, पायरो पुटपुटला, “मृतांकडून पापाचा पाढा वाचून घेणारा, लांडग्याचा तोंडाचा इजिप्शियन देव, मृतात्म्यांचा देव.”

रागाऊन डॉ टॉसविल उभे रहात ओरडले, “आपल्याला कुणीतरी खोट्या हाका मारत आहे.”

सर गाय पडेल चेहऱ्याने बोलले, “हार्पर, तो आवाज तुझ्या तंबूत गेला.”

पायरो त्याचे डोके हलवत बोलला, नाही, तो डॉ आमेस यांच्या तंबूत गेला.

डॉक्टर विश्वास न बसून त्याच्याकडे बघत डॉ टॉसविलचे शब्द परत उच्चारत बोलले, “कुणीतरी आपल्याला खोट्या हाका मारते आहे. या. लवकरच आम्ही त्या माणसाला पकडू.”

त्या सावलीला धरण्यासाठी तो जोराने तुटून पडला. मी त्याच्या पाठोपाठ गेलो. पण शोधूनही आम्हाला कुणी जिवंत आत्मा तिथून जातांना दिसला नाही. आम्ही मनाने थोडे खचून परतलो. आता पायरो त्याच्या पद्धतीने, स्वतःला सुरक्षित ठेऊन, तेच करत होता. तो आमच्या तंबूभोवती, पायाने वाळूत काही साध्या काही छापलेल्या आकृत्यासारख्या आकृत्या काढत जोरजोराने फिरत होता. पाच टोकांची चांदणी किंवा पंचकोन माझ्या लक्षात आला. तो त्याने पुष्कळ वेळा काढला. तोंडाने तो सहजपणे जादू आणि चेटूक यावर काही तयारी न करता, भाषण झोडत होता. पांढरी जादू विरुद्ध काळी जादू, यावर अनेक उदाहरणे देत व मृत्युनंतर व्यक्तीच्या पुतळ्याच्या स्वरूपात शिल्लक रहाणाऱ्या व पुस्तकांमध्ये मेलेल्यांबद्दल दिलेल्या माहितीनुसार, त्याची ही बडबड चालली होती.

डॉ टॉसविलने मला रागारागाने बाजूला करत, उद्दीपित होऊन, या प्रकाराविषयी नावड व्यक्त करायला सुरवात केली.

तो रागाने ओरडला, “सर, काय मूर्खासारखी बडबड चालवली आहे? फारच मूर्खासारखी! दुसऱ्यांना फसवण्यासाठीचे हे ढोंग चालले आहे. त्याला मध्ययुगीन अंधश्रद्धा आणि आणि पुरातन इजिप्तच्या श्रद्धा यामधील फरक माहिती नाही आहे. असा कशावरही विश्वास ठेवणे व अज्ञानाने गोंधळ घालणे, मी कधी पाहिले नव्हते.”

मी त्याला शांत करून तंबूत आणले. माझा छोटा मित्र आनंदाने तळपत होता.

त्याने आनंदाने म्हटले, “आता आपण सुखाने झोपू शकू. मला थोडीफार झोप मिळू शकेल. माझे डोके फार दुखते आहे. आहा, काही औषधी वनस्पतींचा काढा मिळाला तर!”

जणू काही प्रार्थनेला उत्तर म्हणून तंबूचा कापडी दरवाजा उघडत, हसन तिथे आला. त्याने एक गरम पेय पायरोला दिले. तो उंटाच्या दुधाचा चहा होता. तो त्याला फारसा आवडत नव्हता. हसनचे आभार मानून, आणि अजून एक कप घ्यायला नकार देऊन, पुन्हा आमचे आम्हीच राहिलो. कपडे बदलल्यावर, मी तंबूच्या दारात उभा राहून वाळवंटाकडे बघत राहिलो.

मी मोठ्याने म्हणालो, “काय छान जागा आहे आणि काय छान काम आहे!” मला ते आवडत होते.” हे वाळवंटातील आयुष्य, लयास गेलेल्या संस्कृतीची समस्या म्हणून उभे आहे. पायरो, तुलाही या सौदर्याने भारून टाकले असेल का?”

मला उत्तर मिळाले नाही. मी जरा रागावून वळलो. पण माझा राग क्षणार्धात कणवेत बदलला. जाड्याभरड्या कोचावर पायरो अडवारला होता. त्याचा चेहरा पिळवटून गेला होता. त्याच्या शेजारी रिकामा कप पडला होता. मी त्याच्याकडे धावलो व मग बाहेर पडून डॉ आमेसच्या तंबूकडे जोराने पळत गेलो.

मी ओरडलो, “डॉक्टर आमेस, ताबडतोब या.”

पायजम्यातील डॉक्टर म्हणाले, “काय झाले?”

“माझा मित्र मरणप्राय आजारी आहे. उंटाचा चहा! हसनला इथून बाहेर जाऊ देऊ नका.”

वाऱ्याच्या वेगाने डॉक्टर आमच्या तंबूकडे धावले. पायरो तसाच पडलेला होता.

डॉ आमेस ओरडले, “हे विचित्र आहे. मेंदूत काही वेगळीच वीजेसारखी हालचाल झाली आहे. त्याने काही प्यायल्याचे तुम्ही काय बोललात?” त्याने रिकामा कप उचलला.

एक शांत आवाज बोलला, “मी तो चहा प्यायलो नाही.”

आम्ही आश्चर्याने त्याच्याकडे वळलो. पायरो अंथरुणावर उठून बसून हसत होता.

तो म्हणाला, “नाही. मी तो प्यायलो नाही. माझा मित्र जेव्हा वाळवंटाच्या सौदर्याचे वर्णन करत होता, तेव्हा मी तो ओतून द्यायची संधी घेतली, घशात नव्हे, तर एका छोट्या बाटलीत. ती बाटली आता विश्लेषण करणाऱ्या प्रयोगशाळेत जाईल --- डॉक्टरने अचानक काही हालचाल केली. पायरो म्हणाला, “शहाणा असशील, तर तुला कळेल, की आक्रमकतेचा काही उपयोग नाही. हेस्टीग्जच्या अनुपस्थितीत, मी ती बाटली सुरक्षित जागी ठेवली आहे. हेस्टीग्ज, पटकन त्याला धर!”

मला वेगळ्याच कारणासाठी पायरोची काळजी वाटली. त्याला वाचवण्याच्या घाईत, मी त्याच्यासमोर अडवारलो. पण डॉक्टरांच्या हळुवार हालचालीचा अर्थ दुसरा होता. कडू बदामांचा वास हवेत पसरला होता. त्याचा हात त्याच्या तोंडावर गेला. तो पुढे झुकला व पडला.

पायरो दुःखाने बोलला, “अजून एक बळी, पण शेवटचाच. कदाचित हा चांगला उपाय आहे. त्याच्या डोक्यावर तीन हत्यांचे पाप आहे.”

मी अवाक होऊन, ओरडलो, “डॉ आमेस? पण पायरो, मला वाटले, की तुझा काही अतर्क्य शक्तींवर विश्वास आहे.”

हेस्टीग्ज, तू माझ्याविषयी गैरसमज करून घेतलास. मी काय म्हणालो तर असे, की माझा अंधश्रद्धेच्या विलक्षण जोरावर विश्वास आहे. एकदा ही भावना खोल रुजली, की मरणमालिका भव्य नैसर्गिक शक्तीमुळे आहे, की मग तुम्ही दिवसाढवळ्या एखाद्याला भोसकू शकता आणि तरीही तो शाप असल्याचे धरले जाईल. मानवजातीतील अंधश्रद्धेची भावना इतकी खोलवर रुजलेली आहे. माझा पहिल्यापासून संशय होता, की मनुष्य त्या भावनेचा फायदा घेत आलेला आहे. मला वाटते, ही कल्पना जॉन विलार्डच्या मरणापासून त्याच्या मनात आली. अंधश्रद्धेच्या भावनेची मोठी लाट आली. मला दिसते त्याप्रमाणे, मिस्टर जॉनच्या मरणाने कुणाचे उखळ पांढरे होणार नव्हते. पण मिस्टर ब्लेइबनरची केस वेगळी होती. तो खूप श्रीमंत मनुष्य होता. मला न्यूयॉर्कहून मिळालेली माहिती, खूप काही मुद्दे सुचवणारी होती. सुरवातीला तरुण ब्लेइबनर म्हणाला होता, की ज्याच्याकडून तो पैसे उसने घेऊ शकेल, असा त्याचा एक खूप चांगला मित्र इजिप्तमध्ये आहे. हे त्याने न बोलता, समजले गेले, की तो त्याच्या काकांबद्दल बोलतो आहे. पण मला असे वाटले, की तो मग तसे सरळ बोलला असता. ते शब्द असे सुचवत होते, की कुणी त्याला मदत करेल,

असा मित्र. दुसरी गोष्ट त्याने इजिप्तला येण्यासाठी बरेच पैसे खर्च केले होते. त्याच्या काकांनी त्याला एक पैदेखील उसनी द्यायला नकार दिला. तरीही न्यूयॉर्कला परत जायला त्याच्याकडे पैसे शिल्लक होते. कुणीतरी त्याला पैसे दिले असले पाहिजेत.”

मी हरकत घेत म्हणालो, “हे सर्व मोघम आहे.”

“पण अजूनही काही आहे, हेस्टीग्ज, कधीकधी नेहमीच्या भाषेत उच्चारलेले शब्द हे पुरेश्या प्रतिकात्मक रीतीने वापरले जातात. तरुण ब्लेइबनरने सरळपणे लिहिले होते, मी महारोगी आहे. पण त्याला तो सगळयांपासून वेगळा पाडणारा आजार झाल्याने, त्याने स्वतःवर गोळी झाडून घेतली, हे कुणाला कळले नाही.”

मी करवादलो, “काय?”

“राक्षसी मनाचा हा हुशारीचा शोध होता. तरुण ब्लेइबनरला साधा किरकोळ स्वरूपाचा त्वचेचा विकार होता. तो दक्षिणेकडील समुद्री बेटांवर राहीला होता आणि तिथे तो आजार खूपजणांना होत असे. आमेस त्याचा आधीचा मित्र आणि प्रसिद्ध डॉक्टर होता. त्याचा शब्द तो फिरवेल, असे तरुण ब्लेइबनरला अजिबात वाटले नाही. “जेव्हा मी इथे आलो तेव्हा माझा संशय हार्पर आणि डॉ आमेस या दोघांवरही होता. पण लवकरच माझ्या लक्षात आले, की फक्त डॉक्टरनेच गुन्हा करून, तो लपवला असला पाहिजे. आणि मला हार्परकडून समजले, की त्याची आधीपासून तरुण ब्लेइबनरशी ओळख होती. तरुण ब्लेइबनरने संशयातीतपणे, केव्हा ना केव्हा अशी इच्छा प्रगट केली असेल, की डॉक्टरसाठी आयुष्यदेखील पणाला

लावायची त्याची तयारी आहे. डॉक्टरला ती संपत्ती मिळवायची संधी वाटली. मिस्टर ब्लेइबनरला लसीद्वारे भयंकर जंतू टोचणे डॉक्टरला शक्य होते. त्यामुळे तो मेल्यावर, मग तरुण ब्लेइबनरला, मिस्टर ब्लेइबनरचा पुतण्याला त्याच्या मित्रामार्फत ही बातमी सांगण्यात आली, तेव्हा तो अतिशय दुःखी झाला आणि त्याने स्वतःवर गोळी चालवली. मिस्टर ब्लेइबनरने काही कारणाने का होईना, पण त्याचे मृत्युपत्र बनवले नव्हते. त्याचे नशीब त्याच्या पुतण्याकडे गेले असते आणि तिथून मग डॉक्टरकडे.”

“आणि मिस्टर श्नेडर?”

“आपली खात्री नाही. लक्षात घे, तो पण तरुण ब्लेइबनरला ओळखत होता आणि त्यालाही काही संशय आलेला होता. किंवा परत डॉक्टरला वाटले असेल, की पुढील हेतू नसलेले मरण अंधश्रद्धेचा गुंता घालवेल. हेस्टीग्ज, शिवाय मी तुला एक स्वारस्यपूर्ण मानसशास्त्रीय विचार सांगतो, खुन्याची अशी प्रबळ इच्छा असते, की त्याने त्याचा पचलेला खून ज्याप्रकारे केला, ती पद्धत परत वापरावी. त्याचा अंमल त्याच्यावर असतो. त्यामुळे मला तरुण विलार्डची भीती वाटते. आज रात्री लांडग्याचे डोके असलेला इजिप्शियन देव तू पाहिलास, तो माझ्या आज्ञेने हसनने केलेला वेषबदल होता. मला असे बघायचे होते, की मी डॉक्टरला घाबरवू शकतो का. पण त्याला घाबरवण्यासाठी अजून जास्त काही करण्याची गरज होती, असे दिसले. छुप्या गोष्टीतील माझे ढोंग त्याला लागू पडले नाही. त्याच्यासाठी मी जे छोटेसे प्रहसन केले, त्याने तो फसला नाही. मला संशय आला, की तो मला पुढचा बळी बनवणार. पण समुद्राची शापित शक्ती, फार

वाईट उष्णता आणि वाळूचा त्रास हे असूनदेखील मेंदूच्या करड्या पेशी काम करत होत्या.”

पायरो त्याच्या अंदाजात एकदम बरोबर ठरला. काही वर्षांपूर्वी, तरुण ब्लेइबनर खूप पिऊन मौजमजा करत असतांना, त्याने एक विनोदी इच्छा केली होती. ‘माझ्या सिगरेट केसचे तू इतके कौतुक करतोस, ती आणि बाकी सगळे जे माझे आहे, ते सगळे बुडतांना माझा जीव वाचवणारा माझा चांगला मित्र रॉबर्ट आमेस याला मी देतो. त्याने तसे लिहूनही ठेवले होते’

ही केसबद्दलची चर्चा शक्य तेवढी बंद झाली आणि आजपर्यंत लोक उल्लेखनीय मरणसाखळीबद्दल व मेन-हर-रा याच्या थडगे उकरून त्याच्या पवित्रतेचा अपमान करणाऱ्या लोकांबद्दल, त्याना राजाने दिलेल्या त्यांच्या चुकीच्या शिक्षेबद्दल बोलत आहेत. पण पायरोने मला दाखवून दिल्याप्रमाणे, हे सर्व इजिप्शियन विचारांच्या व श्रद्धांच्या विरुद्ध आहे.

The Incredible Theft

# अविश्वसनीय चोरी



## एक

स्वयंपाक्याने गोल केक उमराव मेफिल्डला आणून दिला. त्याच्या उजव्या हाताला असलेल्या ज्युलिया कॅरिंग्टन बाईसाहेबांकडे बघून, उमराव मेफिल्ड गुप्तपणे वाकला. उत्तम यजमान असल्याच्या त्याच्या कीर्तीमुळे, उमराव मेफिल्डने तो त्रास घेतला. जरी तो अविवाहित असला, तरी तो स्त्रियांशी नेहमी गोडीने वागत असे.

ज्युलिया कॅरिंग्टन बाईसाहेब चाळीशीच्या होत्या. त्या उंच, आकर्षक, खूप बारीक पण तरीही सुंदर होत्या. विशेषतः त्यांचे हात व पाय नाजूक होते. त्यांची वागायची पद्धत अनपेक्षित व घाईघाईची होती. ती सतत काळजी करणारी बाई होती.

गोल टेबलावर तिच्यासमोर तिचा नवरा, एअरमार्शल सर जॉर्ज कॅरिंग्टन बसला होता. त्याने त्याचे व्यावसायिक आयुष्य नेव्हीपासून सुरु केले आणि अजूनही तो वादळी बढाया मारणारा नेव्हीतून निवृत्त झालेला मनुष्य होता. यजमानाच्या विरुद्ध बाजूला बसलेल्या सुंदर मिसेस व्हॅंडेर्लनशी तो इकडच्या तिकडच्या गप्पा मारत हसत होता.

मिसेस व्हॅंडेर्लन सोनेरी केसांची अतिशय सुंदर बाई होती. तिचे उच्चार थोडेसे अमेरिकन धाटणीचे होते. पण टोकाचे ताणलेले अमेरिकन नसून, पुरेसे आल्हादक होते. सर जॉर्ज कॅरिंग्टनच्या दुसऱ्या बाजूला, संसद सभासद, गृह व तान्ह्या मुलांची कल्याणकारी अधिकारी असलेली, मिसेस मकाट्टा बसली होती. ती लहानसहान वाक्ये बोलण्यापेक्षा भुंकत होती आणि साधारणपणे काहीशी त्रासदायक स्वभावाची होती. त्यामुळे हे नैसर्गिक होते, की एअरमार्शलने उजव्या हाताच्या आल्हादक बाईशी बोलणे पसंत केले.

मिसेस मकाट्टा कुठेही असली तरी नेहमीप्रमाणे तिच्या विशेष विषयांवरील तीचतीच माहिती, घाईघाईने तिच्या डाव्या हाताला बसलेल्या शेजाऱ्याला, तरुण रेगी कॅरिंग्टनला देत होती.

रेगी कॅरिंग्टन एकवीस वर्षांचा होता. आणि त्याला घरगुती गोष्टी, तान्ह्या मुलांचे कल्याण व राजकारण यात काहीच रस नव्हता. तो दर थोड्या वेळाने म्हणत होता, "किती भीतीदायक", "मी तुमच्याशी पूर्णपणे सहमत आहे." आणि त्याचे मन शहाणपणाने भलतीकडेच होते. उमराव मेफिल्डचे खासगी सचिव, मिस्टर कार्लीले हे तरुण रेगी आणि त्याच्या आईच्या मध्ये बसले होते. नाकावर क्लिप असलेला चष्मा घातलेला व स्वतःला फार शहाणा समजणारा फिकुटलेला हा तरुण अगदी कमी बोलत होता. पण तो कुठल्याही तुटक्या संभाषणात भाग घ्यायला तयार होता. रेगी त्याची जांभई येणे टाळत असल्याचे लक्षात आल्याने, तो पुढे झुकला आणि मुलांच्या सुदृढतेविषयी काही योजना आहे का, असे त्याने मिसेस मकाट्टाला विचारले.

पिवळसर उजेडात गोल टेबलाभोवती शांतपणे फिरत, स्वयंपाकी व दोन नोकर वाईनचे पेले व भरलेली ताटे सगळ्यांना देत होते. उमराव मेफिल्ड त्याच्या स्वयंपाक्याला खूप पगार देत असे आणि तो वाइनमधील दर्दी म्हणून ओळखला जात असे.

टेबल गोल असले तरी यजमान कोण आहे याबद्दल कुणाला संभ्रम नव्हता. जिथे उमराव मेफिल्ड बसला होता, ती नक्की यजमानाची जागा झाली होती. तो चौकोनी खांदे असलेला, दाट चंदेरी केसांचा, मोठ्या सरळ नाकाचा आणि थोडीशी मोठी भासणारी हनुवटी असलेला वयाने मोठा माणूस होता. त्याचा चेहरा सहजपणे मोठा दिसत होता. सर चार्लस्

मॅकलॉघालिनप्रमाणे उमराव मेफिल्डने मोठ्या इंजिनिअरींग कंपनीचे संचालकपद सांभाळून राजकीय कारकीर्ददेखील घडवली होती. तो स्वतः प्रथम श्रेणीचा इंजिनिअर होता. त्याला एक वर्षापूर्वी उमरावपद बहाल केले गेले होते. सैन्यातील नुकतेच उदयाला आणले गेलेले नवे मंत्रीपदही त्याला दिले गेले होते.

टेबलावर आईस्क्रीम ठेवले गेले. परत एकदा पेय हवे का, विचारले गेले. मिसेस व्हॅडेर्लनला बघून ज्युलिया बाईसाहेब उठल्या. तीन बायकांनी खोली सोडली. परत एकदा पेय फिरवले गेले. मग उमराव मेफिल्ड हळूच सगळ्यांकडे वळला. पाच मिनिटे खेळकर संभाषण झाले. मग सर जॉर्ज रेगीला उद्देशून म्हणाले, “तू सोडून बाकी सगळ्यांनी हॉलमध्ये जमलेले मला आवडेल. रेगी, माझ्या मुला, तू गेलास, तरी उमराव मेफिल्डला काही वाटणार नाही.

मुलाने ती सूचना पुरेशा सोपेपणे घेतली. “उमराव मेफिल्ड, आभारी आहे. मला वाटते, मी ते करेन.”

मिस्टर कार्लीले पुटपुटले, “उमराव मेफिल्ड, तुम्ही मला माफ कराल. मला काही पत्रे लिहायची आहेत व इतर काम निपटायचे आहे --- “

उमराव मेफिल्डने मान हलवली. दोन तरुण माणसे खोलीबाहेर पडली. नोकर मंडळी काही वेळापूर्वीच गेली होती. सैन्यप्रमुख आणि वायुसेनाप्रमुख दोघेच उरले.

एकदोन मिनिटाने कॅरिंग्टन बोलला, “तर मग ठीक आहे?”

“अगदी पूर्णपणे! युरोपमधील कुठलाही देश या नवीन बॉम्बरला धक्का लावू शकणार नाही.”

“त्याना आपण नक्कीच वरचढ ठरू का? मला असे वाटते.”

उमराव मेफिल्ड ठामपणे बोलला, “वायुसेनेचे श्रेष्ठत्व.”

सर जॉर्ज कॅरिंग्टनने एक खोल सुस्कारा टाकला.

“चार्ल्स, हा काळाचा महिमा आहे. आपण एका अस्वस्थपणातून जात आहोत. युरोपभर सगळीकडे खूप बंदुकीची दारू वापरली जाते आहे. आणि आपण तयार नव्हतो. जाऊ दे! आपला आवाज कमी आहे. आपण नवीन बॉम्बर विमान बांधायची कितीही घाई केली, तरी आपण अजून जंगलामधून बाहेर पडलेलो नाही.”

उमराव मेफिल्ड पुटपुटला, “जॉर्ज, तथापि उशीरा सुरवात करण्याचे काही फायदे आहेत. युरोपमधील बरेचसे देश आता जुने झाले आहेत --- ते जवळजवळ डबघाईला पोचले आहेत.”

सर जॉर्ज मलूलपणे म्हणाले, “त्यात काही अर्थ आहे, असे मला वाटत नाही. प्रत्येकजण नेहमी हे ऐकतो आहे, की हा देश गाळात गेला आहे. पण ते सर्व सारखेच आहेत. पैसा हे माझ्यासाठी नेहमी गूढ राहिलेले आहे.”

उमराव मेफिल्डने डोळे मिचकावले. सर जॉर्ज कॅरिंग्टन नेहमी जुन्या वळणाचा राहिला होता. “बरीच वर्षे समुद्रावर राहिलेला थापाड्या!” लोक म्हणत हे त्याने मुद्दाम पांघरलेले सोंग आहे.

विषय बदलत, कॅरिंग्टन जरा उडतउडत म्हणाला, “मिसेस व्हॅडेर्लन फारच आकर्षक बाई आहे.”

उमराव मेफिल्ड बोलला, “ती इथे काय करते आहे, याचे तुला नवल वाटते आहे का?”

त्याच्या डोळ्यांचे मनोरंजन झाले.

कॅरिंग्टन थोडा गोंधळलेला वाटला. “छे, मुळीच नाही. मुळीच नाही.”

“हो. तू तसा होतास. जॉर्ज, उगीच खोटे बोलू नकोस. थोड्या दुःखी पद्धतीने तू नवल वाटून घेत होतास, तरी मीही अलीकडे तिच्या कटाक्षांनी जखमी झालो होतो.”

कॅरिंग्टन सावकाशीने बोलला, “मी हे कबूल करतो, की ती इथे असावी, हे मला विचित्रपणे फालतू वाटले. विशेषतः या शनिवार रविवारी!”

उमराव मेफिल्डने मान हलवली.

एअरमार्शल घाईघाईने म्हणाला, “जिथे प्रेत आहे, तिथे कावळे घिरट्या घालणारच. आपल्याकडे मोठे विशिष्ट प्रेत आहे. आणि मिसेस व्हॅडेर्लन गिधाड क्रमांक १ आहे.”

या मिसेस व्हॅडेर्लनविषयी तुला काही माहिती आहे का?”

उमराव मेफिल्डने सिगरेटचे शेवटचे थोटूक कापून पुन्हा नीट पेटवले व मागे रेलून बसत, त्याने त्याचे शब्द मोठ्या काळजीपूर्वक उच्चारले, “मिसेस व्हॅडेर्लनविषयी मला काय माहिती आहे? तर ती अमेरिकन आहे. तिला तीन नवरे होते. एक इटालियन, एक जर्मन आणि एक रशियन. त्याचा परिणाम म्हणून तिने खूप उपयुक्त ओळखी वाढवल्या आहेत. त्याला तिन्ही देशात लागेबांधे म्हणतात.

मला माहिती आहे तिला खूप खर्चिक कपडे घेणे परवडते आणि ती खूप चैनीत रहाते. आणि असे करण्यासाठी, हा पैसा कुठून येतो, त्याची काही खात्री नाही.”

मोठ्याने हसत सर जॉर्ज कॅरिंग्टन पुटपुटले, चार्ल्स, मला वाटते तुझे हेर जरा मंद आहेत.”

उमराव मेफिल्ड बोलत राहिला, “मला माहिती आहे. शिवाय ते चुंबकीय शक्तीसारखे आकर्षित करणारे सौदर्य आहे. मिसेस व्हॅडेर्लन एक चांगली श्रोतादेखील आहे. ती आपण ज्याला विक्री व्यवहार म्हणतो, त्यात उत्तम रस प्रदर्शित करू शकते. म्हणजेच एखादा मनुष्य तिला त्याच्या कामाबद्दल सर्व काही सांगू शकतो आणि त्याला वाटते, की हे ती बाई खूप स्वारस्य दाखवून ऐकते आहे. विविध प्रकारचे तरुण ऑफिसर्स त्यांच्या उत्साहात जरा जास्तच पुढे जातात आणि मग त्याचा परिणाम म्हणून, त्यांचे करीयर मार खाते. ते मिसेस व्हॅडेर्लनला नको एवढे जास्त सांगतात. त्या बाईचे जवळजवळ सर्व मित्र नोकरीत आहेत --- पण गेल्या हिवाळयात, ती एका सैन्याचा मोठा तळ असलेल्या गावाजवळ शिकार करत होती. तिने तिथे खूपजणांशी मैत्री केली --- सहज व शुद्ध हेतूने नव्हे. थोडक्यात, मिसेस व्हॅडेर्लन फार उपयोगी व्यक्ती आहे, असे म्हणत त्याने सिगरेटच्या धुराने हवेत एक गोल काढला. कोणाच्या नावाचा काढला हे न सांगणेच कदाचित बरे ठरेल. आपण एवढेच म्हणू की एका युरोपियन शक्तीसाठी --- कदाचित एका युरोपियन शक्तीपेक्षा जास्त.”

कॅरिंग्टनने एक खोल श्वास घेतला. “चार्ल्स, तू माझ्या मनावरचे मोठे ओझे उतरलेस.”

“तुला वाटले, मला धोक्याची घंटा वाजवून दाखवावी? माझ्या प्रिय जॉर्ज, माझ्यासारख्या जागरूक मोठ्या माणसासाठी, मिसेस व्हॅडेर्लन हिच्या पद्धतींमध्ये फार तोचतोचपणा आहे. शिवाय ते म्हणतात, त्याप्रमाणे, आता ती पूर्वीसारखी फार तरुण राहिली नाही. तुझे तरूण सैन्याधिकारी तसे

समजत नसतील. पण मी छपन्न वर्षांचा आहे अजून चार वर्षात मी फारसा आल्हादक रहाणार नाही. समाजाला नको ती अक्कल सतत शिकवणारा म्हातारा होईन.

कॅरिंग्टन क्षमायाचनेच्या सुरात बोलला, "मी मूर्ख होतो. पण हे थोडे वेगळे वाटते --- "

"हे तुला वेगळे वाटते ना, की काही जवळच्या लोकांच्या मेजवानीत, एका क्षणी आपण हवाई संरक्षणातील समस्यांवर काही क्रांतिकारक शोध लावत असताना, ती इथे कशी?"

सर जॉर्ज कॅरिंग्टनने मान हलवली.

उमराव मेफिल्ड हसत बोलला, "तेच तर! तेच तर प्रलोभन आहे."

"प्रलोभन?"

"असे बघ, जॉर्ज, सिनेमातील भाषा वापरण्यासाठी आपण खरी बाई वापरत नाही. आणि तरी आपल्याला काही हवे असते. भूतकाळातल्यापेक्षा, जास्त काही तिने गमावले आहे. पण ती काळजी घेणारी आहे --- वाईट रीत्या काळजी घेणारी आहे. तिची काय कारस्थाने आहेत, हे आपल्याला माहिती आहे. पण आपल्याकडे त्याचे नेमके पुरावे नाहीत. तिला काहीतरी मोठे प्रलोभन दाखवून भुलवायला हवे."

"काहीतरी मोठे म्हणजे नवीन बॉम्बरची विशेषता का?"

"बरोबर. तिला धोका घ्यायला भाग पडेल, असे मोठे काही --- आखाड्यात उतरण्यासाठी! आणि मग ती आपल्याला मिळालीच म्हणून समज."

सर जॉर्ज खालच्या आवाजात खाकरले.

ते म्हणाले, “ओहो, ठीक आहे. मी म्हणू शकतो, की हे ठीक वाटते आहे. पण समजा तिने धोका घेतला नाही, तर?”

उमराव मेफिल्ड म्हणाला, “ते दयनीय ठरेल. पण मला वाटते, तसे होणार नाही - “

तो उठला. “आपण हॉलमधील बायकांकडे जायचे का? तुझ्या बायकोला आपण ब्रिजपासून परावृत्त केले पाहिजे.”

सर जॉर्ज खालच्या आवाजात खाखरले. ”ज्युलिया ब्रिजमध्ये चांगली हुशार आहे. पण आता ती पूर्वीसारखी खेळू शकत नाही. तिच्या हातून काही चुका होतात. मी तिला तसे सांगितले. ती जन्मजात जुगारी आहे, एवढाच त्रास आहे.”

टेबलाकडे त्याच्या यजमानाजवळ येत, तो बोलला, “ठीक आहे. चार्ल्स, तुझा बेत कसा तडीस जातो, ते बघू.”

## दोन

हॉलमधील संभाषण एकापेक्षा अधिक वेळा झाले. मिसेस व्हॅडेर्लन ही जर स्त्रियांबरोबर एकटी राहिली, तर तिचा थोडा तोटा असे. तिची गोडवा असलेली भुलवणारी भावनिक पद्धत पुरुषांकडून इतकी वाखाणली जात असे, की ती त्या कारणाने किंवा एरवीही जास्त वेळ स्त्रियांपेक्षा त्यांच्याबरोबरच रहात असे. ज्युलिया ही अशी बाई होती, की तिची वागायची पद्धत कधी चांगली असे, तर कधी वाईट असे. या प्रसंगी तिला मिसेस व्हॅडेर्लन आवडली नाही आणि मिसेस मकाट्टाने तिला कंटाळा

आणला. तिने तिच्या भावना लपवून ठेवल्या नाहीत. संभाषण कंटाळवाणे झाले आणि बंदच पडायची पाळी आली. पण चालू राहिले.

मिसेस मकाट्टा हेतूबद्दल फार प्रामाणिक होती. मिसेस व्हॅंडेर्लनला तिने निरोपयोगी व परावलंबी म्हणून बाद करून टाकले. ती ठरवत असलेल्या, गरिबांसाठी पैसे गोळा करायच्या पुढील मनोरंजनाच्या कार्यक्रमात मिसेस ज्युलीयाचा रस वाढवण्याचा तिने प्रयत्न केला. ज्युलीया बाईसाहेबांनी तिकडे फारसे लक्ष दिले नाही. एकदोन जांभया दिल्या आणि तिच्या आधीच्या स्वतःच्या उद्योगाला लागली. चार्ल्स आणि जॉर्ज अजून कसे आले नाहीत? माणसे किती दमली आहेत. तिचे बोलणे अधिकच नीरस होऊ लागले. ती तिच्या विचारात व दुःखात बुडून गेली.

जेव्हा शेवटी पुरुष हॉलमध्ये आले, तेव्हा तीन बायका गप्प बसल्या होत्या.

उमराव मेफिल्डने स्वतःशी विचार केला, "ज्युलिया आज आजारी व उदास दिसते आहे. तो मोठ्याने म्हणाला, "रबर मिळायचे काय झाले?"

लगेच ज्युलीया बाईसाहेबांचा चेहरा खुलला. ब्रिज म्हणजे तिच्या आयुष्याचा श्वास होता.

त्याच वेळी रेगी कॅरिंग्टन तिथे शिरला. आणि मग ते चौघे झाले. ज्युलीया बाईसाहेब, मिसेस व्हॅंडेर्लन, सर जॉर्ज आणि तरुण रेगी हे चौघे पत्ते खेळायला बसले. मिसेस मकाट्टाचे मनोरंजन करायची जबाबदारी उमराव मेफिल्डने घेतली.

दोन रबर खेळून झाल्यावर, सर जॉर्जने कंटाळून शेकोटीच्या कट्ट्यावरील घड्याळाकडे पाहिले.

त्याने शेरा मारला, "अजून दुसरा डाव सुरु करायला नको."

त्याची बायको चिडलेली दिसली. “ अजून तर फक्त अकराला पंधरा मिनिटे आहेत. अगदीच कमी वाजले आहेत.”

सर जॉर्ज चांगल्या भावनेने बोलले, “प्रिये, पावणेअकरा म्हणजे काही कमी नाही. तसेही, मला आणि चार्ल्सला काही काम आहे.”

मिसेस व्हॅंडेर्लन पुटपुटली, “ते फार महत्वाचे दिसते आहे! मला वाटते, तुम्ही हुशार पुरुष इतके कामात असता, की तुम्हाला खरी विश्रांतीच मिळत नाही.”

सर जॉर्ज म्हणाले, “आमचा आठवडा अठ्ठेचाळीस तासांचा असतो.”

मिसेस व्हॅंडेर्लन पुटपुटली, “हो ना! मला मी कच्ची अमेरिकन असल्याची लाज वाटते. पण मला अशा लोकांना भेटायला खूप आवडते, जे त्यांच्या देशाचे भवितव्य सुरळीत करतात. सर जॉर्ज, माझी अशी अपेक्षा आहे, की हा दृष्टीकोन तुम्हाला असातसाच वाटत असेल.”

माझ्या प्रिय मिसेस व्हॅंडेर्लन, मी तुमचा विचार कच्ची किंवा खडबडीत असा कधीच करू शकत नाही.” तो तिच्या डोळयात बघून हसला. कदाचित ती चकवू देणार नाही, अशी विरोधाभासात्मक आवाजांची सूचना तिथे असेल. हुशारीने ती रेगीच्या डोळ्यात गोडपणे हसत वळली. “आपण आपली भागीदारी चालू ठेऊ शकत नाही, याबद्दल दिलगीर आहे. हा तुझा घाबरवणारा हुशारीचा डाव आहे.”

रेगी लाजून खूष झाला व गोंधळलेल्या आवाजात हळू बोलला, “जसे आले तसे थोडेसे नशीब!”

“ओहो, नाही. तुझ्या बाजूने काढलेला हा हुशारीचा तर्क होता. पत्ते कुठे असयला पाहिजेत, याचा योग्य विचार करून, तू खेळलास. मला ते खूप बुद्धिमत्तेचे वाटले.”

ज्युलिया बाईसाहेब एकदम उठल्या. “ती बाई गोड बोलून सगळ्याना भुलवते.” तिने नकोसा वाईट विचार केला. मग तिच्या मुलाकडे तिचे डोळे वळल्यावर, ते मवाळ झाले. त्याने या सर्वावर विश्वास ठेवला. तो किती दयनीय रीतीने तरुण आणि आनंदी दिसत होता. तो किती विचित्रपणे अननुभवी आणि भोळा होता! तो फसवला गेला, यात काही नवल नाही. तो अती विश्वास ठेवणारा होता. खरे तर तो स्वभावाने फार गोड होता. जॉर्जला तो जराही कळू शकला नाही. पुरुषमाणसे त्यांच्या अंदाजात किती असंवेदनशील असतात! ते देखील कधीकाळी तरुण होते, हे ते विसरतात. जॉर्ज रेगीबरोबर फार कडकपणे वागायचा.

मिसेस मकाट्टा उठली. शुभरात्र म्हटले गेले.

तीन बायका खोलीबाहेर गेल्या. उमराव मेफिल्डने सर जॉर्जला दिल्यावर, स्वतःसाठी पेय घेतले. नंतर दरवाजातील मिस्टर कार्लीलेकडे त्याने पाहिले.

“कार्लीले, सगळ्या फाईल्स व कागद बाहेर काढशील का? ब्ल्यू प्रिंट्स आणि नकाशेही काढ. लवकरच, एअरमार्शल व मी ते बघू. आम्ही आधी बाहेर एक चक्कर मारून येतो, नाही का जॉर्ज? पाऊस थांबला आहे.”

मिस्टर कार्लीले जाण्यासाठी वळले. ते मिसेस व्हॅडेर्लनवर जवळजवळ आपटल्यामुळे, त्यांनी माफी मागितली.

ती त्यांच्याकडे वळत पुटपुटली, “मी जेवणापूर्वी वाचत असलेले पुस्तक कुठे गेले?”

रेगीने हातात पुस्तक धरून उडी मारली. “हे ते आहे का? ते सोफ्यावर पडले होते का?”

“ओहो, हो. मी आभारी आहे.” ती गोड हसली. परत शुभरात्र म्हणाली आणि खोलीबाहेर पडली.

सर जॉर्जने एक फ्रेन्च खिडकी उघडली. तो म्हणाला, “काय सुंदर रात्र आहे! रेगी म्हणाला, “आता थोडे फिरायची तुमची कल्पना चांगली आहे.”

“ठीक आहे शुभरात्र, सर. मी झोपायला चाललो.”

उमराव मेफिल्ड म्हणाले, “प्रिय मुला, शुभ रात्र”

आदल्या दिवशी रात्री अर्धवट सोडलेली रहस्यकथा रेगीने परत वाचण्यासाठी उचलली आणि खोलीबाहेर पडला.

उमराव मेफिल्ड आणि सर जॉर्ज गच्चीत गेले. चांदण्या चमचमणारी, ती सुंदर रात्र होती. सर जॉर्जने एक खोल श्वास घेतला. काय हे, या बायका फार सेंट वापरतात.

उमराव मेफिल्ड हसले.

“तसेही हे काही स्वस्तातले सेंट नाही. बाजारातील एक चांगले महागाईचे सेंट आहे.”

सर जॉर्जने मोठे हास्य केले.

“मला वाटते, त्याबद्दल आभार मानले पाहिजेत.”

“खरेच, आभार मानले पाहिजेत. मला वाटते स्वस्त सेंट चोपडलेली बाई म्हणजे मनुष्यजातीसाठी उबग आणणारी गोष्ट आहे.”

सर जॉर्जने वर आभाळाकडे नजर टाकली. “हे असामान्य रीत्या निरभ्र दिसते आहे. आपण जेवतांना मला पावसाचा आवाज येत होता.”

ती दोन माणसे सावकाशीने गच्चीवर फिरत होती. पूर्ण घराच्या लांबीइतकी गच्ची होती. त्याखालील जमीन दूरवर उतरत जात होती. तिथून ससेक्सच्या जंगलाचे छान दृष्य दिसत होते.

सर जॉर्जने एक सिगरेट शिलगावली. त्याने सुरवात केली, “या धातूच्या एकत्रितपणाबद्दल --- “

बोलणे तांत्रिक होत चालले. जसे ते गच्चीच्या टोकाकडे पाचव्यांदा आले, तसे उमराव मेफिल्ड सुस्कारा टाकत बोलला, “ओहो, ठीक आहे. मला वाटते, आपण खाली जाऊन कामाला लागावे. हो, थोडे काम उरकलेले चांगले.”

दोन माणसे वळली. उमराव मेफिल्डने आश्चर्योद्गार काढला. “अरे, ते बघितलेस का?”

सर जॉर्ज म्हणाले, “काय?”

“मला वाटते, माझ्या अभ्यासिकेच्या खिडकीतून कोणीतरी हळूच गच्चीवर आले.”

“काहीतरीच काय! अरे म्हाताऱ्या, मी कुणाला पाहिले नाही.”

“पण मी पाहिले --- निदान, मला असे वाटले, की मी पाहिले.”

“तुझे डोळे तुला फसवत आहेत. मी गच्चीवरून सरळ खाली बघत होतो आणि बघण्यासारखे काही असते, तर मी नक्की बघितले असते. जरी

मी वर्तमानपत्र हातभर अंतरावर धरत असलो, तरी मी महत्वाचे काही बघत नाही, असे फार थोडेच असते.”

उमराव मेफिल्ड गालातल्या गालात हसला. “जॉर्ज, मी तो चष्मा तुझ्या डोळ्यांवर ठेऊ शकतो. मला चष्म्याशिवाय सहज वाचता येते.”

“पण घराच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या माणसाला तू नेहमी ओळखतोसच असे नाही. की तुझा चष्मा तुला फसवतो?”

हसत दोघेजण मेफिल्डच्या अभ्यासिकेत आले. त्याची फ्रेंच खिडकी उघडी होती.

मिस्टर कार्लीले तिजोरीशी उभे राहून काही कागद फाइलला लावत होते. ते आत शिरल्यावर त्याने दोघांकडे वर पाहिले.

“काय चार्ली, सर्व काही तयार आहे?”

“हो, उमराव मेफिल्ड, सर्व कागद तुमच्या टेबलावर आहेत.

खिडकीजवळील कोपऱ्यात, ते एक मोठे महत्वाचे दिसणारे महोगनी लाकडाचे टेबल होते. उमराव मेफिल्ड तिथे गेला आणि कागद वरखाली करून वेगवेगळे करू लागला.

सर जॉर्ज म्हणाले, “छान रात्र आहे.”

मिस्टर कार्लीलेंनी कबूल केले. “हो, खरेच. पावसानंतर इतके मस्त उघडले आहे, हे विशेष आहे.

फाइल बाजूला ठेवत, मिस्टर कार्लीलेंनी विचारले, “उमराव मेफिल्ड, तुम्हाला माझ्याकडून अजून काही मदत हवी आहे का?”

“नाही. मला असे वाटत नाही. मी हे सर्व आवरून ठेवेन. आम्हाला बहुतेक उशीर होईल. तू गेलास तरी चालेल.”

“आभारी आहे, शुभ रात्र, उमराव मेफिल्ड. शुभ रात्र, सर जॉर्ज.”

“शुभ रात्र, कार्लीले.”

सचिव खोली सोडणार इतक्यात, उमराव मेफिल्ड कडकपणे बोलले, “एक मिनिट, कार्लीले, तू सर्वात महत्वाचा कागद विसरला आहेस.”

“उमराव मेफिल्ड, काय म्हणालात?

“बॉम्बरचे खरेखुरे बेत असलेले कागद.”

सचिवाने शोधायला सुरवात केली. “ते काय सर्वात वर आहेत, सर.”

“ते नाहीत.”

“पण मी आताच तर ते तिथे ठेवले.”

“तूच बघ.”

घाबरलेल्या चेहऱ्याने तरुण मनुष्य पुढे आला आणि मेफिल्ड्च्या टेबलाशी येऊन कागद तपासू लागला.

मंत्र्याने काहीसे अधीरपणे कागदांची चळत पाहिली. कार्लीलेने ती बघितली. त्याचे घाबरट हावभाव वाढले.

“हे बघ, ते तिथे नाही आहेत.”

सचिव चाचरत बोलू लागला. “पण --- पण हे अविश्वसनीय आहे. मी ते तिथे तीन मिनिटांपूर्वीच तर ठेवले.

उमराव मेफिल्ड आनंदाने विनोद करत म्हणाले, “तुझी काहीतरी चूक झाली असेल. ते अजून तिजोरीत असतील.”

“असे कसे होईल? --- मला माहिती आहे, मी ते तिथे ठेवले होते.”

उमराव मेफिल्ड उघड्या तिजोरीजवळ जाऊन बघू लागले. सर जॉर्ज तिथे आले. काही मिनिटात, हे उघड झाले की बॉम्बरचे महत्वाचे कागद तिथे नव्हते.

विश्वास न बसून, धक्का बसल्यासारखे, ते तिघेजण परत टेबलाशी गेले आणि कागद वरखाली करू लागले.मेफिल्ड म्हणाले, “अरे देवा, ते गेले!

मिस्टर कार्लीले ओरडले, “पण हे अशक्य आहे.”

मंत्र्याने फटकारले, “या खोलीत कोण आले होते?

“कोणी नाही. कोणीच नाही.”

“हे बघ, कार्लीले, ते कागद हवेत तर काही नाहीसे झाले आहीत. कोणीतरी ते घेतले, एवढे नक्की. मिसेस व्हॅडेर्लन इथे आल्या होत्या का?”

“मिसेस व्हॅडेर्लन? नाही, सर.”

कॅरिंग्टन नाकाने वास घेत बोलले, “मी मागोवा घेतो. तिने ते सेंट वापरले असेल, तर त्याचा लगेच वास येईल.”

कार्लीले जोर देऊन सांगत राहिला, “कोणीही इथे आले नव्हते. मला काहीच समजत नाही.”

उमराव मेफिल्ड म्हणाले, “असे बघ, नीट आठव. आपल्याला याच्या मुळाशी जायला हवे. ते कागद तिजोरीत होते, याबद्दल तुझी खात्री आहे?”

“अगदी बालंबाल खात्री आहे.”

“तू ते प्रत्यक्ष बघितलेस का? ते इतर सर्व कागदांमध्ये आहेत, असे तू गृहीत धरत नाही आहेस ना?”

“नाही. नाही. उमराव मेफिल्ड, मी ते पाहिले. सर्व कागदांच्या वर ते ठेवले.”

आणि तू म्हणतोस त्याप्रमाणे, कोणीही खोलीत आले नाही. तू खोलीबाहेर गेला होतास का?”

“नाही --- हो एकदा गेलो होतो.”

सर जॉर्ज ओरडले, “हं, आता तू बरोबर बोललास.”

उमराव मेफिल्ड कडकपणे बोलले, “काय हे?”

तेव्हाच चार्ली म्हणाला, “उमराव मेफिल्ड, सर्वसाधारणपणे, महत्वाचे कागद इथे असतांना, मला खोली सोडाविशी वाटली, कारण अर्थात मी एका स्त्रीची किंकाळी ऐकली”

उमराव मेफिल्ड नवल वाटून बोलले, “स्त्रीची किंकाळी?”

“हो, उमराव मेफिल्ड. ती ऐकून मी चक्रावून गेलो. मी ती ऐकली, तेव्हा मी नुकतेच कागद टेबलावर ठेवत होतो. आपोआप मी हॉलबाहेर धावलो.”

“कोण किंचाळले?”

“मिसेस व्हॅडेर्लनची फ्रेंच नोकराणी. ती अर्धवट जिना चढून उभी होती. पांढरीफटक पडली होती. उदास होऊन थरथर कापत होती. ती म्हणाली, की तिने भूत पाहिले.”

“भूत पाहिले?”

“पूर्ण पांढरे कपडे केलेली एक उंच बाई, अजिबात आवाज न करता हवेत तरंगत होती.”

“काय विचित्र गोष्ट आहे!”

“हो, उमराव मेफिल्ड. मी तिला तेच म्हणालो. मला सांगितले पाहिजे, की तिला स्वतःची शरम वाटली. ती जिन्यातून वर गेली आणि मी परत इथे आलो.”

“हे किती वेळापूर्वी झाले?”

“तुम्ही आणि सर जॉर्ज येण्यापूर्वी, एकदोन मिनिटे.”

“आणि तू किती वेळ खोलीबाहेर होतास?”

सचिवाने विचार केला. “दोन किंवा फार तर तीन मिनिटे.”

उमराव मेफिल्ड गुरगुरले, “म्हणजे बराच वेळ. त्याने अचानक त्याच्या मित्राचा दंड धरला. “जॉर्ज, मी पाहिलेली ती सावली --- न कळता, ती हळूच खिडकीपासून दूर गेली. एवढेच! जेव्हा कार्लीलेने खोली सोडली, तेव्हा लगेच ती सावली आत आली. कागद हिसकावून घेतले आणि पळाली.”

सर जॉर्ज बोलले, “खराब काम.”

मग त्याने मित्राचा हात धरला. “इकडे बघ चार्ल्स, हे काहीतरी भलतेच झाले. यासंबंधी आपण काय करणार आहोत?”

## तीन

चार्ल्स, काही झाले, तरी, नीट आठवण्याचा प्रयत्न कर.”

नंतर अर्ध्या तासाने, दोन माणसे उमराव मेफिल्डच्या अभ्यासिकेत होती आणि सर जॉर्ज त्याच्या मित्राचे मन वळवण्याचा, त्याला एका विशिष्ट पद्धतीने वागण्याचा सल्ला देण्याचा खूप प्रयत्न करत होता.

पहिल्यांदा उमराव मेफिल्ड तयार नव्हता. पण हळूहळू त्या कल्पनेला त्याचा विरोध मावळू लागला.

सर जॉर्ज बोलत होता, "चार्ल्स, इतका टोकाचा हट्टीपणा करू नकोस."

उमराव मेफिल्ड सावकाश बोलला, "आपल्याला माहिती नसलेल्या फार वाईट माणसाला यात का ओढायचे?"

"पण मला त्याच्याबद्दल बरेच माहिती आहे. तो मनुष्य म्हणजे चमत्कार आहे."

"काहीही!"

"हे बघ चार्ल्स, हे करून तर बघू. चांगला अंदाज बांधणे, हा या व्यवसायाचा गाभा आहे. जर कागद हरवल्याची गोष्ट बाहेर फुटली --- "

"जर फुटली तर, म्हणजे तुला काय म्हणायचे आहे?"

"तर हा मनुष्य हर्क्युल पायरो असेल, असे नाही --- "

"मला वाटते, एखादा जादुगार त्याच्या टोपीतून ससे काढतो, तसे तो इथे येऊन, आपले हरवलेले कागद सादर करेल, असे नाही, नाही का?"

"तो सत्य शोधून काढेल. आणि आपल्याला तेच हवे आहे. इकडे बघ चार्ल्स, मी सगळी जबाबदारी घेतो.

उमराव मेफिल्ड सावकाश बोलला, "ओहो, ठीक आहे. तुला पाहिजे तसे कर. पण मला नाही वाटत, की तो काही करू शकेल --- "

सर जॉर्जने फोन उचलला. "मी आता त्याच्यापर्यंत पोचणार आहे."

"अजून तो अंथरुणात असेल."

‘तसे असेल, तर तो उठेल. चार्ल्स, हे सगळे जाऊ दे. पण तू त्या बाईला तसेच सोडून देणार नाही आहेस.”

“तुला मिसेस व्हॅंडेर्लेन म्हणायचे आहे का?”

“हो. तुला तिचा संशय आहे. ती या सर्वाच्या मुळाशी आहे, असे तुला वाटत नाही का?”

“नाही वाटत. तिने शिक्षा म्हणून माझ्यावर डाव उलटवला आहे. जॉर्ज, मला हे कबूल करायला आवडत नाही, की एका बाईने आपल्याशी वरचढपणा करावा. ही काही सर्वसाधारण गोष्ट नाही. पण ती खरी आहे. आपल्याला तिच्याविरुद्ध काही सिद्ध करता येणार नाही. तरी आपल्याला माहिती आहे, की यामागील सूत्रधार तीच आहे.”

कॅरिंग्टन भावविवशतेने बोलला, “स्त्रिया भयंकर असतात.”

“यात तिचा काही संबंध नाही. ते जाऊ दे. आपण असे समजू, की तिने त्या नोकराणीला आरडाओरडा करायला लावायची युक्ती केली आणि बाहेर फिरणारा माणूस तिचा कटातील भागीदार होता. पण ते आपण सिद्ध करू शकत नाही. इथेच आपले घोडे पेंड खाते आहे.

“कदाचित हर्क्युल पायरो ते करू शकेल.”

अचानक उमराव मेफिल्ड हसला.

“जॉर्ज, अरे देवा, मला वाटले, तू पक्का इंग्लिश माणूस आहेस. पायरो कितीही हुशार असला तरी फ्रेंच माणूस आहे.”

लज्जित तोंडाने सर जॉर्ज म्हणाले. “तो फ्रेंचमनदेखील नाही आहे. तो बेल्जियन आहे.”

"ठीक आहे. तुझ्या त्या बेल्जियनला कटाप कर. त्याला त्याचा शहाणपणा त्याच्या व्यवसायात इतर ठिकाणी दाखवू दे. मी पैज लावायला तयार आहे, की तो आपल्यापेक्षा जास्त काही शोधू शकणार नाही."

काही न बोलता सर जॉर्जने फोनजवळ हात नेला.

## चार

डोळे मिचकावत, हर्क्युल पायरोने त्याचे डोके एका माणसाकडून दुसऱ्याकडे वळवले. फार प्रयासाने आणि नाजूकपणे त्यांने येणारी जांभई दाबली. मध्यरात्रीचे अडीच वाजले होते. तो झोपेतून उठला होता अंधारात खाली मोठ्या रोल्स रॉइस गाडीत धावत सुटला होता. दोन माणसांना त्याला जे काही सांगायचे होते, ते सांगून झाले. उमराव मेफिल्ड म्हणाला, "मिस्टर पायरो, असे असे घडले."

तो खुर्चीत हळूहळू मागे झाला आणि त्याचा एका डोळ्याचा चष्मा लावला. त्यामधून फिकट पिवळ्या गर्विष्ठ डोळ्याने, पायरोने लक्ष देऊन पाहिले. गर्विष्ठ असण्याशिवाय तो डोळा नक्कीच शंका घेत होता. पायरोने सर कॅरिंग्टनकडे एक झटपट कटाक्ष टाकला. तो मनुष्य पुढे वाकून, एखाद्या मुलासारखी आशा त्याच्या चेहऱ्यावर दाखवत होता.

पायरो सावकाश म्हणाला, "हो. कायकाय घडले, ते मला समजले. नोकराणी किंचाळली, सचिव बाहेर गेला. कोणी अनाहूत मनुष्य आत आला आणि महत्वाचे कागद टेबलावरील गठ्ठ्यात सर्वात वर होते, ते हिसकावून घेऊन गेला. हे सर्व अगदी सोयीस्कर होते."

वाटेतील कोणीतरी उच्चारलेल्या काही शेवटच्या शब्दांनी उमराव मेफिल्डचे लक्ष वेधले गेले. तो अधिक ताठ बसला त्याच्या एका डोळ्याचा चष्मा पडला. त्यामुळे बहुधा त्याच्यात एक नवीन सावधपणा आला.

"मिस्टर पायरो, तुम्ही काही म्हणालात का?"

"उमराव मेफिल्ड, मी म्हणालो, की घडलेल्या सर्व गोष्टी चोरासाठी सोयीस्कर होत्या --- तसेही तुमची खात्री आहे का, की तुम्हाला दिसलेला माणूसच चोर होता?"

उमराव मेफिल्डने डोके हलवले. "ते मी सांगू शकणार नाही. ती नुसती --- एक सावली होती. मी कोणाला पाहिले तरी की नाही, याबद्दल माझी खात्री नाही."

पायरोने त्याची दृष्टी एअरमार्शलकडे वळवली.

"आणि तुम्ही, सर जॉर्ज, ती बाई होती की पुरुष होता, हे तुम्ही सांगू शकाल का?"

"मी कोणालाच पाहिले नाही."

पायरोने विचारपूर्वक डोके हलवले. नंतर तो अचानक उठून उभा राहिला व लिहायच्या टेबलाकडे गेला.

उमराव मेफिल्ड म्हणाला, "मी तुम्हाला खात्री देतो की ते महत्वाचे कागद तिथे नव्हते. आम्ही तिघांनी ते कागद निदान सहा वेळा तरी पाहिले होते."

"तिघांनीही? म्हणजे तुमच्या सचिवानेही?

"हो, कार्लीलेनेही."

पायरो अचानक वळला.

“उमराव मेफिल्ड, मला हे सांगा, की तुम्ही टेबलाशी गेलात तेव्हा सर्वात वर कुठले कागद होते?

आठवतांना, उमराव मेफिल्ड थोडासा हसला.

“मी आठवून बघतो --- हो हवाई संरक्षणाच्या स्थितीची काही जुजबी माहिती लिहीलेले ते कागद होते.”

कसबीपणे पायरोने हलकेच एक कागद काढून आणला.

“उमराव मेफिल्ड, हाच तो आहे का?”

उमराव मेफिल्डने तो घेऊन त्यावर नजर फिरवली.

“हो तोच तो आहे.”

पायरोने तो कॅरिंग्टनला दिला.

तुम्हाला हा कागद टेबलावर असल्याचे समजले होते का?”

सर जॉर्जने तो घेतला व मग त्याचा चष्मा घातला. “हो, तोच आहे. कार्लीले व मेफिल्डबरोबर मी तो पाहिला होता. तो सर्वात वर होता.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली. त्याने तो परत टेबलावर ठेऊन दिला. मेफिल्डने त्याकडे थोडे कोड्यात पडल्यासारखे पाहिले.

तो बोलला, “अजून काही प्रश्न?”

“हो. नक्कीच एक प्रश्न आहे. कार्लीले. कार्लीलेचाच प्रश्न आहे!”

उमराव मेफिल्डचा रंग चढला.

“मिस्टर पायरो, कार्लीलेवर काही संशय नाही! तो गेली नऊ वर्षे माझा खासगी सचिव आहे. त्याला माझे सर्व खासगी कागद बघायची परवानगी आहे आणि मी तुम्हाला सांगू इच्छितो, की त्याने त्या

कागदावरील मजकुराची व नकाशांची प्रत कोणाहीपेक्षा चांगली काढली असती.”

पायरो म्हणाला, “मी तुमच्या मुद्द्याची स्तुती करतो. म्हणजे तो अपराधी असेल, तर त्याला अशी विचित्रपणे चोरी करायची काही गरज नव्हती.”

उमराव मेफिल्ड म्हणाला, “काही झाले तरी मला कार्लीलेबद्दल खात्री आहे. मी त्याची खात्री देतो.”

कॅरिंग्टन कडकपणे म्हणाला, “कार्लीले ठीक आहे.”

पायरोने त्याचे हात डौलदारपणे पसरले.

“आणि ती मिसेस व्हॅंडेर्लन? ती चुकीचे वागली असेल का?”

सर जॉर्ज बोलले, “ती चुकीचे वागणारी व अप्रामाणिक आहे.”

उमराव मेफिल्ड अधिक खात्रीपूर्वक म्हणाला, “मिस्टर पायरो. मला वाटते, की मिसेस व्हॅंडेर्लनच्या कारवायांचा काही संशय नाही --- ठीक आहे --- परदेशी कार्यालय तुम्हाला याविषयी अधिक माहिती देऊ शकेल.”

“आणि नोकराणी, तिचे काय? ती तिच्या मालकिणीबरोबर आहे का?”

सर जॉर्ज बोलले, “त्याबद्दल काही संशय नाही.

उमराव मेफिल्ड अधिक काळजीपूर्वक बोलले, “मला हे शक्य असे गृहीतक वाटते.”

तिथे शांतता पसरली. पायरोने सुस्कारा टाकला. आणि विमनस्कपणे टेबलावरील एकदोन वस्तू उजव्या हाताने हलवल्या. तो

म्हणाला, "मी असे समजतो, की हे कागद म्हणजे पैसे होते. हे चोरलेले कागद म्हणजे नोटांच्या स्वरूपातील मोठी रक्कम होती."

"जर वेगळ्या प्रकारे पाहिले, तर हो."

"जसे की?"

सर जॉर्जनी दोन युरोपियन शक्तींची नावे घेतली.

पायरोने मान हलवली.

"मी असे धरून चालतो, की गोष्ट *कुणालाही* माहिती असेल, नाही का?"

"मिसेस व्हॅडेर्लनला हे माहिती असेलच."

"मी *कुणालाही* असे म्हणालो, नाही का?"

"मला वाटते, हो."

"कुणीही --- अगदी कमीत कमी बुद्धी असलेल्यालाही त्या कागदांची पैशांमधील किंमत भारी वाटली असती, नाही का?"

"हो. पण मिस्टर पायरो --- उमराव मेफिल्ड थोडे अस्वस्थ दिसत होते.

पायरोने त्यांचा हात धरला.

"मी असे करतो, सर्व शक्यता आजमावतो."

तो उठला आणि हलकेच खिडकीतून बाहेर पडला. गच्चीतील लांबच्या बाजूकडील गवताची कडा उजेड टाकून तपासली.

दोन माणसे त्याच्याकडे बघत होती. तो परत आत आला, बसला व बोलला, "मला सांगा, उमराव मेफिल्ड, या सावलीसारख्या माणसाचा तुम्ही पाठलाग केला नाही का?"

उमराव मेफिल्डने त्याचे खांदे उडवले.

“खालील बागेतून तो मुख्य रस्त्याला लागू शकत होता. जर तिथे गाडी त्याची वाट बघत उभी असेल, तर तो क्षणार्धात सटकला असेल.”

“पण तिथे पोलीस असतात --- किंवा स्काउट्सपैकी कोणी --- “

सर जॉर्ज मध्येच बोलला, “मिस्टर पायरो, तुम्ही विसरत आहात की *आपण याचा बोलबाला होण्याचा धोका घेऊ शकत नाही*. हे कागद चोरले गेल्याचे जर बाहेर फुटले, तर याचे परिणाम पक्षाच्या दृष्टीने चांगले ठरणार नाहीत.”

पायरो म्हणाला, “हो, बरोबर आहे. राजनीती लक्षात घ्यायलाच हवी. मोठी गुप्तता राखायला हवी. त्यापेक्षा तुम्ही मला पाठवा. ते सोपे पडेल.”

अविश्वसनीय रीत्या क्षुल्लक वाटेल अशा पद्धतीने उमराव मेफिल्डने विचारले, “तुम्हाला यश मिळायची खात्री आहे का?”

त्या छोट्या माणसाने खांदे उडवले.

“का नाही? पण त्यासाठी विचार करणे व त्यानुसार कृती करणे गरजेचे आहे.”

क्षणभर थांबून तो बोलला, “मला मिस्टर कार्लीलेशी बोलायला आवडेल.”

उमराव मेफिल्ड उठला, “नक्कीच. मी त्याला सांगतो. तो जवळपासच कुठेतरी असेल.”

तो खोलीबाहेर गेला.

पायरोने सर जॉर्जकडे पाहिले. तो म्हणाला, "अरे मित्रा, या गच्चीतल्या माणसाचे काय?"

माझ्या प्रिय मिस्टर पायरो, मला विचारू नका. मी त्याला पाहिले नाही. मी त्याचे वर्णन करू शकणार नाही."

पायरो पुढे वाकला. "ते तर तुम्ही आधीच सांगितले आहे. पण हे त्यापेक्षा थोडे वेगळे आहे, नाही का?"

सर जॉर्ज अचानक बोलले, "तुम्हाला काय म्हणायचे आहे?"

"मी ते कसे सांगू? तुमचा अविश्वास, तो जास्त अंतर्दृष्टी असलेला आहे."

सर जॉर्जने बोलायला सुरवात केली पण मग थांबला.

पायरो प्रोत्साहन देत म्हणाला, "पण हो, मला सांगा, तुम्ही दोघेही गच्चीच्या टोकाला होतात. उमराव मेफिल्डने खिडकीतून गवत ओलांडून जाणारी सावली पाहिली. तुम्ही कशी पाहिली नाही?"

कॅरिंग्टनने त्याच्याकडे रोखून बघितले.

"मिस्टर पायरो, मला वाटलेच की तुम्ही मला हे विचारणार. मी केव्हापासून त्याबद्दलच विचार करतो आहे. असे बघा, मी शपथेवर सांगतो, की कोणीही खिडकीतून निसटून गेले नाही. मला वाटले मेफिल्डला तसा भास झाला --- झाडाची फांदी हलत होती --- असेच काहीतरी. आणि मग आम्ही जेव्हा इथे आलो, तेव्हा आम्हाला चोरी झाल्याचे कळले. असे असावे की मेफिल्ड बरोबर होता आणि माझे चुकत होते. आणि तरीही --- "

पायरो हसला.

“आणि तरी तुम्हाला अजूनही अंतर्मनात वाटते, की तुमच्या डोळ्यांना दिसलेला [नकारात्मक] पुरावा विश्वसनीय आहे?”

“हो, मला वाटते. मिस्टर पायरो, तुमचे बरोबर आहे.”

पायरो अचानक हसला.

“तुम्ही किती शहाणे आहात!”

सर जॉर्ज कडकपणे बोलले, “गवताच्या कडेला पाऊलांचे ठसे नव्हते?”

पायरोने मान हलवली. “तेच तर! उमराव मेफिल्डला वाटले की त्याने सावली पाहिली. मग चोरी झाली आणि त्याची खात्री आहे --- पूर्ण खात्री आहे. ती काही कल्पना नव्हती --- त्याने खरेच तो माणूस पाहिला. पण ते तसे नव्हते. मी पाऊलांचे ठसे व अशा गोष्टींकडे फारसे लक्ष देत नाही. पण आपल्याकडे नकारात्मक पुरावा आहे. *गवतावर पाऊलांचे ठसे नव्हते*. कारण आज संध्याकाळी मोठा पाऊस झाला. जर मनुष्य आज संध्याकाळी गच्चीपासून गवतापर्यंत गेला असता, तर पाऊलांचे ठसे दिसले असते.”

सर जॉर्ज निरखून बघत बोलले, “पण मग --- पण मग --- “

हे आपल्याला परत घराकडे आणते. घरातील माणसांकडे आणते.”

दार उघडले, तसा तो बोलायचा थांबला. उमराव मेफिल्ड मिस्टर कार्लीलेबरोबर आत शिरला. अजूनही अशक्त आणि दुःखी दिसणारा कार्लीले आता काहीसा शांत झाला होता. त्याचा एका डोळ्याचा चष्मा सावरत, तो बसून पायरोकडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागला.

“तू किंकाळी ऐकलीस, त्यापूर्वी किती वेळ तू खोलीत होतास?

कार्लीलेने विचार केला, “पाच दहा मिनिटे असेन.”

“आणि त्यापूर्वी तिथे काही गडबड नव्हती?”

“नाही.”

“मला वाटते, घरातील एका खोलीत संध्याकाळी बराच वेळ मेजवानी चालली होती.”

“हो. हॉलमध्ये.”

पायरोने त्याच्या वहीत पाहिले.

“सर जॉर्ज कॅरिंग्टन व त्यांची बायको. मिसेस मकाट्टा. मिसेस व्हॅंडेर्लन. मिस्टर रेगी कॅरिंग्टन. उमराव मेफिल्ड आणि तुम्ही, बरोबर?

“मी हॉलमध्ये नव्हतो. संध्याकाळचा बराचसा वेळ मी इथे काम करत होतो.”

पायरो उमराव मेफिल्डकडे वळला.

“पहिल्यांदा झोपायला कोण गेले?”

“ज्युलिया कॅरिंग्टन बाईसाहेब. खरे तर तीन बायका बरोबर गेल्या.”

“आणि मग?”

मिस्टर कार्लीले आत आले आणि मी त्याला सांगितले की मी आणि सर जॉर्ज येतो आहोत, तोपर्यंत कागदपत्रे काढून ठेव.”

त्यानंतर तुम्ही गच्चीवर फिरायचे ठरवलेत?

‘हो.”

“तुमच्या अभ्यासिकेतील कामाबद्दल मिसेस व्हॅंडेर्लनकडून तुम्ही काही ऐकलेत का?”

“हो तसा काहीसा उल्लेख झाला होता.”

"पण तुम्ही कार्लीलेला कागदपत्रे काढून ठेवायला सांगितलीत, तेव्हा ती त्या खोलीत नव्हती?"

"नव्हती."

कार्लीले बोलला, "उमराव मेफिल्ड, मला माफ करा. तुम्ही मला ते सांगितल्यावर, माझी तिच्याशी दारात टक्कर झाली. ती एक पुस्तक न्यायला आली होती."

"म्हणजे तुला म्हणायचे आहे, की तिने तुमचे बोलणे ऐकले असावे?"

"हो. ते शक्य आहे."

पायरो विचारात पडला. "ती एक पुस्तक न्यायला आली होती? उमराव मेफिल्ड, तुम्हाला तिचे पुस्तक सापडले का?"

"हो. रेगीने ते तिला दिले."

"हो. ते तुम्ही ज्याला जुने, श्वास रोधायला लावणारे किंवा रहस्यमय म्हणतात तसे होते. पुस्तकासाठी परत येणे --- नेहमीच उपयुक्त असते."

"तुम्हाला ते मुद्दाम केलेले वाटते का?"

पायरोने खांदे उडवले.

"आणि त्यानंतर तुम्ही दोघे गच्चीवर गेलात. आणि मिसेस व्हॅंडेर्लन?"

ती पुस्तक घेऊन निघून गेली."

"आणि तरुण रेगी? तो झोपायला गेला का?"

"हो."

“आणि मिस्टर कार्लीले किंकाळी ऐकल्यानंतर पाच ते दहा मिनिटांनी इथे आले. मिस्टर कार्लीले, तुमचे सांगणे चालू ठेवा. तुम्ही किंकाळी ऐकली. मग तुम्ही हॉलमध्ये गेलात. जर तुम्ही तुमची हालचाल परत करून दाखवलीत, तर कदाचित हे जास्त साधे असू शकेल.”

मिस्टर कार्लीले थोडे संकोचत उठले.

पायरो मदत करायच्या इराद्याने म्हणाला, “मी किंचाळतो. तो तोंड उघडून मोठ्याने किंचाळला. उमराव मेफिल्डने त्याचे हसू दिसू नये, म्हणून डोके वळवले. मिस्टर कार्लीले खूपच अस्वस्थ दिसत होते.

पायरो ओरडला, “*हं, चला पुढे व्हा*. ही तुमच्यासाठी दिलेली सूचना आहे.”

मिस्टर कार्लीले ओढल्यासारखे दाराशी गेले. दार उघडले आणि बाहेर गेले. पायरो त्याच्या मागोमाग गेला. इतर दोघेजणही मागे आले.

“दार उघडल्यावर तू ते परत लावलेस का?”

“मला खरे तर आठवत नाही. मला वाटते, मी ते उघडेच ठेवले असणार.”

“ठीक आहे. पुढे चल.”

अजूनही मोठ्या कृत्रिम रीतीने मिस्टर कार्लीले जिन्याच्या तळाशी गेले आणि तिथे उभे राहून वर बघू लागले.

पायरो बोलला, “तू म्हणालास त्याप्रमाणे, नोकराणी जिन्यावर होती. साधारण कुठेशी?”

“अर्धा जिना चढलेली.”

“आणि ती घाबरलेली व उदास दिसत होती?”

"नक्कीच."

"अरे मित्रा, मी नोकराणी आहे. पायरो भरभर जिन्यावर चढला. "साधारण इथे का?"

"अजून एकदोन पायऱ्या वर."

"इथे का?"

पायरोने दृष्टीकोन सुचवला.

"ठीक आहे --- पण तरी तसे नाही."

"मग कसे?"

"तिचे हात तिच्या डोक्यावर होते."

"ओहो, हात डोक्यावर! हे फार रुचीपूर्ण आहे. असे का?" पायरोने त्याचे हात उचलून डोक्यावर, कानांच्या वर ठेवले.

"बरोबर. असेच!"

"आहा, मला सांग, मिस्टर कार्लीले, ती सुंदर होती का? --- हो?"

"मला काही जाणवले नाही."

कार्लीलेचा आवाज दाबल्यासारखा येत होता.

"काय, तुला काही जाणवले नाही? पण तू तर तरुण मनुष्य आहेस. एखाद्या तरुण माणसाला मुलीचे सौदर्य जाणवणार नाही का?"

"मिस्टर पायरो, खरेच मी परत सांगतो, *मला* असे काही वाटले नाही.

कार्लीलेने त्याच्या मालकाकडे एक रागीट कटाक्ष टाकला. सर जॉर्ज कॅरिंग्टन गालातल्या गालात हसला. त्याने शेरा मारला, "मिस्टर पायरो तुला गे कुत्रा ठरवायच्या मागे दिसत आहेत, कार्लीले."

जिना उतरतांना पायरो म्हणाला, "जेव्हा मुलगी सुंदर असते, तेव्हा मला ते लगेच जाणवते."

मिस्टर कार्लीलेने या शेऱ्याला काहीसे शांतपणे टोकेरी उत्तर दिले.

पायरोने सुरु ठेवले, "आणि तिने जेव्हा भुताची गोष्ट सांगितली, तेव्हा मग?"

"हो."

"तुझा त्या गोष्टीवर विश्वास बसला का?"

"मिस्टर पायरो, जवळजवळ नाहीच."

"मला असे विचारायचे नाही, की तुझा भुतांवर विश्वास आहे का? ती मुलगी भूत पाहिले असे म्हणते आहे, यावर तुझा विश्वास बसला का?"

"ओहो, त्याच्याबद्दल मी काही बोलू शकत नाही. ती जोरजोरात श्वास घेत होती आणि उदास दिसत होती."

"तू तिच्या मालकिणीला पाहीलेस किंवा ऐकले नाहीस का?"

"खरे तर मी पाहिले. ती तिच्या खोलीतून बाहेर गॅलरीत आली व हाक मारली, 'लिओनी'"

"आणि मग?"

"मुलगी तिच्याकडे धावली. आणि मी परत अभ्यासिकेत गेलो."

"तू इथे जिन्याच्या तळाशी उभा होतास, तेव्हा कुणी तू उघड्या टाकलेल्या दारातून, अभ्यासिकेत शिरले का?"

कार्लीलेने डोके हलवले. "माझ्या अंगावरून गेल्याशिवाय तसे करणे शक्य नव्हते. तुम्ही बघता आहात, तसे अभ्यासिकेचे दार पॅसेजच्या कडेला आहे." पायरोने विचारपूर्वक मान हलवली. कार्लीलेने त्याचे

काळजीपूर्वक व नेमके सांगणे चालू ठेवले. “मी असे म्हणू शकतो, की मी अत्यंत आभारी आहे, की उमराव मेफिल्ड यांनी खिडकीतून बाहेर पडणारा खरा चोर बघितला. नाहीतर माझी अवस्था बिकट झाली असती.”

उमराव मेफिल्ड अधीरपणे मध्येच बोलले, “काहीतरीच काय, कार्लीले? तुझ्यावर कधीच संशय घेतला गेलेला नाही.”

“सर, तुम्ही असे म्हणता आहात, हा तुमचा मोठेपणा आहे. पण घडलेल्या गोष्टी अशा घडल्याच. त्या माझ्या दृष्टीने वाईटच आहेत. काही झाले, तरी मी आशा करतो, माझे सामान आणि मला स्वतःला तुम्ही तपासू शकता.”

मेफिल्ड बोलला, “माझ्या आवडत्या कार्लीले, असे काही वेडेवाकडे बोलू नकोस.”

पायरो पुटपुटला, “तुम्ही हे गंभीरपणे म्हणत आहात का?”

“मी अगणित वेळा हे म्हणेन.”

पायरोने त्याच्याकडे मिनिटभर विचारपूर्वक पाहिले आणि पुटपुटला, “अस्स!”

मग त्याने विचारले, “मिसेस व्हॅंडेर्लनची खोली अभ्यासिकेपासून कुठे आहे?”

“ती बरोबर त्याच्या वरती आहे.”

“त्याची खिडकी गच्चीकडे तोंड करून आहे का?

“हो.”

पायरोने परत मान हलवली. तो म्हणाला, “आपण हॉलमध्ये जाऊ या.”

तिथे तो हॉलभर फिरला. खिडक्यांच्या कड्या तपासल्या.

ब्रिजच्या टेबलावरील आकड्यांकडे एक नजर टाकली. आणि मग उमराव मेफिल्डला बोलला, “हे प्रकरण वाटते, त्यापेक्षा फार गुंतागुंतीचे आहे. पण एक गोष्ट नक्की आहे. चोरलेले कागद या घरातून बाहेर गेलेले नाहीत.”

उमराव मेफिल्डने त्याच्याकडे रोखून बघितले. “पण माझ्या प्रिय पायरो, मी अभ्यासिकेतून बाहर पडतांना पाहिलेला माणूस --- “

तिथे कुणी माणूस नव्हता.

“पण मी त्याला पाहिले --- “

उमराव मेफिल्ड, मोठ्या मनाने मी तुम्हाला सांगतो, तुमची अशी कल्पना आहे, की तुम्ही त्याला पाहिले. झाडाच्या सावलीने तुम्हाला फसवले. चोरी नैसर्गिकपणे झाली, हे तुमची कल्पना खरी असल्याचा पुरावा आहे.”

“मिस्टर पायरो, मी माझ्या डोळयांनी पाहिले हा खरे तर पुरावा आहे.”

सर जॉर्ज म्हणाले, “अरे मित्रा, कुठल्याही दिवशी तुझ्यावर व आजूबाजूला माझे लक्ष असते.”

“उमराव मेफिल्ड, तुम्ही मला बोलून दिले पाहिजे. अगदी मुद्द्याला धरून बोलायचे, *तर गच्चीमधून कुणीच गवतात गेले नाही.”*

अशक्त दिसणारे मिस्टर कार्लीले कडकपणे म्हणाले, “असे असेल तर मिस्टर पायरोंचे बरोबर आहे. मग संशय आपोआप माझ्यावरच येतो. चोरी केल्याची शक्यता असलेला फक्त मीच उरतो.”

उमराव मेफिल्ड उठले. ”ही फालतूगिरी आहे. मिस्टर पायरोंना जे काही वाटते आहे, ते मला कबूल नाही. त्यासाठी मी हमी द्यायला तयार आहे.

पायरो मवाळपणे पुटपुटला, “पण मी असे म्हणालोच नाही, की मिस्टर कार्लीले यांच्यावर माझा संशय आहे.”

कार्लीले उत्तरला, “नाही. पण तुम्ही हे स्पष्ट केले, की इतर कोणीही चोरी केली असणे शक्य नाही.”

“अजिबात नाही. अजिबात नाही.”

“पण मी तुम्हाला सांगितले, की मला ओलांडून कुणीच अभ्यासिकेत गेले नाही.”

“कबूल आहे. पण कुणी खिडकीतून आले असेल तर?”

“पण तसे देखील झाले नसल्याचे, तुम्ही बोललात, नाही का?”

मी असे म्हणालो, की बाहेरून कुणी, गवतावर खुणा उमटवल्याशिवाय येऊ शकले नसेल. घरामधून अभ्यासिकेतून कुणी जाऊ शकले असते. गच्चीमधून लोंबकळत अभ्यासिकेच्या खिडकीत आणि तिथून इथेही येऊ शकले असते.”

मिस्टर कार्लीलेनी हरकत घेतली.

“पण उमराव मेफिल्ड आणि सर जॉर्ज गच्चीत होते.”

“ते गच्चीत होते, बरोबर. *पण ते चालत होते*. सर जॉर्ज कॅरिंग्टनचे डोळे सर्वात विश्वासार्ह मानता येतील --- पायरो थोडा वाकला --- “पण त्या चोराने त्याना त्याच्या पाठीमागे ठेवले नाही! अभ्यासिकेची खिडकी गच्चीच्या सर्वात डावीकडे आहे. त्यानंतर या खोलीची खिडकी येते. पण

गच्ची उजवीकडे खालील एक, दोन, तीन व कदाचित चार खोल्यांपर्यंत चालू रहाते, बरोबर?"

उमराव मेफिल्ड म्हणाला, "जेवायची खोली, बिलीयर्डची खोली, सकाळची खोली आणि वाचनालय"

"आणि तुम्ही गच्चीत किती वेळा फेऱ्या मारल्यात?"

"निदान पाच ते सहा वेळा नक्की."

"असे बघा, ते सोपे आहे. चोराला फक्त योग्य वेळेकडे लक्ष ठेवायचे होते!"

कार्लीले हळू बोलला, "म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे, की मी हॉलमध्ये फ्रेंच मुलीशी बोलत होतो, तेव्हा चोर थांबलेला होता?"

"तो माझा अंदाज आहे. अर्थात तो फक्त अंदाज आहे.

उमराव मेफिल्ड म्हणाले, "मला हे शक्य वाटत नाही. यात फारच धोका आहे." एअरमार्शलने हरकत घेतली. "चार्ल्स, मी तुझ्याशी सहमत नाही. हे पूर्णपणे शक्य आहे. मला आश्चर्य वाटते, माझ्याकडे मी स्वतः असा विचार करण्याइतके शहाणपण नाही."

पायरो म्हणाला, "म्हणजे तुम्ही बघता आहात, मी असा विश्वास का ठेवतो, की ते कागद अजून घरात आहेत. आता ते शोधायची समस्या आहे."

सर जॉर्जने नाकातून चिडवल्यासारखा आवाज काढला.

"ते सोपे आहे. प्रत्येकाला तपासा."

उमराव मेफिल्ड खाली जाऊ लागले. पण ते जाण्यापूर्वी पायरो बोलला, "नाही. नाही. ते इतके सोपे नाही. ज्याने ते कागद चोरले, तो तर्क

करेल, की असा शोध घेतला जाईल. आणि ते त्याच्या सामानात सापडणार नाहीत, याची काळजी तो घेईल. ते संशय येणार नाही, अशा जागी ते लपवेल.”

“तुम्ही असे सुचवत आहात का, आपल्याला घरभर लपंडाव खेळत फिरावे लागणार आहे?”

पायरो हसला.

“नाही. नाही. आपल्याला इतके कष्ट घ्यायची गरज नाही. आपल्याला विचार करून, ती कागद लपवलेली जागा [किंवा अपराधी व्यक्ती] सापडेल. त्यामुळे गोष्टी सोप्या होतील. सकाळी मला घरातील प्रत्येकाची मुलाखत घ्यायला आवडेल. मला वाटते, आता त्या मुलाखती घेणे शहाणपणाचे ठरणार नाही.”

उमराव मेफिल्डने मान हलवली.

तो म्हणाला, “जर आपण सगळ्यांना रात्री तीन वाजता अंथरुणातून खेचून बाहेर काढले, तर त्याची फार चर्चा होईल. मिस्टर पायरो, काही झाले तरी तुम्हाला रागरंग पाहूनच हे करावे लागेल. याचा बोलबाला व्हायला नको.”

पायरोने हात हवेत उडवले.

“हे हर्क्युल पायरोवर सोपवा. मी खोटे शोधून काढतो, ते नेहमीच नाजूक व सर्वांना पटेल असे काम असते. उद्या मी माझ्या पद्धतीने तपास करतो. पण आज रात्री, मला तुमच्यापासून मुलाखती सुरु करू देत. सर जॉर्ज आणि तुम्ही उमराव मेफिल्ड.”

त्याने त्या दोघांना अभिवादन केले.

“तुम्हाला एकेकट्याची असे म्हणायचे आहे का?”

"माझ्या म्हणण्याचा तोच अर्थ होता."

उमराव मेफिल्डने त्याचे डोळे थोडेसे उचलले आणि म्हणाला, "नक्कीच. मी तुम्हाला दोघांना एकटे सोडतो. माझी गरज पडेल, तेव्हा मी अभ्यासिकेत असेन. चल कार्लीले."

तो आणि सचिव बाहेर गेले. त्यांच्यामागे त्यांनी दार लाऊन घेतले.

सर जॉर्ज बसले व सहजपणे त्यांचा हात सिगरेटकडे गेला. त्यांनी गोंधळलेल्या चेहऱ्याने पायरोकडे बघितले.

ते सावकाश बोलले, "तुम्हाला माहिती आहे का, मला हे नक्की काय चालले आहे, ते समजत नाही."

पायरो हसून म्हणाला, "ते अगदी सहज स्पष्ट करता येईल. दोन शब्दात, खरे तर मिसेस व्हॅंडेर्लन!"

कॅरिंग्टन बोलला, "ओहो, असे आहे होय! मिसेस व्हॅंडेर्लन?"

"अर्थातच. असे बघा, मला उमराव मेफिल्डला जो प्रश्न विचारायचा आहे, तो विचारणे काही फार नाजूक काम नाही. मिसेस व्हॅंडेर्लन का? ही बाई संशयपूर्ण चारित्र्याची समजली जाते. तर मग ती इथे का होती? मी माझ्याशी म्हणतो, याची तीन स्पष्टीकरणे आहेत. उमराव मेफिल्डला त्या बाईबद्दल *प्रबळ आकर्षण* आहे. [म्हणूनच मला तुमच्या एकट्याशी बोलायचे आहे. मला त्याला लाजवायचे नाही.] दोन, मिसेस व्हॅंडेर्लन कदाचित घरातील दुसऱ्या कुणाची आवडती मैत्रिण आहे?

सर जॉर्ज मोठ्याने हसत म्हणाले, "यातून तुम्ही मला वगळू शकता."

"आणि या दोन्हीपैकी काहीच खरे नसेल, तर हा प्रश्न दुप्पट वेगाने आपल्यावर चालून येतो. *मिसेस व्हॅंडेर्लन का?* मला वाटते, मला धुरकट उत्तर दिसते. त्याचे *कारण* आहे. तिचे या विशेष घटनेच्या वेळी इथे असणे

नक्कीच उमराव मेफिल्डच्या इच्छेने झाले आहे व ते विशेष कारणाने झाले आहे. बरोबर आहे?”

सर जॉर्जने मान हलवली. “तुमचे अगदी बरोबर आहे. तिने त्याच्या इच्छेप्रमाणे वागावे, यासाठी मेफिल्ड पुरेसा जाणकार होता. त्याला ती इथे वेगळ्या कारणासाठी हवी होती. ते असे होते.”

त्याने जेवणाच्या टेबलावर झालेले त्यांच्यातील संभाषण सांगितले. पायरोने ते लक्षपूर्वक ऐकले.

तो म्हणाला, “आहा, मला आता समजते आहे. तथापि असे दिसते आहे, की त्या बाईने तुम्हाला दोघांनाही पुरेसे जोखले आहे.

सर जॉर्ज मोकळेपणे शपथपूर्वक सांगत होते.

पायरो त्यांच्याकडे काहीसे मनोरंजन झाल्यासारखे बघत होता. मग तो बोलला,

“ही चोरी तिनेच केली, याबद्दल तुम्हाला काहीच संशय नाही --- मला वाटते, जरी तिचा यात प्रत्यक्ष सहभाग नसला तरी, ती यासाठी जबाबदार आहे, नाही का?”

सर जॉर्ज बघत राहिले.

“अर्थात नाही. याबद्दल काहीच संशय नाही. कारण बाकी कुणाला ते कागद चोरण्यात, काय रस असणार?”

हर्क्युल पायरो मागे रेलून छताकडे बघत म्हणाला, “आहा, सर जॉर्ज, तरीही आपण कबूल केले पाहिजे, की पाव तासापूर्वी हे कागद चांगल्यापैकी पैसे देणारे होते. कदाचित बँकेतील नोटा, सोने, दागदागिने या स्वरूपात नसले, काही असले तरी तो पैशांचा ऐवज होता. जर इथे कुणी त्यावर टपलेले असेल तर —”

दुसऱ्याने नाकाने जोरात आवाज काढला.

“अलीकडील दिवसात कोण असे नसेल? मला वाटते, मी कुठल्याही पुराव्याशिवाय हे म्हणू शकतो.”

तो हसला. पायरोदेखील त्याच्याकडे बघून हसला व पुटपुटला, “*पण हो*, तुम्हाला पाहिजे ते, तुम्ही म्हणू शकता. सर जॉर्ज, एका चुकीच्या वागण्यासाठी शिव्या न बसणारे स्पष्टीकरण असे आपण म्हणू.”

“पण मी स्वतः याबद्दल अगदी ठाम आहे.”

पायरोने दुःखाने मान हलवली. “हो, खरे आहे. तुमच्यासारख्या माणसाचा रहाण्याचा खर्च खूप असतो. आणि तुम्हाला खर्चिक वयातील तरुण मुलगा असतो --- “

सर जॉर्जने एक दुःखी सुस्कारा टाकला.

“शिक्षण पुरेसे वाईट असते. त्यात आणि डोक्यावर कर्ज! तुम्हाला सांगतो, हा काही वाईट मुलगा नाही.”

पायरो सहानूभूतीपूर्वक ऐकत होता. त्याने एअरमार्शलच्या अनेक वाईट वागणुकीबद्दल ऐकले. तरुण पिढीत धैर्य आणि क्षमता नसणे, आयांनी मुलांना बिघडवण्याचे तऱ्हेतऱ्हेचे मार्ग व सतत त्यांच्या चुकीच्या वागण्याला पाठींबा देणे, जुगार खेळण्याचा एकदा बाईला लागलेला नाद, परवडत नसतांना उच्च रहाणीमानाची सवय लावून घेऊन मानसिक कणखरपणा गमावणे! सर जॉर्जने बायको व मुलाला याबद्दल कधीच टोकले नाही. पण त्याच्या नैसर्गिक पारदर्शकतेमुळे त्याची सामान्य तत्वे सहज दिसून येत होती.”

तो एकदम अचानक मोडून पडला. “माफ करा. विषयापासून दूर जाऊन तुमचा वेळ घेणे बरोबर नाही --- विशेषतः इतक्या रात्रीच्या --- किंवा खरे तर पहाटेच्या वेळी.”

त्याने एक जांभई दिली.

“सर जॉर्ज, मी असे सुचवेन, तुम्ही झोपायला जा. तुम्ही फारच दयाळूपणा दाखवून मदत केलीत.”

“ठीक आहे आपण उद्या बोलू. तुम्हाला ते कागद परत मिळतील, असे खरेच वाटते आहे का?”

पायरोने खांदे उडवले.

“प्रयत्न करायचा. न करायचे काही कारण नाही.”

“ठीक आहे, मी निघतो शुभ रात्र!” तो खोलीतून बाहेर पडला. पायरो त्याच्या खुर्चीत बसून, आढ्याकडे बघत, विचार करत राहिला. त्याने एक छोटी वही बाहेर काढली आणि कोऱ्या पानावर लिहू लागला,

*मिसेस व्हॅडेर्लन?*

*मिसेस ज्युलिया कॅरिंग्टन?*

*मिसेस मकाट्टा?*

*रेगी कॅरिंग्टन?*

*मिस्टर कार्लीले?*

*त्याखाली त्याने लिहिले,*

*मिसेस व्हॅडेर्लन आणि रेगी कॅरिंग्टन?*

*मिसेस व्हॅडेर्लन आणि ज्युलिया बाईसाहेब?*

*मिसेस व्हॅडेर्लन आणि मिस्टर कार्लीले?*

त्याने असमाधानाने डोके हलवले व पुटपुटला, *"हे सोपे आणि साधे आहे."*

मग त्याने अजून काही वाक्ये वाढवली.

*उमराव मेफिल्डला सावली दिसली का? जर दिसली नसेल, तर त्याने तसे का सांगितले? सर जॉर्जने काही पाहिले का? मी फुलांचा वाफा तपासल्यावर, त्याने काही पाहिले नाही, याबद्दल तो ठाम होता. टीप: उमराव मेफिल्डला जवळची दृष्टी आहे. तो चष्मा न लावता वाचू शकतो, पण खोलीतील लांबचे पहायला त्याला एका डोळ्याचा चष्मा लागतो. सर जॉर्जला लांबची दृष्टी आहे. त्यामुळे गच्चीच्या एका टोकाकडून दिसणे, त्याला उमराव मेफिल्डपेक्षा जास्त सोपे आहे. तरी उमराव मेफिल्ड त्याच्या मित्राच्या नकारानंतरही अगदी ठामपणे सांगतो आहे, की त्याने कोणाला तरी पाहिले.*

*मिस्टर कार्लीले वाटतो तितका संशयातीत असू शकेल का? उमराव मेफिल्ड त्याच्या निरागसपणाबद्दल इतका जोर का देतो आहे? फारच जोर! का? कारण तो गुप्ततेने त्याचा संशय घेतो आहे आणि त्याच्या संशय घेण्याबद्दल त्याला लाज वाटते आहे? की त्याला अजून कोणाचा पक्का संशय आहे? म्हणजे मिसेस व्हॅडेर्लन सोडून आणखी कोणी?*

त्याने वही बाजूला ठेवली.

मग उठून, अभ्यासिकेत गेला.

## पाच

उमराव मेफिल्ड त्याच्या टेबलावर बसला होता. पायरो तिथे आला. तो जागच्या जागी मागेपुढे झाला. पेन खाली ठेवले व प्रश्नार्थक नजरेने बघू लागला.

"मिस्टर पायरो, तुमची कॅरिंग्टनची मुलाखत घेऊन झाली का?"

पायरो हसून बसला. "हो, उमराव मेफिल्ड. मी गोंधळलेल्या एका मुद्द्यावर त्याने स्पष्टीकरण दिले.

"ते काय होते?"

"ते मिसेस व्हॅंडेर्लनच्या तेथील उपस्थितीबद्दल होते. तुम्हाला हे समजले असेल, की मला वाटते, तुम्हालाही ते देणे शक्य आहे --- "

पायरोची मुद्दाम वाढवलेली लाजीरवाणी परिस्थिती मेफिल्डच्या लगेच लक्षात आली.

"तुम्हाला वाटले, की मला त्या बाईबद्दल काही आपलेपणा आहे? विचित्र पद्धतीने, अजिबात नाही. त्यापासून मी लांब आहे. हे मजेशीर आहे. कॅरिंग्टनलाही असेच वाटते."

"हो, तो मला तसे तुमच्याबरोबरील संभाषणात बोलल्याचे तो म्हणाला.

उमराव मेफिल्डला खंत वाटलेली दिसली.

"माझा बेत यशस्वी झाला नाही. एका बाईकडून आपल्याला हार मानावी लागली हे कबूल करणे, चीड आणणारे आहे."

"पण उमराव मेफिल्ड, अजून तुम्हाला हार मानावी लागलेली नाही."

“आपण अजून जिंकू शकू, असे तुम्हाला वाटते का? ठीक आहे. असे ऐकून, मला बरे वाटले. ते खरे असेल, असा विचार करायला मला आवडेल.”

त्याने एक सुस्कारा टाकला.

“मला वाटते, मी पूर्णपणे मूर्खासारखा वागलो --- त्या बाईला जाळ्यात पकडण्यासाठी, केलेल्या बेतावर मी इतका खूष होतो!”

त्याची एक लहान सिगरेट पेटवत, पायरो बोलला, “उमराव मेफिल्ड, तुमचा बेत नक्की काय होता?

उमराव मेफिल्ड कां कू करू लागला. “मला ते खोलात जाऊन सांगता येणार नाही.”

“तुम्ही त्याची कोणाबरोबर चर्चा केली नाही का?”

“नाही.”

“कार्लीलेबरोबर देखील नाही?”

नाही.”

पायरो हसला. “उमराव मेफिल्ड, तुम्हाला एकट्यालाच लढाई लढायची आहे का?”

थोड्या संकटात असल्यासारखा दुसरा म्हणाला, “मला सहसा तेच उत्तम वाटते.”

“हो, ते शहाणपणाचे आहे. कुणावरच विश्वास टाकू नका. पण तुम्ही सर जॉर्जला त्याबद्दल सांगितलेत?”

“ते फक्त मला असे जाणवले, की तो माझा आवडता मित्र खरेच माझ्याविषयीच्या काळजीने उदास झाला आहे म्हणून!” ते आठवून उमराव मेफिल्ड हसला.

“तो तुमचा खूप जुना मित्र आहे का?”

हो, मी त्याला गेली वीसपेक्षा जास्त वर्षे ओळखतो.”

“आणि त्याची बायको?”

“मला त्याची बायकोही अर्थात माहिती आहे.”

“पण [मी उद्धट वाटत असेन, तर माफ करा.] तिच्याशी त्याच्याइतकी जवळीक नाही?

“मिस्टर पायरो, मला कळत नाही, की माझ्या खासगी नातेसंबंधांची चौकशी करण्याचे या प्रकरणाशी काय देणेघेणे आहे?”

“पण मला वाटते, उमराव मेफिल्ड, त्याचा तसे पाहिले तर संबंध आहे. मी जे विधान केले की हॉलजवळील खोलीत कोणीतरी होते, त्याला तुम्ही दुजोरा दिला होतात ना?

“हो, खरे तर मी तुमच्याशी सहमत झालो, कारण तेच झाले असण्याची शक्यता मलाही वाटली.”

“आपण तेच असे म्हणायला नको. तो शब्द स्वतःबद्दलचा फार विश्वास दाखवतो. पण माझे ते म्हणणे खरे असेल, तर ती कोण व्यक्ती असेल, असे तुम्हाला वाटते?”

“अर्थात मिसेस व्हॅंडेर्लन! एकदा ती पुस्तकासाठी परत आली. ती दुसऱ्या पुस्तकासाठी किंवा हातातल्या बॅगेसाठी किंवा पडलेल्या हातरुमालासाठी परत आलेली असू शकेल --- बायकांची डझनभर कारणे! तिने तिच्या नोकराणीला किंचाळायला सांगून ठेवले असणार. त्यामुळे

कार्लीले बाहेर जाईल व ती आत येऊन तुम्ही म्ह्टल्याप्रमाणे, खिडकीतून बाहेर पडेल.”

“तुम्ही विसरता की ती मिसेस व्हॅंडेर्लन नसणार. कार्लीले जेव्हा नोकराणीशी बोलत होता, तेव्हा त्याने तिला वरच्या मजल्यावरुन नोकराणीला हाक मारतांना ऐकले.”

उमराव मेफिल्डने त्याचा ओठ चावला.

‘खरे आहे. मी ते विसरलो.” तो फार रागावलेला दिसत होता.

पायरो सभ्यपणे बोलला, “असे बघा, आपली प्रगती होते आहे. पहिल्यांदा आपल्याकडे बाहेरून आलेल्या व माल पळवलेल्या चोराचे साधे स्पष्टीकरण होते. मी अनेक वेळा म्ह्टल्याप्रमाणे, ही पटकन मान्य करण्यासारखी फार सोयीस्कर उपपत्ती आहे. आपण ती आधीच अमान्य केली आहे. मग आपण परदेशी दलाल, मिसेस व्हॅंडेर्लनच्या उपपत्तीकडे आलो. ती फार सुंदर रीत्या एका मुद्द्यापर्यंत बरोबर वाटत होती. त्यामुळे आपण तिचा विचार करू लागलो.”

“पण आता तुम्ही ती देखील अमान्य करून टाकली आहे का?”

“त्या खोलीत मिसेस व्हॅंडेर्लन नव्हती. ती चोरी करणारी, मिसेस व्हॅंडेर्लनची कुणी मदतनीस होती. पण ही फक्त शक्यता आहे. कदाचित कुणा तिसऱ्याच माणसाने चोरी केली असेल. तसे असेल, तर आपल्याला चोरीचा उद्देश काय, ते पहावे लागेल.”

“मिस्टर पायरो, हा जरा लांबच्या वळणाचा रस्ता वाटत नाही का? उद्देश पैशांचाच आहे. ते कागद चोरून त्याचे पैसे करायचे, हाच उद्देश असणार. हा अगदी साधा हेतू आहे. पण कदाचित तो फार वेगळाही असू शकेल.”

“जसे की --- “

पायरो हळू म्हणाला, “हे नक्की कुणाचे तरी नुकसान करून करता येऊ शकेल.”

“कुणाचे?”

“शक्यतो मिस्टर कार्लीले. त्याच्यावरच सहजपणे संशय घेतला जाऊ शकतो. पण यात अजून काही असू शकते. देशाचे भवितव्य ठरवणारे लोक. या लोकांनी प्रगट केलेल्या भावनांनी उमराव मेफिल्ड खट्टू होऊ शकतो.”

“म्हणजे चोरी माझे नुकसान करण्यासाठी केली गेली?”

पायरोने मान हलवली.

“मला वाटते, मी बरोबर म्हणतो आहे. उमराव मेफिल्ड, पाच वर्षांपूर्वी तुम्ही तुम्हाला काहीसे दमवणाऱ्या कालखंडातून गेलात. या देशाच्या सज्ञान लोकांमध्ये टोकाच्या कुप्रसिद्ध असलेल्या एका युरोपिअन शक्तीबरोबरच्या तुमच्या मैत्रीबद्दल संशय घेतला गेला.”

“मिस्टर पायरो, हे खरे आहे.”

“आजकाल या देशातील मुत्सद्दी मंडळींचे काम कठीण आहे. देशाच्या दृष्टीने विशेषत्वाने फायदेशीर धोरणाचे अवलंबन करण्यासाठी, तो प्रयत्नशील असतो. पण त्याच वेळी, त्याला मुत्सद्दी मंडळींचे म्हणणेही लक्षात घ्यावे लागते. हे मत बहुधा भावनाशील, गोंधळलेले व बरेचसे अयोग्य असते. पण तरी ते विचारात घ्यावेच लागते.”

“तुम्ही हे किती छान सांगितले! तोच तर राजकीय पुढाऱ्यांच्या आयुष्याचा शाप आहे. त्याला देशवासीयांचे मत कितीही धोकादायक आणि धसमुसळे असले, त्यापुढे झुकावे लागते.”

“मला वाटते तीच तर तुमची शोकांतिका आहे. प्रश्नार्थक असलेल्या एका देशाबरोबरचा एक करार तुम्ही मोडलात, अशी तुमच्याविरुद्ध अफवा आहे. त्यावेळी तुमच्याबद्दल या देशांनी व वर्तमानपत्रांनी टीकेची झोड उठवली होती. नशीबाने पंतप्रधानांनी गटनिहाय पद्धतीने ते खोडून काढले. आणि तुम्हीही त्याला संमती देण्यास नकार दिला. तरी अजूनही तुमच्याबद्दलची सहानुभूती काही गुप्तता राखून नाही.”

“मिस्टर पायरो, हे सर्व खरे आहे. पण भूतकाळ कशाला उकरून काढायचा?”

“कारण मला असे वाटते, की तुम्ही अडथळे पार करत शत्रूभोवती जी परिस्थिती निर्माण केली आहे, त्यामुळे एक प्रकारे हताश होऊन, ते नवीन चाल खेळण्याची शक्यता आहे. तुम्ही लवकरच लोकांचा विश्वास मिळवाल. ती विशिष्ट परिस्थिती निघून गेली आहे. आता उलट तुम्ही राजकारणातील एक सर्वात लोकप्रिय व्यक्ती आहात. तुमच्याबद्दल असे बोलले जाते आहे, की जेव्हा मिस्टर हंबर्ले निवृत्त होतील, तेव्हा तुम्ही देशाचे पंतप्रधान व्हाल.”

“तुम्हाला वाटते, की हा माझ्या लोकप्रियतेला बट्टा लावायचा नीच प्रकार आहे? अत्यंत नीचपणा!”

“*असे असले तरी*, उमराव मेफिल्ड, ब्रिटनच्या नवीन बॉम्बरचे महत्वाचे कागदपत्र एका शनिवार रविवारी, एक सुंदर बाई घरात पाहुणी म्हणून आलेली असतांना, चोरले गेले, हे जर समजले, तर ते चांगले दिसणार नाही. जर वर्तमानपत्रांनी तुमचे त्या बाईबरोबर संबंध असल्याचे काही सूचक लिखाणातून जाहीर केले, तर लोकांच्या मनात तुमच्याबद्दल अविश्वास निर्माण होईल.”

“अशा गोष्टी काही गंभीरपणे घेतल्या जात नाहीत.”

“माझ्या आवडत्या मेफिल्ड, तुम्हालाही चांगले माहिती आहे, की असे होऊ शकते. एखाद्या माणसावर असलेला लोकांचा विश्वास उडायला छोटेसे कारण पुरते.”

उमराव मेफिल्ड अचानक चेहरा पाडत म्हणाले, “हो, हे खरे आहे. देवा, हे किती वाईट रीत्या अवघड होत चालले आहे! तुम्हाला खरेच असे वाटते का? --- पण हे अशक्य आहे. अशक्य!”

“तुमचा दुस्वास करणारे कुणी तुम्हाला माहिती आहे का?”

“काही काय?”

“तुम्हाला असे कबूल करावे लागेल, की तुम्ही मेजवानीसाठी बोलावलेल्या लोकांबरोबरच्या खासगी संबंधाविषयी मी तुम्हाला जे प्रश्न विचारले, ते अगदीच फालतू नव्हते.”

“ओहो, कदाचित तसे असेलही. कदाचित. तुम्ही मला ज्युलिया कॅरिंग्टनबद्दल विचारले. त्यात खरे तर सांगण्यासारखे फारसे काही नाही. मला ती फारशी आवडत नव्हती आणि तीदेखील माझी फारशी पर्वा करत नाही. ती अस्वस्थ, उदास बाई आहे. अतिशय गावढळ व जुन्या वळणाची बाई असून पत्त्यांच्या बाबतीत वेडी आहे. मला मी स्वतंत्र माणूस म्हणून ओळखला जावा, असे वाटते.”

पायरो बोलला, “मी इथे येण्यापूर्वी तुमच्याबद्दलच माहिती ‘कुणाचे कोण’ मध्ये वाचली. तुम्ही एका इंजिनिअरींग कंपनीचे मुख्य होतात. आणि तुम्ही स्वतः प्रथम श्रेणीचे इंजिनिअर आहात.”

उमराव मेफिल्ड गंभीरपणे बोलला, “प्रात्यक्षिक कामात मला माहिती नाही, असे काहीच नाही. मी अगदी तळापासून सर्व कामे केलेली आहेत.”

पायरो ओरडला, “आहा ला ला! मी मूर्ख होतो --- नक्कीच मूर्ख होतो.”

मेफिल्ड त्याच्याकडे बघत राहीला. “मिस्टर पायरो, तुम्ही काय म्हणत आहात?”

“आता मला कोड्याचा दुसरा भाग स्पष्ट झाला. *पूर्वी माझ्या हे लक्षात आले नव्हते* --- पण आता ते सर्व बरोबर जमते आहे --- हो. अगदी चपखलपणे जमते आहे.”

उमराव मेफिल्ड त्याच्याकडे चक्रावून, बघत राहीला.

थोडेसे हसत, पायरोने डोके हलवले.

“नाही. नाही. आता नाही. मला माझ्या कल्पना आधी नीट स्पष्ट होऊ देत.”

तो उठला. “शुभरात्र, उमराव मेफिल्ड. मला वाटते ते कागद कुठे आहेत, ते मला समजले आहे.

उमराव मेफिल्ड ओरडला, “तुम्हाला माहिती आहे? मग आपण ताबडतोब ते हस्तगत करू.”

पायरोने त्याचे डोके हलवले. “नाही. नाही. तसे होणार नाही. उगीच केलेली घाई विनाशाप्रत नेणारी ठरेल. हे सगळे हर्क्युल पायरोवर सोडा.”

तो खोलीबाहेर गेला. उमराव मेफिल्डने पायरोला मनात शिव्या देत त्याचे खांदे उभारले. “हा माणूस बढाईखोर आहे. मग कागद बाजूला सारून, दिवा मालवून, तोदेखील झोपायला गेला.

# सहा

रेगी कॅरिंग्टन म्हणाला, “जर चोरी झाली आहे, तर मग म्हातारा मेफिल्ड पोलीसाना का बोलावत नाही?”

त्याने त्याची खुर्ची न्याहारीच्या टेबलापासून थोडी मागे ओढली.

तो शेवटचा उरला होता. त्याचे यजमान, मिसेस मकाट्टा आणि सर जॉर्ज यांची न्याहारी काही वेळापूर्वी संपली होती. त्याची आई आणि मिसेस व्हॅंडेर्लन त्यांच्या झोपायच्या खोलीत न्याहारी घेत होत्या.

उमराव मेफिल्ड आणि हर्क्युल पायरो यांच्यात झालेल्या संभाषणाचे वाक्य सर जॉर्ज परत बोलून दाखवत होता. पण तो ते बरोबर बोलत असल्याबद्दल, त्याला खात्री नव्हती.

रेगी म्हणाला, “अशा एखाद्या परदेशी माणसाला बोलावणे, मला विचित्र वाटते. पपा, तो काय निष्कर्षाप्रत आला?”

“माझ्या मुला, मलाही नक्की माहिती नाही.”

रेगी उठला. आज सकाळी तो उदास आणि ताण आलेला दिसत होता.

“काही माहिती नाही --- एवढे महत्वाचे असून माहिती नाही. कागद किंवा काही?”

“बेटा, खरे सांगायचे, तर तुला कसे सांगावे, ते मला कळत नाही.”

“अस्स, फार गुप्त बेत दिसतो आहे?”

रेगी जिन्याकडे धावला. अर्धा जिना चढल्यावर क्षणभर थांबून हसला. मग वर जाऊन त्याच्या आईच्या दारावर टकटक केले. तिने त्याला आत यायला सांगितले.

ज्युलिया बाईसाहेब अंथरुणावर उठून बसल्या होत्या व एका पाकीटावर बोटे फिरवत होत्या. त्या वर बघून बोलल्या, “मुला, शुभ प्रभात. रेगी काय झाले आहे?”

“फारसे काही नाही. पण असे दिसते आहे, की काल रात्री चोरी झाली.”

“चोरी? काय चोरले?”

“ओहो, मला माहिती नाही. ते सर्व गुप्त दिसते आहे. तिथे काही विचित्र प्रकारची खासगी चौकशी चालली आहे. एक परका माणूस ती करतो आहे. प्रत्येकाला तो प्रश्न विचारतो आहे.”

“किती असामान्य!”

रेगी सावकाश बोलला, “हे काही बरे चाललेले नाही. अशा गोष्टी चाललेल्या असतांना घरात बसणे!”

“नेमके काय झाले आहे?”

“माहिती नाही. सर्वजण झोपायला गेल्यावर मी काही वेळ जागा होतो व नंतर झोपायला गेलो. आई, बाहेर बघ. तो न्याहारीचा ट्रे रिकामा कर.”

त्याने ट्रे रिकामा करून खिडकीजवळील टेबलावर ठेवला.

“पैसे चोरले गेले का?”

“मी तुला सांगितले, मला माहिती नाही.”

ज्युलिया बाईसाहेब सावकाश बोलल्या, “मला वाटते तो माणूस सगळयांना प्रश्न विचारतो आहे?”

“मलाही असे वाटते.”

“काल रात्री ते सर्वजण कुठे होते? हा सर्व काय प्रकार आहे?”

“बहुधा, मी फार काही सांगू शकत नाही. मी झोपायला गेलो आणि लगेच झोपलो.”

ज्युलिया बाईसाहेब काही बोलल्या नाहीत.

“आई, मी काय म्हणतो, तू मला थोडे पैसे देशील का? माझ्याकडे काहीच नाही आहेत.”

त्याची आई फसव्या सुरात म्हणाली, “मी नाही देऊ शकत. मीच कफल्लक झाले आहे. तुझे वडील हे ऐकतील, तेव्हा ते काय म्हणतील?”

दारावर थाप पडली व सर जॉर्ज आत आले.

“आहा, रेगी, तू इथे आहेस. तू खाली वाचनालयात जाशील का? हर्क्युल पायरोना तुला भेटायचे आहे. पायरोने आताच पुन्हा संशय येणाऱ्या मिसेस मकाट्टाची मुलाखत संपवली आहे.

काही थोड्या प्रश्नांवरून समजले, की मिसेस मकाट्टा अकरा वाजायच्च्या थोडी आधी झोपायला गेली. आणि तिने आपल्याला गूढ शोधायला मदत होईल, असे काही पाहिले किंवा ऐकले नाही.

पायरो चोरीच्या विषयावरून अधिक व्यक्तिगत बाबींकडे वळला. त्याला उमराव मेफिल्डबद्दल जरा कौतुक होते. सामान्य लोकांचा प्रतिनिधी, म्हणून त्याला वाटे, की उमराव मेफिल्ड खरेच मोठा थोर माणूस आहे. मिसेस मकाट्टालाही ते त्याच्यापेक्षा जास्त चांगले ठाऊक होते. ती म्हणाली, “उमराव मेफिल्ड डोकेबाज आहे आणि त्याने त्याची करीयर स्वतः

घडवली आहे. वंशपरंपरेने त्याच्याकडे काही आलेले नाही. कदाचित, त्याला दूरदृष्टी थोडी कमी आहे. पण साधारण सर्व पुरुषांना ती तशीच असते. एका बाईच्या कल्पनाशक्तीची झेप त्यांच्याकडे नसते. मिस्टर पायरो, पुढील दहा वर्षात, सरकार दरबारी त्याचे मोठे नाव होणार आहे.”

पायरो म्हणाला, की त्यालाही तशी खात्री वाटते आहे.

मग त्याने मिसेस व्हॅडेर्लनचा विषय काढला. त्याने ऐकले होते, की ती आणि उमराव मेफिल्ड हे दोघे फार जवळचे मित्र होते, ते खरे होते का?”

“खरे सांगायचे तर, असे काहीही नव्हते. मला तिला इथे भेटून फार नवल वाटले. मी फारच आश्चर्यचकित झाले.”

पायरोने मिसेस मकाट्टाला मिसेस व्हॅडेर्लनबद्दलचे तिचे मत विचारले व ते त्याला असे मिळाले: “मिस्टर पायरो, ती फारच बेकार बाई आहे. स्त्रीजातीला लाज आणणारी बाई आहे. ती पहिल्यापासून शेवटपर्यंत एक प्रकारचे बांडगुळ आहे.”

“पण पुरुष तिला म्हणे नावाजतात?”

मिसेस मकाट्टाने तो शब्द दुःखाने उच्चारला, “पुरुष? पुरुष नेहमीच दिसायला चांगल्या स्त्रियांकडे आकर्षित होतात. तो तरुण मुलगा --- रेगी कॅरिंग्टन तिच्याशी बोलून प्रभावित होतो आहे. आणि मूर्खासारखी ती त्याला चिथावणी देते आहे. त्याच्या बुद्धिमत्तेची स्तुती करते आहे, जी त्याच्यात मुळीच नाही आहे.”

‘तो चांगला खेळाडू नाही आहे का?”

त्याने काल रात्री सगळया प्रकारच्या चुका केल्या.”

“ज्युलिया बाईसाहेब चांगल्या खेळाडू आहेत का?”

मिसेस मकाट्टा म्हणाली, "माझ्या मते हो. ती जवळजवळ व्यावसायिक खेळाडू आहे. ती दिवसरात्र पत्ते खेळत असते."

"धोका घेऊन, गंभीरपणे?"

"हो, खरेच. मी जितकी काळजी घेऊन खेळेन, त्यापेक्षा नक्कीच खूप जास्त. पण मला हे चांगले वाटत नाही."

ती खेळून खूप पैसे मिळवते का?

मिसेस मकाट्टाने नाकातून एक मोठा जबरदस्त आवाज काढला.

"ती असे करून, तिचे कर्ज चुकवते. पण मी असे ऐकले, की अलीकडे तिचे नशीब चांगले नव्हते. काल रात्री ती तिच्या मनात काही वेगळे चालल्यासारखे वागत होती. मिस्टर पायरो, जुगार खेळल्याचा व प्यायल्याचा परिणाम! माझ्या हातात काही असते, तर मी हा देश सुधारला असता."

इंग्लंडची नितीमत्ता सुधारण्यासंबंधीची लांबलचक चर्चा पायरोला ऐकून घ्यावी लागली. त्याने हुशारीने शेवटी ते संभाषण बंद केले व रेगी कॅरिंग्टनला बोलावणे पाठवले.

तो तरुण मनुष्य खोलीत शिरला, तेव्हा त्याचा एकंदर आढावा घेतला गेला. त्याचे तोंड अशक्त दिसत असले, तरी त्याचे हास्य मोहक होते. हनुवटी ठामपणा दाखवत होती. दोन्ही डोळे एकमेकांपासून लांब होते व डोके जरासे अरुंद होते. त्याला वाटले की रेगीसारख्या लोकांना तो चांगले ओळखतो.

"मिस्टर रेगी कॅरिंग्टन?"

"हो, मी काय करू शकतो?"

"काल रात्रीबद्दल तुला शक्य असेल, ते सांग."

“ठीक आहे, मी आठवतो. आम्ही हॉलमध्ये ब्रिज खेळलो. नंतर झोपलो.”

“तेव्हा किती वाजले होते?”

“अकराच्या थोडे आधी असेल. मला वाटते, चोरी त्यानंतर झाली?”

“हो, त्यानंतर झाली. तुला काही दिसले किंवा ऐकू आले का?”

रेगीने खंत वाटल्यासारखे डोके हलवले. “नाही. मी लगेच झोपायला गेलो आणि गाढ झोपलो.”

“म्हणजे तू हॉलमधून सरळ तुझ्या झोपायच्या खोलीत गेलास आणि सकाळपर्यंत तिथेच होतास?”

“बरोबर.”

पायरो म्हणाला, “हे स्वारस्यपूर्ण आहे.”

रेगी कडकपणे म्हणाला, “स्वारस्यपूर्ण म्हणजे काय?

“म्हणजे उदाहरणार्थ, तुला किंकाळी ऐकू आली नाही?”

“नाही.”

“फारच स्वारस्यपूर्ण.”

“हे बघा, तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“तुला कदाचित थोडे कमी ऐकू येते का?”

“अर्थातच नाही.”

पायरोचे ओठ हलले. असे शक्य होते, की तो स्वारस्यपूर्ण हा शब्द परत तिसऱ्यांदा उच्चारत होता. मग तो म्हणाला, “ठीक आहे. आभारी आहे. तू जाऊ शकतोस.”

रेगी उठला आणि आपण काहीच सांगू शकत नाही, असे वाटत उभा राहिला. तो बोलला, "आता तुम्ही ते सांगत आहात. मला वाटते, मी त्या प्रकारचे काहीतरी ऐकले."

"आहा, तू काहीतरी ऐकलेस?

"हो, पण मी पुस्तक वाचत होतो --- खरे तर रहस्यकथा --- आणि मी त्याकडे फारसे लक्ष दिले नाही."

पायरो म्हणाला, "आहा, हे समाधानकारक स्पष्टीकरण झाले."

त्याचा चेहरा कोरा होता.

रेगी अजूनही कां कू करत होता. मग तो वळून दाराकडे चालू लागला. तिथे थांबून त्याने विचारले, "मी विचारतो, काय चोरीला गेले?"

"काही मोठ्या किमतीचे, एवढेच मी सांगू शकतो."

"ओहो!" रेगी एवढेच बोलला व बाहेर गेला.

पायरोने डोके हलवले.

"हे बरोबर बसते आहे. अगदी चपखलपणे."

त्याने घंटी वाजवली आणि नम्रपणे विचारले की मिसेस व्हॅडेर्लन उठली आहे का?"

## सात

खोलीत शिरणारी मिसेस व्हॅडेर्लन फार सुंदर दिसत होती. तिने कलात्मक रीत्या शिवलेले लालसर तपकिरी रंगाचे खेळायचे कपडे घातले होते. ते तिचे फिकट केस दाखवत होते. ती एका खुर्चीत बसून तिच्यासमोरील छोट्या माणसाकडे बघून, चमकदारपणे हसली. क्षणभर

त्यातून काही प्रतीत झाले व लगेच निघून गेले. पण ते तिथे होते. त्यातून मिळणाऱ्या सूचना पायरोला कुतूहलपूर्ण वाटल्या.

"चोर? काल रात्री? किती भयंकर! नाही, मी काहीही ऐकले नाही. पोलीसांचे काय? ते काही करू शकत नाहीत का?"

परत तिच्या डोळ्यात चिडवल्यासारखे भाव दिसले.

पायरोने विचार केला, "बाईसाहेब, असे दिसते आहे, की तुम्ही पोलीसांना घाबरत नाही. तुम्हाला चांगले माहिती आहे, की पोलिसांना बोलावण्यात आलेले नाही." तो गंभीरपणे बोलला, "आणि त्यावरून तुम्हाला काय कळले? "बाईसाहेब, तुम्ही समजून घ्या, हे फार गुप्ततेचे प्रकरण आहे."

"का, तसे असणारच, मिस्टर पायरो, नाही का? मी काही बोलायचे स्वप्न बघत नाही आहे. उमराव मेफिल्डची मी स्तुतिपाठक आहे. त्याला जराही त्रास होईल, असे मी काही करणार नाही."

तिने पायांवर पाय ठेवले. तिच्या पाऊलाच्या टोकांवर तपकिरी रंगाच्या चामड्याच्या स्लीपर दिसल्या.

ती सुदृढ, लाघवी व समाधानी असे हसू मुद्दाम हसली, असे वाटले. "मला करण्यासारखे काही असेल, तर नक्की सांगा."

"बाईसाहेब, मी आपला आभारी आहे. तुम्ही काल रात्री हॉलमध्ये ब्रिज खेळत होतात का?"

"हो."

"मी असे ऐकले, की त्यानंतर सगळ्या बायका झोपायला गेल्या?

"हो बरोबर."

"पण कुणीतरी पुस्तक नेण्यासाठी परत आले. मिसेस व्हॅंडेर्लन, त्या तुम्हीच होतात का?"

"हो, पहिल्यांदा मीच आले होते."

"पायरो कडकपणे म्हणाला, "*पहिल्यांदा* म्हणजे काय?"

मिसेस व्हॅंडेर्लनने स्पष्ट केले, "मी लगेच परत आले. मग मी वर गेले आणि माझ्या नोकराणीला फोन करून बोलावले. तिला यायला खूप वेळ लागला. मी परत फोन केला. मग मी जिन्याशी गेले. मी तिचा आवाज ऐकून, तिला हाक मारली. तिने माझे केस विंचरल्यावर, मी तिला परत पाठवले. ती उदास झाली होती व कामात तिचे लक्ष नव्हते. तिला मी परत पाठवल्यावर लगेच मला दिसले, की ज्युलिया बाईसाहेब जिन्याने वर येत होत्या. त्या मला म्हणाल्या, त्या पुस्तक आणण्यासाठी परत खाली आल्या होत्या. हे फार चमत्कारिक आहे, नाही का?" तिचे बोलणे संपल्यावर मिसेस व्हॅंडेर्लन मोठे, लबाड हसू हसली. पायरोने स्वतःशी विचार केला, की मिसेस व्हॅंडेर्लनला ज्युलिया बाईसाहेब आवडत नसाव्या.

"तुम्ही तुमच्या नोकराणीचा किंचाळण्याचा आवाज ऐकला?"

"का? हो, तसे काहीतरी मी ऐकले."

"तुम्ही तिला त्याबद्दल विचारले का?"

"हो. तिला हवेत तरंगणारी एक पांढरी आकृती दिसल्याचे ती बोलली --- काय वेडेपणा!"

ज्युलिया बाईसाहेबांनी काल काय कपडे घातले होते?

"ओहो, तुम्ही कदाचित असा विचार करत आहात --- हो, अस्स! तिने संध्याकाळचा पांढरा ड्रेस घातला होता. अर्थात हे स्पष्ट झाले. तिने

तिला अंधारात पांढऱ्या आकृतीसारखे पाहिले असावे. या मुली इतक्या अंधश्रद्ध असतात.”

“तुमची नोकराणी तुमच्याबरोबर खूप वर्षे आहे का?”

“ओहो, नाही. मिसेस व्हॅंडेर्लनने तिचे डोळे पूर्ण उघडले. “फक्त पाच महिने.”

“तुमच्या परवानगीने, मला तिला भेटायला आवडेल.”

मिसेस व्हॅंडेर्लनने तिच्या भुवया उंचावल्या. ती थंडपणे म्हणाली, “ओहो, नक्कीच.”

“तुम्हाला समजले असेल, की मला तिला काही प्रश्न विचारायचे आहेत.”

“हो, हो.”

पुन्हा एक मनोरंजनात्मक हास्य!

पायरो उभा राहून लवला. तो बोलला, “बाईसाहेब, तुम्ही चांगले काम केले.”

मिसेस व्हॅंडेर्लनला थोडासा धक्का बसला. “ओहो, मिस्टर पायरो, तुम्ही किती चांगले आहात, पण का?”

“बाईसाहेब, तुम्ही इतक्या आत्मविश्वास असलेल्या व संरक्षित आहात.”

मिसेस व्हॅंडेर्लन थोड्या साशंकतेने हसली.

“आता मला आश्चर्य वाटते, की मी ते माझी स्तुती म्हणून घेऊ का?”

पायरो म्हणाला, “कदाचित, ती धमकी असेल --- आयुष्यात प्रौढी मिरवू नये.”

मिसेस व्हॅडेर्लन जास्त खात्रीने हसली. ती उठली व हस्तांदोलन केले. ”मिस्टर पायरो, मी तुम्हाला सुयश चिंतिते. तुम्ही माझ्याबद्दल बोललेल्या सर्व छान गोष्टींसाठी आभार!”

ती बाहेर पडली. पायरो स्वतःशीच पुटपुटला, “तुम्ही माझ्यासाठी यश मिळो असे म्हणालात, हो, तुम्हाला खरच त्याची खात्री होती, की हे मला फार त्रास देणार आहे.”

थोडे रागावून, त्याने घंटी वाजवली आणि लिओनि बाईसाहेबांना पाठवून द्यायला सांगितले. ती दारात थोडी घाबरून उभी राहिल्यावर त्याने तिच्यावर नजर फिरवली. तिच्या काळया ड्रेसमध्ये, भांगाने विभागलेल्या केसांच्या लाटांमध्ये व झुकलेल्या पापण्यांमध्ये, ती नम्र दिसत होती. त्याने पसंतीदर्शक मान हलवली.

तो बोलला, “आत या, लिओनि बाईसाहेब. घाबरू नका.”

ती आत येऊन नम्रपणे त्याच्यासमोर उभी राहिली.

एकदम आवाज बदलून पायरो बोलला, “तुला माहिती आहे का, की मला तू दिसायला खूप चांगली वाटते आहेस.”

लिओनिने त्वरीत उत्तरादाखल डोळयाच्या कोपऱ्यातून, लाजून एक कटाक्ष टाकला आणि मृदूपणे बोलली, “तुम्ही फार दयाळू आहात.”

पायरो म्हणाला, “मी खरे काय ते शोधून काढण्यासाठी मिस्टर कार्लीले यांना विचारले, की तू दिसायला चांगली आहेस की नाही, तर तो म्हणाला, की तो सांगू शकत नाही.

लिओनिने तिची हनुवटी वर केली व रोषाने पाहत म्हणाली, ”ती आकृती.”

“ते त्याचे बरोबर वर्णन आहे.”

“माझा विश्वास नाही, की आयुष्यात त्याने एखाद्या मुलीकडे बघितले तरी असेल, की नाही.”

“बहुधा नाही. हे किती दयनीय आहे. त्याने खूप काही गमावले आहे. पण या घरात अशी दखल घेणारे काहीजण आहेत, नाही का?”

“तुम्ही काय म्हणता आहात, मला समजत नाही.”

“ओहो, लिओनि बाईसाहेब, तुम्हाला चांगले माहिती आहे. काल रात्री डोक्यावर हात घेऊन, भूत बघितल्याचे चांगले नाटक तुम्ही केले. जर मुलगी घाबरली तर तिचे हात हृदयाशी जातात किंवा तोंडावर जाऊन, ती रडू लागते. पण तुम्ही हात डोक्यावर ठेवू उभे असल्याचे मी ऐकले, तेव्हा मला समजले की भूत वगैरे काही नव्हते. पण डोक्यावर हात म्हणजे काही वेगळे होते. *केस विस्कटल्यामुळे ते घाईने सारखे करणे चालले होते.* तर आता मला सांग जिन्यात उभे राहून, तू का किंचाळलीस?”

“पण सर, हे खरे आहे की, मी एक उंच पांढरी आकृती पाहिली --- “

“असे बघा, माझ्या बुद्धीचा अपमान करू नका. मिस्टर कार्लीलेंसाठी ती गोष्ट ठीक असेल. पण हर्क्युल पायरोसाठी ती फारशी बरी नाही. खरे असे आहे, की तुमचे चुंबन घेतले गेले, बरोबर? आणि माझ्या अंदाजाप्रमाणे तो रेगी कॅरिंग्टन होता.”

लिओनिने न लाजता त्याच्याकडे बघितले. ती म्हणाली, “*ठीक आहे. शेवटी चुंबन म्हणजे काय*?

पायरो दिमाखाने म्हणाला, “खरेच, काय बरे?”

“असे बघा, एक तरुण माणूस माझ्या मागून आला आणि त्याने माझ्या कंबरेला विळखा घातला --- अर्थात त्याने मला दचकवले आणि मी किचाळले. जर मला हे माहिती असते, तर मी किंचाळले नसते.”

पायरो बोलला, “अर्थात.”

पण तो माझ्यावर एखाद्या मांजरासारखा धाऊन आला. मग अभ्यासिकेचे दार उघडून सचिव आला आणि तो तरुण जिना चढून नाहीसा झाला. मी मात्र जिन्यात मूर्खासारखी उभी राहिले. मग मला काहीतरी बोलणे, क्रमप्राप्त होते --- विशेषतः” --- ती फ्रेंचमध्ये बोलली, “*हा माणूस सामाजिक दर्जा चांगला असलेला, श्रीमंत, दिसायला चांगला बुद्धिमान होता!*

“म्हणून तू उंच, पांढऱ्या, हवेत तरंगणाऱ्या विचित्र आकृतीच्या भुताचा शोध लावलास?”

“हो, खरेच. मला जे सुचले, ते मी बोलले. पण मी दुसरे काय करू शकत होते?”

“तर मग आता सर्व काही स्पष्ट केले गेले आहे. मला पहिल्यापासून संशय होता.”

लिओनिने त्याच्याकडे उत्तेजित कटाक्ष टाकला.

“मिस्टर पायरो, तुम्ही खूप हुशार आणि सहानुभूती बाळगणारे आहात.”

मी तुमचे गुपित फोडणार नाही. पण त्या बदल्यात तुम्ही माझ्यासाठी काही कराल का?”

“अगदी खुषीने.”

“तुला तुझ्या मालकिणीच्या भानगडींबद्दल कितपत माहिती आहे?”

“त्या मुलीने खांदे उडवले. “फारसे नाही. पण अर्थात, माझ्या काही कल्पना आहेत.”

“आणि त्या कल्पना?”

“मी पाहिले आहे, की बाईसाहेबांचे मित्र नेहमी सैन्यातले, खलाशी किंवा हवाईदलातील असतात. आणि इतर त्याना गुपचूप भेटायला येणारी, परदेशी माणसे. बाईसाहेब फारच सुंदर व आकर्षक आहेत. तरी मला वाटते की त्या फार काळ तशा रहाणार नाहीत. तरुणांना ती फार आकर्षक वाटते. कधीकधी मला वाटते, ते अती स्तुती करतात. पण ही फक्त माझी कल्पना आहे. बाईसाहेबांचा माझ्यावर विश्वास नाही.”

“तू मला हे समजावून दिले पाहिजेस, की बाईसाहेब एकट्याच सगळे सांभाळतात का?”

“हो, ते तसेच आहे.”

“दुसऱ्या शब्दात, तू मला मदत करू शकत नाहीस.”

“हो, मला वाटते, मी करू शकत नाही. मला शक्य असेल, तर मी करेन.”

“मला सांग आज तुझ्या मालकिणबाई चांगल्या मनस्थितीत आहेत का?”

“हो, नक्कीच.”

“त्या खूष व्हाव्या, असे काही घडले आहे का?”

‘इथे आल्यापासून त्या तशाच चांगल्या मनस्थितीत आहेत.”

“तर मग लिओनि का, ते तुला माहिती असेल.”

मुलीने ठामपणे उत्तर दिले, “हो. त्यात माझी चूक होणे शक्य नाही. मला बाईसाहेबांच्या सगळ्या मनस्थितींचा अंदाज आहे. त्या खूप उत्साहात आहेत.”

“सकारात्मकतेने विजयी?”

अगदी बरोबर शब्द!”

पायरोने फार उत्साह न दाखवता, मान हलवली.

“मी शोधून काढले आहे, ते ऐकून घ्यायला जरा अवघड आहे. पण मला जसे भावले, तसे ते टाळणे अशक्य आहे. ठीक आहे मी तुमचा आभारी आहे.”

लिओनिने त्याच्याकडे एक लैगिक आकर्षण सुचवणारा कटाक्ष टाकला. “मी तुमची आभारी आहे. जर मला जिन्यात मिस्टर --- भेटले, तर खात्री बाळगा, की मी किंचाळणार नाही.”

पायरो सभ्यतेने म्हणाला, “अग मुली, मी वयाने मोठा आहे. मला असल्या मौजमजेशी काय करायचे आहे?”

पण थोड्याशा हास्याच्या चुणुकीने लिओनि बाहेर पडली.

पायरो खोलीत सावकाश फेऱ्या मारत होता. त्याचा चेहरा उत्सुक आणि उदास बनला होता. शेवटी तो बोलला, “आणि आता ज्युलिया बाईसाहेबांशी बोलू. ती काय सांगेल, याचे मला नवल वाटते आहे?”

ज्युलिया बाईसाहेब खोलीत खात्रीशीरपणे शिरल्या. तिने डौलाने मान तुकवली व पायरोने पुढे केलेल्या खुर्चीत बसली. ती खालच्या पट्टीत पण चांगल्या पद्धतीने बोलू लागली.

उमराव मेफिल्ड म्हणाला, की तुम्हाला मला काही प्रश्न विचारायचे आहेत.”

“हो, बाईसाहेब. ते काल रात्रीसंबंधी आहेत.”

काल रात्रीसंबंधी?”

“तुमचा ब्रिजचा खेळ संपल्यावर काय झाले?”

“माझ्या नवऱ्याला वाटले की दुसरा डाव सुरु करायला आता फार उशीर झाला आहे.

“आणि मग?”

“मी झोपायला गेले.”

“एवढेच?”

“मी तुम्हाला फार रुची वाटेल, असे काही सांगू शकत नाही. ही चोरी केव्हा --- “ती अडखळली --- चोरी केव्हा झाली?”

“तुम्ही वर गेल्यावर लगेच.”

“अस्स! आणि काय चोरले गेले?”

“काही खासगी कागद.”

“महत्वाचे कागद का?”

“फार महत्वाचे.”

ती हसली आणि म्हणाली, “ते फार महत्वाचे होते का?”

“हो, बाईसाहेब. त्यांची पैशात किंमत खूप होईल.”

अस्स!”

थोड्या वेळाच्या शांततेनंतर पायरो म्हणाला, “तुमच्या पुस्तकाचे काय?”

‘पुस्तक?” तिने घाबरट डोळ्यांनी पायरोकडे बघितले.

“हो. मला मिसेस व्हॅडेर्लनकडून समजले, की तुम्ही तिघी बायका वर गेल्यावर थोड्या वेळाने, तुम्ही पुस्तक घ्यायला परत खाली आलात.”

“हो. मी आले होते.”

“म्हणजे खरे तर, तुम्ही वर गेल्यावर लगेच झोपायला गेला नाहीत तर? तुम्ही परत हॉलमध्ये आलात?”

“हो बरोबर मी ते सांगायला विसरले.”

“तुम्ही हॉलमध्ये असतांना तुम्हाला कोणाची किंकाळी ऐकू आली का?”

“नाही --- हो --- नाही, मला नाही वाटत.”

“बाईसाहेब, तुम्हाला ती हॉलमध्ये नक्कीच ऐकू आली असेल.”

ज्युलिया बाईसाहेबांनी डोके वळवले व म्हटले, “मी काही ऐकले नाही.”

पायरोने त्याच्या भुवया उंचावल्या. पण काही बोलला नाही.

शांतता अशक्य झाल्यावर ज्युलिया बाईसाहेब एकदम बोलल्या, “काय केले गेले?”

काय केले गेले? तुम्हाला काय म्हणायचे आहे, मला कळत नाही.”

“चोरीबद्दल. पोलीस नक्कीच काहीतरी करत असतील.”

पायरोने मान हलवली. “पोलिसांना बोलावण्यात आलेले नाही. सर्व काही माझ्यावर सोपवण्यात आले आहे.”

तिने त्याच्याकडे रोखून बघितले. तिच्या अस्वस्थ, सुरकुतलेल्या चेहऱ्यावर अजून ताण आला. तिचे काळे शोधक डोळे त्याच्या डोळयात मलूलपणे घुसायला बघत होते. शेवटी ते पराभूत झाले.

“काय केले गेले, हे तुम्ही मला सांगू शकत नाही का?”

“मी तुम्हाला फक्त दिलासा देऊ शकतो. मी प्रयत्नांची कसूर करत नाही.”

“चोराला पकडण्यासाठी --- की --- कागद परत मिळवण्यासाठी?

“कागद परत मिळवणे, ही मुख्य गोष्ट आहे.”

तिची पद्धत बदलली. ती दमली आणि कंटाळली.

ती बेपर्वाईने म्हणाली, “हो, मला तसेच वाटले होते.

तिथे परत शांतता पसरली. “अजून काही मिस्टर पायरो?”

“नाही, बाईसाहेब. मी तुम्हाला अधिक थांबवणार नाही.”

“आभारी आहे.”

त्याने तिच्यासाठी दार उघडून धरले. ती त्याच्याकडे न बघता बाहेर पडली.

पायरो परत शेकोटीजवळ गेला आणि कट्ट्यावरील शोभेच्या वस्तु नीट लावल्या. तो ते करत असतानाच उमराव मेफिल्ड फ्रेंच खिडकीतून आला व “कसे काय” बोलला.

“ठीक आहे. घटना जशा आकार घ्यायला पाहिजेत तशा घेत आहेत.”

उमराव मेफिल्ड त्याच्याकडे रोखून बघत बोलला, “तुम्ही खूष आहात का?”

“नाही. मी खूष नाही. पण समाधानी आहे.

“”खरेच का, मिस्टर पायरो. मग मी तुमचे काम काढून घेऊ शकत नाही.”

“तुम्हाला वाटते, तसा मी ढोंगी नाही.”

“मी असे म्हणालो नाही.”

“म्हणाला नाहीत, पण तसा *विचार केला*. मी पराभूत झालेलो नाही. काही वेळा मला एक विशिष्ट दृष्टीकोन घ्यावा लागतो.

उमराव मेफिल्डने त्याच्याकडे संशयाने व अविश्वासाने पाहिले. हर्क्युल पायरो या माणसाला तो ओळखत नव्हता. तो त्याला आवडत नव्हता. पण त्याला काहीतरी ताकीद मिळाली, की हा छोटा माणूस जितका अक्षम वाटतो, तितका तो नाही. चार्ल्स मॅकलॉघालीनने नेहमी त्याची कार्यक्षमता ओळखलेली होती.

तो म्हणाला, “ठीक आहे आम्ही तुमच्यावर अवलंबून आहोत. आता पुढे तुम्ही काय करायचे म्हणता?”

तुमची तुमच्या पाहुण्यांपासून सुटका होऊ शकते का?”

“मला वाटते, ते शक्य आहे --- मी सांगतो, की मला एका कामासाठी लंडनला जायचे आहे. मग बहुधा ते निघतील.”

“फार छान. तसे करायचा प्रयत्न करा.”

उमराव मेफिल्ड कां कू करू लागला.

”तुम्हाला असे वाटत नाही का --- ?”

“मला वाटते, ते नक्की शहाणणाचा मार्ग स्वीकारतील.”

उमराव मेफिल्डने खांदे उडवले.

“ठीक आहे, तुम्ही तसे म्हणत असाल, तर.”

तो बाहेर गेला.

# आठ

जेवणानंतर पाहुणे गेले. मिसेस व्हॅडेर्लन व मिसेस मकाट्टा रेल्वेने जाणार होत्या. कॅरिंग्टन मंडळींकडे त्यांची गाडी होती. मिसेस व्हॅडेर्लन त्यांच्या यजमानांचा गोंडस निरोप घेत होत्या, तेव्हा पायरो हॉलमध्ये उभा होता.

"एवढा त्रास व एवढ्या काळजीबद्दल, मी दिलगीर आहे. मी अशी आशा करते, की सर्व काही सुरळीत होईल. मी या प्रकाराबद्दल कुठे अवाक्षरही काढणार नाही."

तिने त्याचा हात दाबला व बाहेर गेली. तिथे तिला स्टेशनवर नेण्यासाठी रोल्स थांबली होती. मिसेस मकाट्टा आधीच आत बसली होती. तिचा निरोप घेणे थोडे उर्मटपणाकडे झुकणारे व कोरडे होते.

अचानक गाडीच्या चालकाजवळ बसलेली, लिओनि धावत परत हॉलमध्ये आली. ती ओरडली, "बाईसाहेबांची कपड्यांची बॅग गाडीत नाही."

तिथे घाईने शोध घेतला गेला. शेवटी उमराव मेफिल्डला ती जुन्या ओकच्या टेबलाजवळ ठेवलेली सापडली. लिओनिने ते ग्रीन मोरोक्कोचे छान प्रकरण आनंदाचा चित्कार काढत ताब्यात घेतले आणि घाईने निघाली.

मग मिसेस व्हॅडेर्लनने त्या बॅगेत काही असल्याची खात्री केली. मग गाडीबाहेर डोकावून पाहिले. तिने एक पत्र देत म्हटले, "उमराव मेफिल्ड, उमराव मेफिल्ड, कृपया हे तुमच्या पोस्टाच्या पेटीत तात्काळ टाकाल का? जर मी ते नंतर टाकू म्हणून माझ्याकडे ठेवले, तर मी नक्की ते विसरेन. माझ्या बॅगेत पत्रे नेहमी कैक दिवस पडून रहातात."

सर जॉर्ज कॅरिंग्टन हातांनी त्याच्या घड्याळाशी काही खटपट करत होता. ते उघडत आणि बंद करत होता. तो फार वक्तशीर होता.

तो पुटपुटला, “ते फार उशीर करत आहेत. त्यांनी काळजी घेतली नाही, तर त्यांची गाडी चुकेल --- “

त्याची बायको चिडून ओरडली, “ओहो, जॉर्ज, त्यांचा वेळ घेऊ नकोस. त्याना गाडी गाठायची आहे, आपल्याला नव्हे.”

त्याने तिच्याकडे लाजीरवाण्या दृष्टीने बघितले.

रोल्स निघून गेली.

रेगी कॅरींग्टन त्याच्या गाडीचे पुढचे दार उघडत म्हणाला “पपा, सर्व काही तयार आहे.”

नोकरांनी त्यांचे सामान बाहेर आणायला सुरवात केली. रेगीने ते डिकीत ठेऊन घेतले.

पायरो निरीक्षण करत पुढील दाराने बाहेर आला.

अचानक त्याच्या दंडावर त्याला एक हात जाणवला. ज्युलिया बाईसाहेबांचा चिडका कुजबुज करणारा आवाज आला, “मिस्टर पायरो, मला तुमच्याशी लगेच बोलले पाहिजे.”

त्याने तिच्या आग्रही हाताकडे पाहिले. तिने त्याला सकाळच्या खोलीत नेले आणि दार लावले. ती त्याच्या जवळ आली.

“तुम्ही म्हणालात, ते खरे होते --- की उमराव मेफिल्ड यांच्या दृष्टीने, कागद सापडणे, हे सर्वात महत्वाचे आहे.”

पायरोने तिच्याकडे चौकसपणे पाहिले. “बाईसाहेब, ते खरे आहे.”

“जर --- जर मी ते कागद तुम्हाला परत दिले, तर तुम्ही काही प्रश्न न विचारता, ते उमराव मेफिल्डला द्याल?”

“माझी खात्री नाही, की तुम्ही काय म्हणत आहात, मला समजत नाही.”

“समजलेच पाहिजे. मला वाटते, तुम्हाला समजले आहे. मी सुचवते आहे --- जर कागद परत केले गेले, तर चोर कोण हे विचारायचे नाही.”

पायरोने विचारले, “ते लवकरात लवकर केव्हा करता येईल?

“नक्कीच बारा तासांच्या आत.”

“तुम्ही तसे नक्की सांगता?”

“मी तसे वचन देते.”

त्याने काही उत्तर न दिल्याने, तिने घाईने परत विचारले, “काही गाजावाजा होणार नाही, याची मी खात्री बाळगू ना?

त्याने थंडपणे म्हटले, “हो, बाईसाहेब, मी त्याची ग्वाही देतो.”

“मग सर्व काही करता येईल.”

ती अचानक खोलीबाहेर निघून गेली. मिनिटाभराने पायरोने गाडीचा निघून जातानाचा आवाज ऐकला. पण पायरोला माहिती होते, की रेगीने ते कागद चोरलेले नाहीत.

त्याने हॉल ओलांडून पॅसेजमधून जात अभ्यासिकेत प्रवेश केला. तो बोलला, “ठीक आहे.” त्याने त्याचे हात पसरले. “उमराव मेफिल्ड, केस संपली.”

“काय?”

पायरोने त्याच्यात व ज्युलिया बाईसाहेबांच्यामध्ये बोलणे झालेले तेच शब्द परत उच्चारले. उमराव मेफिल्डने त्याच्याकडे अवाक झाल्यासारखे पाहिले. "पण याचा अर्थ काय? मला काही समजले नाही."

"हे अगदी स्पष्ट आहे, नाही का? ज्युलिया बाईसाहेबांना माहिती होते की कागद कुणी चोरले होते."

"म्हणजे तुम्ही असे म्हणता आहात, की ते तिने चोरले नाही?"

"नक्कीच नाही. ज्युलिया बाईसाहेब जुगारी असू शकतील. पण चोर नाहीत. पण ती ते परत द्यायला तयार असेल, तर मग ते तिच्या नवऱ्याने किंवा मुलाने घेतले असणार. आता सर जॉर्ज कॅरिंग्टन तुमच्याबरोबर गच्चीत होते. त्यामुळे मुलगाच उरला. मला वाटते, मी काल रात्रीच्या घटना सुसंगतपणे सांगू शकतो. काल रात्री ज्युलिया बाईसाहेब त्यांच्या मुलाच्या खोलीत गेल्या, तेव्हा खोली रिकामी होती. त्या त्याला बघायला खाली आल्या. पण तिथेही तो सापडला नाही. आज सकाळी त्यांना चोरीचे समजले. आणि त्याना हे ही कळले, की त्यांचा मुलगा म्हणतो आहे, की तो सरळ झोपायला गेला व तिथून बाहेर पडलाच नाही. तिला माहिती होते, की हे खरे नाही. आणि तिला तिच्या मुलाविषयी अजूनही काही माहिती होते. तिला माहिती होते की तो कमकुवत आहे. तो पैशांसाठी तरसलेला आहे. त्याला मिसेस व्हॅडेर्लनबद्दल आकर्षण / भ्रामक प्रेम वाटत असल्याचेही तिने जाणले होते. तिला सर्व गोष्टी लख्ख समजल्या. मिसेस व्हॅडेर्लनने त्याला कागद चोरायला सांगितले. पण तिने तिचेही नाटक वठवायचे ठरवले. ती तिच्या मुलाला, रेगीला नाचवेल. कागद ताब्यात घेईल व ते उमराव मेफिल्डला परत करेल."

उमराव मेफिल्ड ओरडले, "पण हे अशक्य आहे."

“हो, हे अशक्य आहे. पण ज्युलिया बाईसाहेबांना हे माहिती नाही, की हर्क्युल पायरोला काय माहिती आहे, की तरूण रेगीने काल रात्री कागद चोरलेले नाहीत. कारण तो मिसेस व्हॅडेर्लनच्या फ्रेंच नोकराणीबरोबर प्रेमाचे चाळे करण्यात गुंतलेला आहे.”

“ही सगळी गोष्ट म्हणजे, गोंधळलेली परिस्थिती आहे!”

“तेच तर!”

“आणि अजून केस संपलेली नाही.”

“हो, ती संपली आहे. *मला, हर्क्युल पायरोला खरे काय ते माहिती आहे*. तुमचा माझ्यावर विश्वास असणार नाही? जेव्हा मी काल सांगितले, की मला कागद कुठे आहेत, ते माहिती आहे, तेव्हा तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवला नाहीत. पण ते इतक्या जवळ आहेत, हे मला माहिती नव्हते.”

“कुठे?’

“ते तुमच्या खिशात आहेत, उमराव मेफिल्ड. मिसेस व्हॅडेर्लनने तुम्हाला पोस्टाच्या पेटीत टाकण्यासाठी जे पत्र दिले, ते आणि आपण शोधत असलेले कागद, हे दोन्ही तुमच्या खिशात आहे. ”

क्षणभर तिथे शांतता पसरली. मग उमराव मेफिल्ड म्हणाले, “मिस्टर पायरो, तुम्ही काय बोलत आहात, ते तुम्हाला कळते आहे का?

हो. मला माहिती आहे, की मी एका फार हुशार माणसाशी बोलतो आहे. पहिल्यापासून मला याचे दुःख होत होते, की तुम्ही जवळचे चांगले दिसणारे आहात. पण लांबचे नीट दिसत नसूनही तुम्ही तुम्हाला दिसलेल्या खिडकीतून बाहेर पडणाऱ्या आकृतीबद्दल इतके ठाम होतात. तुम्हाला त्याचा छडा लावायचा होता. सोयीस्कर शोध मान्य केला गेला. नंतर हळूहळू मी इतर सगळ्यांना वगळले. मिसेस व्हॅडेर्लन वर होत्या. सर जॉर्ज

तुमच्याबरोबर होते. मिसेस मकाट्टा निर्विवादपणे त्यांच्या खोलीत होत्या. [त्यांची खोली नोकराणीच्या पुढची होती आणि मिसेस मकाट्टा घोरतात.] ज्युलिया बाईसाहेबांना स्पष्ट्पणे माहिती होते, की त्यांचा मुलगा दोषी आहे. त्यामुळे फक्त दोन शक्यता राहिल्या. एक तर कार्लीलेने ते कागद टेबलावर ठेवले नाहीत किंवा त्याच्या खिशात ठेवले [आणि हे शक्य वाटत नव्हते कारण तुम्ही सांगितल्याप्रमाणे, त्याला त्या कागदांची प्रत काढणे सहज शक्य होते.] किंवा --- किंवा तुम्ही तिथे फिरतांना कागद तिथे होते आणि फक्त ते जाऊ शकत होते अशी एकच जागा होती, आणि ती म्हणजे तुमचा खिसा. अशा तऱ्हेने सगळे स्पष्ट झाले. तुम्हाला दिसलेल्या आकृतीबाबतचा तुमचा आग्रह, कार्लीले निर्दोष असल्याचे तुमचे म्हणणे, तुमची मला बोलावण्याची नाराजी. एकदोन गोष्टींनी मला गोंधळात टाकले --- हेतू किंवा उद्दिष्ट! माझी खात्री होती, की तुम्ही प्रामाणिक व नीतिमान माणूस आहात. त्यामुळे तुम्हाला अशी कळकळ होती की निरपराध माणसाला शिक्षा होता कामा नये. हे देखील अटळ होते, की कागदांची चोरी तुमचे करीयर बरबाद करू शकते. मग ही पूर्णतया अतार्किक चोरी कशासाठी? आणि शेवटी मला उत्तर मिळाले. काही वर्षांपूर्वी तुमच्या करीयरमध्ये काही प्रकरण उद्भवले होते आणि पंतप्रधानांनी जगाला खात्री दिली होती, की तुम्ही सत्तेतील प्रश्नांकित व्यक्तींबरोबर बोलणी केली नव्हती. समजा, ते पूर्णपणे खरे नसले, तरी तिथे काहीतरी पुरावा राहिला असणार --- कदाचित एखादे पत्र --- असे दाखवणारे की जे तुम्ही लोकांमध्ये जाहीर करुन नाकारलेत, ते खरे तर तुम्ही केले होते. असे जाहीर करणे, हे लोकमान्यतेसाठी जरुरीचे होते. पण हे संशयास्पद होते, की रस्त्यातील माणूस, ते तसे बघेल. जेव्हा सर्वोच्च सत्ता तुमच्या हातात दिली जाईल,

त्याक्षणी असे होऊ शकेल, की भूतकाळातील काही मूर्ख अहंकाराच्या प्रतिध्वनीमुळे केलेल्या सर्वावर पाणी फिरेल.”

“मला संशय आला, की ते पत्र विशिष्ट सरकारच्या हातात सुरक्षित असेल व ते सरकार तुम्हाला ते परत करण्यास एका अटीवर तयार होईल, की तुम्ही --- त्याबदली नवीन बॉम्बरचे डिझाईन असलेले कागद त्याना द्यायचे. काही माणसे हे नाकारतील. तुम्ही --- नाकारणार नाही. तुम्ही मान्यता द्याल. मिसेस व्हॅडेर्लन या बाबतीतील दलाल होती. ती इथे देवाणघेवाणीच्या मिषाने आली होती. जेव्हा तुम्ही तिला पकडण्यासाठी काही बेत आखला नाहीत व कबूल केले की तुम्ही त्यापासून दूर राहिलात. तिला इथे बोलावण्याचे कारण त्यामुळे खूपच दुबळे ठरले.

“तुम्ही चोरीची व्यवस्था केली. चोराला गच्चीवर पाहिल्याचे ढोंग केले --- असे करून कार्लीलेला संशयातून मोकळे केले. जरी त्याने खोली सोडली नसती, तरी टेबल खिडकीच्या इतके जवळ होते, की कार्लीले खिडकीकडे पाठ करून, तिजोरीतून कागद काढण्यात गर्क असतांना, चोर कागद पळवू शकला असता. तुम्ही टेबलाकडे चालत गेलात, कागद घेतलेत आणि आधी ठरवलेल्या बेताप्रमाणे ते मिसेस व्हॅडेर्लनच्या कपड्यांच्या बॅगेत टाकेपर्यंत, तुमच्या खासगी वस्तूंमध्ये ठेवलेत. त्याबदली तिने तुम्हाला तिला पोस्टाच्या पेटीत टाकायचे पत्र आहे, असे फसवून सांगून, तिच्याकडे असलेले प्रश्नांकित व्यक्तींबरोबर बोलणी केली असल्याचा पुरावा असलेले पत्र, स्वतःचे पोस्टात टाकायचे पत्र म्हणून तुम्हाला दिले.” पायरो थांबला.

उमराव मेफिल्ड म्हणाले, “मिस्टर पायरो, तुमचे ज्ञान परिपूर्ण आहे. तुम्ही मला वर्णन करण्यास भीतीदायक असा, फार नकोसा माणूस समजले पाहिजे.”

पायरोने झटपट त्याच्याकडे पाहिले. “नाही. नाही. उमराव मेफिल्ड, मी म्हणालो, त्याप्रमाणे मला वाटते, तुम्ही खूप हुशार माणूस आहात. तुम्ही प्रथम वर्ग मिळवलेले इंजिनिअर आहात. मला वाटते, तुम्ही त्या बॉम्बरच्या विशेषतेमध्ये काही विरोधभासात्मक बदल करुन, ते कागद तुम्ही मिसेस व्हॅंडेर्लनच्या कपड्यांच्या बॅगेत टाकलेत. ते बदल इतके कसब वापरून केले आहेत, की हे समजणे अवघड ठरेल की हे मशीन यशस्वी ठरायला हवे होते, पण का ठरले नाही. काही प्रश्नांकित शक्तीला त्यात एक प्रकारची त्रुटी सापडेल --- त्यामुळे माझी खात्री आहे, की ते हिंपुटी होतील.”

पुन्हा तिथे शांतता पसरली --- आणि मग उमराव मेफिल्ड म्हणाला, “मिस्टर पायरो, तुम्ही फारच हुशार आहात. मी तुम्हाला फक्त एका गोष्टीवर विश्वास ठेवायला सांगतो. माझा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. माझी खात्री आहे, की मी इंग्लंडला येणाऱ्या संकटकाळात मार्गदर्शन करू शकतो. जर मी प्रामाणिकपणे असा विश्वास ठेऊ शकलो नसतो, की माझ्या जहाजरुपी देशाचे सुकाणू सांभाळण्यासाठी माझी गरज आहे, तर मी जे केले, ते करू शकलो नसतो --- मी दोन्ही जगांचे भले केले. मोठ्या हुशारीने मला स्वतःला बिकट संकटातून वाचवले.”

पायरो बोलला, “माझ्या उमरावा, जर तुम्ही दोन्ही जगाचे भले केले नसते, तर तुम्ही राजकारणी नसता!”

# अनुवादिकेची ओळख

## डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे बत्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)

डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


















Agatha
Christrie












डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल


ते पुस्तक उघडेल


(नेट आवश्यक)


















वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**
**डॉ. वृषाली जोशी यांचे हे बत्तीसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३६),

अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(१८), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(९), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(१०) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक, मंगेश चौधरी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन

लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।